# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

May 2024 / Issue No. 1 | Price : Rs. 30/-





## संपादकीय..

ललित गांधी
**अध्यक्ष**

लोकशाहीच्या महाउत्सवाला सामोरे गेल्यानंतर नवीन सरकार च्या कार्यकाळाची सुरुवात लवकरच होईल. देशाला प्रगतशील व विकसित राष्ट्र बनवायचे असेल तर नेतृत्व ही खंबीर, दमदार व मजबुत असणे आवश्यक आहे.

देशाच्या लोकशाही महाउत्सवाच्या बरोबरीनेच आपल्या चेंबरची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे.

महाराष्ट्र चेंबरच्या शंभर वर्षांच्या गौरवशाली परंपरेतील ९८ वर्षे पुर्ण झाली असुन, शतकमहोत्सवाच्या शेवटच्या दोन वर्षातील ही नवीन कार्यकारीणी निवडण्याची प्रक्रिया सुरू आहे.

२०२७ मध्ये नवीन शतकाची पहाट ज्या वेळी नवीन कार्यकारीणी, नवीन नेतृत्व कार्यभार स्विकारेल त्यावेळी पुढची शंभर वर्षे दमदार वाटचाल करू शकेल असे सर्वार्थाने मजबूत व स्वच्छ चेंबर त्यांना सोपविण्यासाठी मी कटीबध्द आहे.

मावळत्या कार्यकारीणीने गेलेल्या असंख्य कार्यापैकी मोजक्या निवडक कार्यांचा धावता आढावा या अंकामधून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

चेंबरचे मुख्यालय गेली अनेक वर्षे मोडकळीस आलेल्या अवस्थेत होते. हेरीटेज बिल्डींग चे आव्हानात्मक असलेले काम पुर्ण करून घेऊन अद्यावत अंतर्गत सजावटीचे काम अंतिम टप्प्यात आहे. लवकरच सभासदांच्या सेवेसाठी हे प्रशस्त कार्यालय कार्यान्वित होईल.

महाराष्ट्र चेंबरचा विस्तार राज्याच्या काना-कोपऱ्यापर्यंत करण्याचे अभियान ही आगामी काळात आपल्याला पुर्णत्वास न्यावयाचे आहे.

चेंबरचे कामकाज ग्रामीण भागापासून अंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत नेत सर्वव्यापी व सर्वंकष करण्यात या कार्यकारीणीने यश मिळवले आहे.

नवी कार्यकारीणी हे कार्य अतिशय चांगल्या पध्दतीने चालु ठेवण्यासाठीही कार्यरत राहील यांची ग्वाही यानिमित्ताने देत आहे.

अनेक नवीन संकल्पनांच्या माध्यमातुन नवउद्योजक निर्माण करण्याबरोबरच, लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वच व्यापार-उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी आपले चेंबर कटीबध्द आहे. सज्ज आहे. सुसज्ज होत आहे.

आपल्या सर्वांच्या अधिक सक्रिय सहभागाच्या अपेक्षेसह धन्यवाद !

MACCIA 100
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

May 2024/ Issue No. 1

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेलः maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष व संपादक
  **ललित गांधी**
- सहसंपादक
  **अविनाश पाठक**
- **उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालय**
  २०१, सारडा संकुल, वकीलवाडी, नाशिक - १.
  फोनः (०२५३)२५७७७०४
- ई-मेलः nsk@maccia.org.in
- **रत्नागिरी जिल्हा कार्यालय**
  जावकर प्लाझा, जयस्तंभ, रत्नागिरी.

**जळगाव जिल्हा कार्यालय**
२१-ए, श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१.

**कार्यालय** : अंधेरी (मुंबई), नवी मुंबई, ठाणे, पालघर, धुळे, जळगांव, पूणे, बारामती, रत्नागिरी, पलुस (सांगली)

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

## अंतरंग

१) नाशिकच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ने दिलेल्या प्रस्तावावर प्राधान्याने कार्य करू : उद्योग मंत्री उदय सामंत

२) आयकर बदलाने सूक्ष्म व लघुउद्योग पेमेंट पद्धतीत नवा ट्विट्स

३) महाराष्ट्रातील व्यापाराला चालना, नवीन गुंतवणुकीला प्रोत्साहन व महाराष्ट्रातील उत्पादनांना निर्यातीच्या संधी यासाठी हे प्रदर्शन अत्यंत महत्वपूर्ण ठरणार : ललित गांधी

४) कोल्हापूर विमानतळास राजाराम महाराजांच्या नावासाठी केंद्राकडे पाठपुरावा करू : एकनाथ शिंदे

५) महाराष्ट्र चेंबरचे नवे रचनात्मक पाऊल - बिझनेस फोरममुळे व्यापाराच्या अफाट संधी उपलब्ध : ललित गांधी

६) दावोसमध्ये महाराष्ट्राने केले ३ लाख ५३ हजार कोटींचे विक्रमी सामंजस्य करार

७) निर्यात समस्यांसाठी टास्कफोर्स नियुक्ती स्वागतार्ह : ललित गांधी

८) महाराष्ट्र चेंबरतर्फे शेतकऱ्यांना अनेक योजनांचा फायदा शक्य : ललित गांधी

९) आढावा विकासाचा... २ वर्षांच्या कार्याचा...

# नाशिकच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ने दिलेल्या प्रस्तावावर प्राधान्याने कार्य करू : उद्योग मंत्री उदय सामंत





**नाशिक जिल्ह्याच्या विकासाच्या रोड मॅप मध्ये नाशिक मधील उद्योजक व्यापारी व विविध घटकांच्या अपेक्षा सरकार पुढे मांडण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष संवाद बैठकीत बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत व्यासपीठावर अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या फोटोमध्ये उद्योगमंत्री उदय सामंत यांना निवदेन देताना अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्ष नितीन बंग, शाखा चेअरमन संजय सोनवणे, संदीप भंडारी, दत्ता भालेराव, विजय वेदमुथा, भावेश मानेक, मनीष रावल, आशिष नहार व कार्यकारिणी समिती सदस्य.**

महाराष्ट्राच्या व्यापार उद्योगाची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरने नाशिकच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळ्या विषयावरील दिलेल्या प्रस्तावावर राज्य सरकार आणि उद्योग खाते सकारात्मक पुढाकार घेऊन कार्य करेल अशी ग्वाही महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरच्या वतीने नाशिक जिल्ह्याच्या विकासाच्या रोड मॅप मध्ये नाशिक मधील उद्योजक व्यापारी व विविध घटकांच्या अपेक्षा सरकार पुढे मांडण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष संवाद बैठकीत बोलताना त्यांनी ही ग्वाही दिली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या विशेष बैठकीत नाशिक शहरातील विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन तास रंगलेल्या या विशेष चर्चासत्रात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काही प्रश्न जागेवरच सोडवले तर काही समस्या लवकरच सोडविल्या जातील असे सांगितले तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. याप्रसंगी उपस्थित व्यापारी उद्योजकांनी चेंबरने विशेष संवाद कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचे आभार आभार मानले.

देशाच्या आणि राज्याच्या अर्थ व्यवस्थेमधील महत्वाचे घटक म्हणून व्यापारी आणि उद्योजक यांची भूमिका आणि कार्य विशेष महत्वाचे असल्याने महाराष्ट्र सरकार व्यापार उद्योग क्षेत्रामागे भक्कमपणे उभे आहे. केवळ परदेशातील किंवा मोठे उद्योजकच नव्हे तर लहान उद्योजकांनाही रेड कार्पेट असा दृष्टिकोन शासनाचा असल्याने महाराष्ट्र पुन्हा एकदा प्रथम क्रमांकावर पोहचला आहे. नाशिक हे केवळ राज्यातच नव्हे तर संपुर्ण देशात आणि जगाच्या नकाशावर अनेक क्षेत्रात झळकत आहे. येथील उद्योगांच्या, व्यापारी व्यवसायीकांच्या आणि कृषी क्षेत्रातील उद्योगांच्या अडचणींची जाणीव सरकारला आहे. महाराष्ट्र चेंबरसारख्या संस्थांनी याबाबतीत वेळोवेळी सरकारचे लक्षही वेधले आहे. अशा सर्व बाबींकडे सकारत्मक दृष्टीने सरकार काम करत आहे असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्र चेंबर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲड ॲग्रीकल्चर तर्फे आयोजित निमा, आयमा, जितो, लघुउद्योग भारती नाईस, नाईस सीमा, नाशिक धान्य घाऊक किराणा व्यापारी संघटना नाशिक धान्य किराणा किरकोळ व्यापारी संघटना, नाशिक रिटेल क्लॉथ मर्चंट असोसिएशन, क्रेडाई, नाशिक रेडीमेड ॲंड होजिअरी क्लॉथ मर्चंट असोसिएशन व उद्योजक, व्यापारी संघटनांच्या सहकार्याने आयोजित विशेष संवाद सभेमध्ये केले.

महाराष्ट्र चेंबरतर्फे नाशिकला विमानसेवा, नाशिक पुणे रेल्वे, महामार्ग, भगर क्लस्टर, कुंभमेळा पार्श्वभूमीवर राज्याचे ब्रॅण्डिंग करणे, आयटी हब, पर्यटन विकास, बाजार समिती कायदा, मालमत्ता कर, फायर सर्टिफिकेट परवाना जिल्हास्तरावर मिळणे यासह विविध मागण्याचे निवेदन उद्योगमंत्री उदय सामंत यांना अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्ष नितीन बंग,

शाखा चेअरमन संजय सोनवणे, संदीप भंडारी, दत्ता भालेराव, विजय वेदमुथा, भावेश मानेक, मनीष रावल, आशिष नहार व कार्यकारिणी समिती सदस्यांनी दिले.

**उद्योग वाढले**

सध्याच्या सरकारच्या काळात नाशिकमध्ये १४९४ तर महाराष्ट्र एकूण ३५ हजार इतके उद्योग वाढले याचे एक महत्वाचे कारण तातडीने निर्णय घेणे हे असल्याचे उद्योग मंत्र्यांनी नमूद केले. व्यापारी उद्योजकांच्या मागे उभे राहिल्याने व त्यांच्या समस्या लवकरात लवकर दूर केल्याने अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते व रोजगार निर्मितीही होते याची जाणीव असल्यामुळे मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे आणि एकूणच सरकार अक्शन मोड वर काम करत आहे. अशावेळी या क्षेत्रातील संघटनांनी व कार्यकर्त्यांनी मनात कोणताही किंतु न ठेवता आपल्या अडचणी व योजना यावर मोकळेपणाने संवाद साधावा असेही त्यांनी आवाहन केले. शेवटी, सकारात्मकपणे काम करणाऱ्या सरकारच्या मागे सुजाण नागरिकांनी व व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक आदीनी आपली शक्ती उभी करावी, असे प्रतिपादन केले. सुरवातीला महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी स्वागत करताना चेंबरच्या कार्याची माहिती देऊन नाशिकच्या औद्योगिक विकासासाठी उद्योगमंत्र्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल माहिती देऊन त्यांचे आभार मानले. त्यानंतर आपल्या प्रास्ताविकातून चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नाशिक विभागामध्ये जाणवणाऱ्या मुख्य समस्यांचा उहापोह करताना येथील विमानसेवा, पुणे नाशिक रेल्वे, उद्योगासंदर्भातील संरक्षण, इलेक्ट्रिक, भगर क्लस्टर, कांदा विषयक समस्या, याबाबत उहापोह करून त्या लवकरात लवकर दूर करण्याचे गरज प्रतिपादन केली. उद्योगमंत्री उदय सामंत हे सातत्याने उद्योगविषयक प्रश्नात जातीने लक्ष घालून त्या सोडवण्याचा आटोकाट प्रयत्न करतात याबद्दल त्यांचे विशेष आभारही व्यक्त केले. याप्रसंगी उपस्थित संघटनांचे पदाधिकारी व सदस्य व उद्योजकांनी अनेकविध प्रश्न आणि समस्या सादर करून आपल्या सूचनाही केल्या. प्रामुख्याने त्यामध्ये नवीन उद्योगांसाठी जागा मिळणे, महाग वीजदर आणि अपुरा वीज पुरवठा, निर्यात विषयक वाहतूक समस्या, आयटी हब, औद्योगिक वसाहतीतील रस्ते विषयक समस्या, ट्रक ट्रमिनल, मालमत्ता करविषयक समस्या, सहकारी औद्योगिक वसाहतीच्या समस्या, बाजार समिती कायद्याच्या अडचणी, महापालिकेचे परवाना धोरण आदींचा समावेश होता. शिवाय नाशिकच्या पर्यटनाच्या दृष्टीने व खासकरून कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर एक कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यांनी अशीही मागणी झाली होती. या अनुषंगाने एक सविस्तर निवेदनही उद्योगमंत्र्यांना सादर करण्यात आले. यावेळी आमदार श्रीमती देवयानी फरांदे यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यापार उद्योग प्रश्नांबाबत शासन संवेदनशील असल्याचे सांगून विकासाच्या दृष्टीने आवश्यक अशा सर्व सूचनांचा पाठपुरावा केला जाईल असे सांगितले. सूत्रसंचालन शाखा चेअरमन संजय सोनवणे व दत्ता भालेराव यांनी केले. आभार वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांनी मानले.

चेंबरचे सदस्य प्रशांत राका यांचे चिरंजीव उत्सव राका यांनी घवघवीत यश मिळविल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला सत्कार त्यांच्या कुटुंबाने स्वीकारला. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष नितीन बंग, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, जितोचे अध्यक्ष सुबोध शाह, क्रेडाईचे अध्यक्ष कुणाल पाटील, आयमाचे अध्यक्ष ललित बुब, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष निखिल तपाडिया, योगेश जोशी, नाशिक धान्य घाऊक किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रफुल संचेती, नाशिक धान्य किरकोळ किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष एकनाथ अमृतकर, नाशिक रिटेल क्लॉथ मर्चंटस असोसिएशनचे अध्यक्ष नरेश पारख, नाशिक होलसेल क्लॉथ मर्चंटस असोसिएशनचे अध्यक्ष बालकिसन धूत, स्टाइसचे अध्यक्ष नामकर्ण आवारे, सराफ असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश नवसे आदींसह नाशिकमधील सर्व व्यापारी औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी व महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारणी समिती सदस्य विजय वेदमुथा, हेमंत कांकरिया, संदीप भंडारी, ललित नहार, आशिष नहार, विकास पगारे, भावेश मानेक, राजेश मालपुरे, मनिष रावल,राजेंद्र कोठावदे, रविंद्र झोपे, कैलास पाटील, रवी जैन, उपस्थित होते. धुळे, सिन्नर, कळवण, घोटी, इगतपुरी, दिंडोरी, नाशिकरोड येथील उद्योजक, व्यापारी, शेतकरी, पर्यटन व्यावसायिक, सल्लागार व महिला उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# कोल्हापूरच्या औद्योगिक विकासासाठी सर्वंकष धोरणासह सरकारचे संपूर्ण सहकार्य - उद्योगमंत्री उदय सामंत

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित विशेष बैठकीत ग्वाही



**कोल्हापूरातील प्रमुख उद्योजकांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री नाम. उदय सामंत सोबत ललित गांधी व अन्य उद्योजक.**

**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या औद्योगिक विकासासाठी महाराष्ट्र शासन कटीबध्द असून नवीन औद्योगिक वसाहती स्थापन्यासह कोल्हापूरमध्ये आय.टी.पार्क उभारणीसह सर्वंकष धोरण बनवुन सहकार्य केले जाईल अशी ग्वाही उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांनी दिली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज तर्फे मंगळवारी जिल्ह्यातील प्रमुख उद्योजकांनी उद्योग मंत्र्यांसमवेत संवाद बैठक आयोजित केली होती त्याप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत कोल्हापूरातील अग्रणी उद्योजक विजय मेनन, प्रकाश राठोड, सुरेंद्र जैन, सचिन मेनन, प्रसाद मंत्री, भरत जाधव, आनंद देशपांडे, अजय सप्रे, सचिन शिरगांवकर, मंगेश पाटील, शंकर दुल्हाणी, रवि डोली, जयेश ओसवाल, अश्विनी दानीगोंड, प्रकाश मेहता, राजु पाटील, राहूल सातपुते, शितल संघवी, रणजित जाधव हे उपस्थित होते.

ललित गांधी यांनी प्रास्ताविक करताना जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींचे प्रदीर्घ काळ प्रलंबित प्रश्न सोडवल्याबद्दल उद्योग मंत्र्यांना धन्यवाद दिले. तसेच उद्योजकांचे प्रलंबित अनुदान वितरीत केल्याबद्दलही आभार मानले, कोल्हापूरच्या औद्योगिक विकासासाठी एमआयडीसी चा विस्तार, वीज दरवाढ तोडगा, पूर्वीच्या जागा हस्तांतरणावरील जीएसटी मागणी रद्द करणे, इलेक्ट्रॉनिक पार्क ला मंजूरी मिळविणे आदी मागण्या मांडल्या.

उद्योजकांनी जिल्ह्याच्या विकासासाठी विविध मागण्या व प्रस्तावावर आपली मते व्यक्त केली. यामध्ये विस्तारीकरणासाठी जागेची उपलब्धता, वीज उपलब्धता, नवीन उद्योग आणणे, आय.टी. पार्क उभारणी या मागण्यांसह कोल्हापूर-सांगली विभागाला ‘फाऊंड्री हब’ घोषित करण्याची मागणी केली. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सर्व प्रश्न समजावून घेतले असल्याचे सांगुन सरकारने बरेच निर्णय घेतले असून नवीन एमआयडीसी च्या माध्यमातुन ६५० हेक्टर जमीन उपलब्ध करून दिली जाईल असे सांगुन आचारसंहितेनंतर विविध निर्णय जाहीर केले जातील असे सांगितले.









# पनवेल सहकारी औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष विजय लोखंडे यांची भेट

पनवेल दौऱ्यावर असताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी पनवेल सहकारी औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष विजय लोखंडे यांची भेट घेऊन सहकारी औद्योगिक वसाहतीच्या अडचणी समजावून घेऊन, यापूर्वीच्या विविध मागण्या उद्योग मंत्र्यांच्या माध्यमातून मार्गी लागल्या त्याविषयीची चर्चा केली.

तसेच या भागात महाराष्ट्र चेंबरच्या कामकाजाचा विस्तार करण्यासंदर्भात विशेष चर्चा करण्यात आली. याप्रसंगी श्री. विजय लोखंडे यांच्या स्टेशनरी निर्यात करणाऱ्या कारखान्यास भेट देऊन ललित गांधी यांनी पाहणी केली.






**Inaugurated National conference of Refcon 2024.at Ramada New Mumbai. Conference of Refrigeration, Air Conditioning and Cold Storage Industry. Hemant khadse, Sanjay Varma, Mukund Ranade, Aparna Kshirsagar, Deepa Raut were present.,**

# आयकर बदलाने सूक्ष्म व लघुउद्योग पेमेंट पद्धतीत नवा ट्विस्ट

ललित गांधी,  अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँन्ड अँग्रिकल्चर

देशाच्या अर्थव्यवस्थेत व प्रगतीत एक कोटीहून अधिक संख्येत असणाऱ्या आणि तीन, साडेतीन कोटी व्यक्तींना रोजगार देणाऱ्या सूक्ष्म आणि लघुउद्योग क्षेत्राचे विशेष महत्व आहे. जीडीपी चा पस्तीस टक्के वाटा असणारे हे क्षेत्र देशाच्या एकूण निर्यातीमधील ४५ टक्के वाटाही उचलत आहे. या क्षेत्राचे महत्व लक्षात घेऊन बराच काळ हे मंत्रालय खुद्द पंतप्रधान सांभाळत असत. सन २००६मध्ये या क्षेत्रातील समस्या दूर करण्यासाठी व जलद विकासासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास कायदा (एमएसएमईडी अँक्ट) करण्यात आला. सदरहू कायद्यानुसार एका खास एमएसएमई बोर्डाची आणि सल्लागार समितीचीही स्थापना करण्यात आली. या बोर्डावर आणि समितीवर उद्योजक संघटनांचे प्रतिनिधी असतात.  सांगायचा मुद्दा असा की, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी उचललेल्या पावलांमुळे काही चांगले परिणाम अनुभवास आले आहेत.

### पेमेंट समस्या

देशात ९३टक्के उद्योग हे सूक्ष्म आणि लघुउद्योग (मायक्रो अँन्ड स्मॉल) आहेत. यांच्याकडून मध्यम, मोठे, बहुदेशीय, सरकारी, निमसरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, अनेक महामंडळे व स्वायत्त शासकीय कंपन्या वगैरे सर्वजण खरेदी करीत असतात. त्यामधील अनेक खरेदिदार कित्येक महिने त्यांचे पेमेंट करत नसत व त्यामुळे या क्षेत्रात अनेकदा हातातोंडाला गाठ अशी परिस्थिती असते. असंघटित अशा या क्षेत्रातील उद्योगांचे संरक्षण करुन पुढे त्यांचा चांगला विकास होत जावा याकरीता कायद्यातून अशी तरतूद करण्यात आली की, सर्व खरेदिदारांनी त्यांचे पेमेंट ४५ दिवसात करावे. तसे न केल्यास त्याचे व्याज द्यावे नी असे व्याज आयकरातून वजावट म्हणून मिळणार नाही. काही वर्ष अनुभव घेऊन वादग्रस्त प्रकरणांचा जलद निर्णय देण्यासाठी विशेष यंत्रणाही उभी केली गेली. शेवटी सन २०२३ मध्ये (कायदा अमलात आल्यापासून १७ वर्षांनी) आयकर कायद्यात कलम ४३एच(बी)चा समावेश करुन अशी तरतूद करण्यात आली की, जर खरेदिदारांनी सूक्ष्म व लघुउद्योगांचे पेमेंट मुदतीत केले नाही तर ती सर्व रक्कम धंद्याचा खर्च म्हणून वजावट मिळणार नाही. ही तरतूद दिनांक एक एप्रिल २०२४ पासून अमलात येईल असेही निश्चित करण्यात आले. आता सन २०२३-२४ संपत असताना त्याची माहिती दिली गेल्यावर एकूणच उद्योग जगतात मोठी खळबळ माजली आहे. अनेक खरेदिदारांनी सूक्ष्म व लघुउद्योगांच्या ऑर्डर्स स्थगित अथवा रद्द करण्यास सुरवात केली आहे. त्यामुळे छोट्या उद्योजकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे; कारण त्यांचे अस्तित्व पणाला लागले आहे.

### व्यावहारिक अडचणी

प्रत्येक व्यापार, उद्योग, व्यवसाय क्षेत्रात खरेदी-विक्री नी वसूली याचे एक चक्र अनेक वर्षे चालू असते. उदा. कापड उद्योगात किमान तीन, चार महिने उधारी प्रथा (धारा) आहे. इंजिनीयरींग, ऑटोमोबाईल, केमिकल,इलेक्ट्रीक अशा उद्योगांतही  अशी प्रथा आहे. अगदी अन्नप्रक्रीया उद्योगातही दोन, तीन महिने उधारी असू शकते. अशा कालचक्रानुसार भांडवल व्यवस्था, उधारी फेड व्यवस्था, नवी खरेदी वगैरे होत असते. त्यात अचानक मोठा बदल करणे हे निश्चित जड जाणारे आहे. हळूहळू नव्या कायद्याची माहिती सर्वांपर्यंत पोहोचून त्यांना त्यानुसार आधिक भांडवल उभारणी करावी लागेल. म्हणजे या नव्या बदलाबाबत मोठी जागृती करावी लागणार आहे. धंद्याचे पेमेंट केले तरी जर ते उत्पन्न ठरणार असेल तर तारांबळ तर उडणारच ना? त्यासाठी खरे तर सर्व संबंधित घटकांना विश्वासात घेऊन ही चांगली तरतूद कशी राबविली जाईल हे नीट पाहिलं पाहिजे. त्यासाठी सरकारने सर्वांना अधिक वेळ देणे योग्य राहील.

### मुदतवाढ द्यावी

हा नवा बदल स्वागतार्ह असला तरी तो मनामनात उतरावा, रुजावा नी चांगल्या पद्धतीने अमलात यावा यासाठी भारत सरकारने त्याची मोठी प्रसिद्धी करावी, एमएसएमई मंत्रालयामार्फत जागृती करुन त्याचे महत्व लक्षात आणून द्यावे. सरकारने आपल्या अखत्यारीत असलेल्या उद्योगातून वेळेत पेमेंट आदर्श घालून द्यावा असे वाटते. असे केल्याने हा जो बदल करण्यात आला आहे त्याबाबत सर्व संबंधीताना पूर्ण माहिती मिळेल व त्यानुसार ते आपले व्यवहार करण्यास प्रवृत्त होतील. यासाठी याबदलाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२४ पासून सुरु न करता १ वर्ष लांबणीवर टाकावी.  महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँन्ड अँग्रिकल्चर या शिखर संस्थेने तातडीने केंद्रीय राज्यमंत्री श्री पंकज चौधरी यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर निवेदन सादर करून चर्चा केली आहे. त्यांनी याचा सकारात्मक विचार करण्याचे आश्र्वासन दिले आहे. तेव्हा केंद्र सरकारने आयकर कायद्यातील या नव्या कलमाची (४३एच(बी)) अंमलबजावणी लगेच न करता एक वर्ष पुढे ढकलावी अशी मागणी व अपेक्षा आहे.



# सूक्ष्म व लघुउद्योगांनी डिस्कॉउटिंग प्लॅटफॉर्मचा लाभ घ्यावा

## ललित गांधी, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स

देशातील सूक्ष्म व लघुउद्योग क्षेत्रातील उद्योजकांना त्यांनी पुरवठा केलेल्या मालाचे पैसे ४५ दिवसांच्या आत मिळावे असा एमएसइडी कायदा आहे. तथापि या क्षेत्रातील उद्योजकांना त्वरित पैसे मिळावेत यासाठी बिल डिस्कॉउंटिंग सोय असणारा प्लॅटफॉर्म भारत सरकारने उपलब्ध करून दिला आहे. केंद्र सरकारच्या सुचनेनुसार रिझर्व्ह बॅकेने व्यापारी घेणी देयके डिस्कॉन्ट पद्धती (ट्रेड रिसिव्हेबल डिस्कॉउंटिंग सिस्टिम) विकसित केली आहे. हा एक इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म असून त्यावर सर्व सरकारी कंपन्यांना नोंदणी करणे आवश्यक आहे. शिवाय ज्या कंपन्यांची वार्षिक उलाढाल पाचशे कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे त्यांनीही या प्लॅटफॉर्मवर अशी नोंदणी करायची आहे.

सदरहू प्लॅटफॉर्मवर नोंदणी केलेल्या कंपन्यांना जे सूक्ष्म आणि लघुउद्योग माल पुरवतात त्यांचे जे व्यापारी घेणे असेल त्याची बीले लगेच डिस्कॉन्ट करुन मिळतील व पैशांसाठी त्यांना ताटकळत थांबावे लागणार नाही. सूक्ष्म आणि लघुउद्योग यांच्या दृष्टिने ही खास उपयुक्त सोय असल्याने सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

**अधिकृत प्लॅटफॉर्म**

रिझर्व्ह बँकेने खालील ट्रेड प्लॅटफॉर्म अधिकृत असल्याचे जाहीर केले आहे.

(१) रिसीव्हेबल एक्सचेंज ऑफ इंडिया (RXIL) ( www.rail.in)

(२) इनव्हॉइस मार्ट (www.invoicemart.com)

(३) एम आय एक्सचेंज (www.mlxchange.com)

अनेक सूक्ष्म व लघुउद्योग विविध सरकारी महामंडळे, कंपन्यांना मालाचा पुरवठा करीत असतात. खूप मोठ्या राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांही ते वस्तू पुरवीत असतात. या सर्वांची नोंद वरील प्लॅटफॉर्मवर होणार असल्याने त्यांच्याकडून बिल डिस्कॉउंटिंग पद्धतीने लगेचच पैसे मिळू शकतील यासाठी हि व्यवस्था आहे. याविषयाबाबत उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी दि. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी एक पत्रही प्रसिद्ध केले आहे. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चरशी (०२५३-२५७७७०४, macciamaccia.org.in) संपर्क साधावा

# ‘उद्यम सांगली’ या औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन

**सांगली :** विश्रामबाग, नेमिनाथनगर, कल्पद्रु क्रीडांगणावर उद्यम सांगली औद्योगिक प्रदर्शन लोकसेवा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे भरविण्यात आले. या औद्योगिक प्रदर्शनाचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रीकल्चर सहप्रायोजक होते. २६ ते २९ नोव्हेंबर पर्यंत प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले.

उद्यम सांगली या औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनात सांगलीसह महाराष्ट्रातील १०० हून अधिक उद्योजक सहभागी झाले. उद्घाटन प्रसंगी प्रदर्शनाच्या आयोजक नीता केळकर, सुरेश पाटील, विनोद पाटील, संजय अराणके, भालचंद्र पाटील, रमेश आरवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रदर्शनात मशीन टूल्स, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रूमेंटेशन व ऑटोशन इक्विपमेंट, फार्मा आणि सपोर्टिंग इंडस्ट्रीजमधील कार्पोरेट लघु आणि मध्यम उद्योगांसाठी आहे.

अत्याधुनिक उत्पादने यंत्रे व उपकरणे विपणन आणि विक्रीसाठी ठेवण्यात आली. नव्याने सुरु होणाया उद्योग व्यवसायांना उभारी मिळणार आहे.

# महाराष्ट्रातील व्यापाराला चालना, नवीन गुंतवणुकीला प्रोत्साहन व महाराष्ट्रातील उत्पादनांना निर्यातीच्या संधी यासाठी हे प्रदर्शन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार - ललित गांधी

## मायटेक्स २०२४ संपन्न





महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चर याच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मायटेक्स २०२४' या औद्योगिक प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग बोर्डच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती आर. विमला यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईत झाले.

महाराष्ट्रातील व्यापाराला चालना नवीन गुंतवणुकीला प्रोत्साहन महाराष्ट्रातील उत्पादनांना निर्यातीच्या संधी यासाठी हे प्रदर्शन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे; असे मत यावेळी अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी व्यक्त केले.

'मायटेक्स' या प्रदर्शन मालिकेतील महत्वाची आवृत्ती आहे. पूर्वी मुंबई, पुणे आणि नाशिक येथे अशाप्रकारची प्रदर्शने आयोजित केली होती; ज्याला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. मराठवाडा, विदर्भसाहित महाराष्ट्राच्या ६ महसूल विभागामध्ये अशा प्रकारची प्रदर्शने भरवण्याचा निश्चय चेंबरने केला आहे असे ललित गांधी सांगितले.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग बोर्डच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती आर. विमला याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून बोलतांना म्हणाल्या 'मायटेक्स २०२४' व 'खादी ग्रामोद्योग मंडळाचे प्रदर्शन' दोन्ही बाजूला असल्याने ग्राहकांना हि एक पर्वणीच आहे आणि कौतुकास्पद गोष्ट आहे. यावेळी अनेक उद्योजक, मनवा नाईक, स्मिता तांबे, चित्रा खरे आदी सिनेतारका, चेंबरचे उपाध्यक्ष श्री. करुणाकर शेट्टी, सौ. शुभांगी तिरोडकर, श्रीकांत परब, माजी अध्यक्षा सौ. मीनल मोहाडीकर आणि आमंत्रित व चेंबरचे सभासद उपस्थित होते.







**महाराष्ट्र चेंबरच्या पालघर जिल्हा कार्यालयाच्या उदघाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना चेंबर अध्यक्ष ललित गांधी, समवेत आमदार हितेंद्र ठाकूर, माजी महापौर व उद्योजक राजीव पाटील, दीपा राऊत, एमएसएमइ डेव्हलपमेंट अँड फॅसिलीटेशन सेंटरचे सहाय्यक संचालक (मुंबई) सुनील खुजनारे आदी.**

# पालघरच्या रचनात्मक विकासासाठी महाराष्ट्र चेंबर कटिबद्ध - ललित गांधी

देशाची औद्योगीक व आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेला पालघर जिल्हा हा निसर्ग संपत्तीने नटलेला आणि तारापूरसारख्या औद्योगिक वसाहतीने काहीसा गजबजलेला असा आहे. मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोकसंख्येचा हा जिल्हा असला तरी ३ औद्योगिक वसाहत सहकारी सस्थांमुळे व खासकरून कृषी औद्योगिक, मासेमारी आदींच्या निर्यातीमुळे एक आपली स्वतःची वेगळी ओळख सांगणारा प्रदेश आहे. अशा या पालघरमध्ये द्रष्टे उद्योगपती शेठ वालचंद हिराचंद यांनी सन १९२७मध्ये स्थापन केलेल्या व आपल्या कार्याची शतक महोत्सवी वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चर या शिखर संस्थेचे पालघर जिल्हा कार्यालय येथील रचनात्मक विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहील अशी हमी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सदरहू कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी दिली. महाराष्ट्र चेंबरच्या रूपाने आणि मार्गदर्शनामुळे ज्या काही अनेक संधी नवउद्योजक, प्रस्थापित व्यापारी व कारखानदार, कृषी संबंधित सर्व व्यावसायिक आणि महिला उद्योजकांसह सर्वसामान्य सेवादारांना उपलब्ध होणार आहे त्या सर्वांचा पालघरवासियांनी लाभ घ्यावा आणि आर्थिक चळवळीचे एक उत्तम केंद्र म्हणून विकसित करावे असेही त्यांनी आवाहन केले.

महाराष्ट्र चेंबरसारख्या संस्था राज्याच्या आर्थिक विकासासाठी गेली अनेक वर्षे अभ्यासपूर्ण पद्धतीने सर्वांना सतत कार्यप्रवण करत असतात. महाराष्ट्रातीलच नव्हे तर जागतिकस्तरावरही ज्यांनी मोठे कर्तृत्व गाजवले आहे असे अनेक पदाधिकारी चेंबरमध्ये होते व आहेत. अशा आर्थिक चळवळीचा ध्यास असलेली महाराष्ट्र चेंबर हि संस्था पालघर येथे आपले कार्यालय सुरु करते आहे हि बाब विशेष महत्वाची आहे. त्यासाठी लोकप्रतिनिधी या नात्याने आवश्यक ते सहकार्य मी देईन अशा भावना आमदार हितेंद्र ठाकूर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना व्यक्त केले. वसई महानगर पालिकेचे प्रथम महापौर व उद्योजक राजीव पाटील यांनी आपल्या मनोगतामध्ये चेंबरच्या या कार्यालयामुळे येथील व्यापार उद्योग जगतातील ज्या काही विशिष्ट समस्या आहेत आणि विकासाचा नवा दृष्टिकोन आहे त्यासाठी चांगले मार्गदर्शन मिळेल व नवउद्योजकांना हे केंद्र आधारभूत होईल अशी अपेक्षा व्यक्त

केली.

कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून टिमाचे अध्यक्ष वेलजी गोगरी, पीटीएमएफचे अध्यक्ष जयसिंग संखे, जिमाचे अध्यक्ष अशोक ग्रोवर, एनकेसीसीएचे अध्यक्ष दीपक चौधरी, एचडीआयएलचे अध्यक्ष गौतम दलाल, वसई इंडस्ट्री.चे अध्यक्ष अनिल आंबर्डेकर, वसई विकास सहकारी बँक लिमिटेडचे शिरीष राऊत, महाराष्ट्र चेंबरच्या उपाध्यक्षा सौ.शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब उपस्थित होते तसेच पालघर जिल्ह्यामधील विविध औद्योगिक ,कृषी ,वित्त ,सहकारी, व्यापारी संस्थेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी चेंबरच्या उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची विस्तृत माहिती दिली. पालघर कार्यालयाचे कार्यपद्धती सांगितली. महिला उद्योजकांनी देखील चेंबरच्या एकूण कार्यामध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

**उद्योजकीय चर्चासत्र**

यानिमित्ताने उद्योजकांना विशेष माहिती आणि मार्गदर्शन करण्यासाठी एक चर्चासत्र झाले. या चर्चासत्रामध्ये एमएसएमइ मंत्रालयाच्या वतीने (भारत सरकार) लघुत्तम, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी ज्या विविध योजना जाहीर करण्यात आलेल्या आहेत. त्यांची सविस्तर माहिती एमएसएमइ डेव्हलपमेंट अँड फॅसिलीटेशन सेंटरचे सहाय्यक संचालक (मुंबई) सुनील खूनजारे यांनी यांनी दिली. तसेच एमएसएमइचे आर्थिक विकासातील योगदानही विशद केले. पावसकर यांनी विविध योजना बाबत चर्चा केली. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन सौ बिंदा कन्ह्यालकर आणि अपर्णा क्षीरसागर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन निलेश घरत यांनी केले. नियोजनामध्ये निकेत राऊत, तन्मय साखरे,सौ मानसी खानोलकर ,सौ प्रतिभा पाध्ये, अरुण राऊत यांनी सक्रिय सहभाग घेतला. पालघर जिल्हा कार्यालयास शुभेच्छा देवून कार्यक्रमाची सांगता झाली.

# ‘विकासवाडी एमआयडीसी’साठी लवकरच जमीन ताब्यात घेणार

## उद्योगमंत्री उदय सामंत; कोल्हापूरच्या उद्योगक्षेत्रवाढीला बळ देणारा निर्णय

कोल्हापूर : ‘कोल्हापूरचे उद्योगक्षेत्र वाढविण्यासाठी आवश्यक असणारे निर्णय आम्ही घेत आहोत. त्यातील विकासवाडी एमआयडीसीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आला आहे. तेथील २५० हेक्टर जमीन आम्ही लवकरच ताब्यात घेणार आहोत’, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कोल्हापुरात दिली. ‘शिवसंकल्प अभियानाबाबतच्या आढावा बैठकीसाठी कोल्हापुर मध्ये आले असता त्यांनी ही माहिती दिली.

मंत्री सामंत म्हणाले, ‘विकासवाडी येथील एमआयडीसीच्या प्रस्तावात तेथील जागा घेताना ती एनए रेट मध्ये का शेती दरामध्ये घ्यायची याबाबतची एक त्रुटी प्रशासनाकडून दाखविण्यात आली होती. आम्ही तेथील जागा शेती दरामध्ये घेतो. त्याबाबतचा प्रस्ताव आमच्याकडे आल्यानंतर त्या जागेचे पैसे वर्ग केले जातील. खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आबिटकर ज्या एमआयडीसींची मागणी केली होती, त्याला उच्च अधिकार समितीने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील दावोसचा दौरा ऐतिहासिक ठरेल. त्यातून महाराष्ट्रासाठी मोठे उद्योग येतील.’

**पाणबुडीबाबत तत्कालीन पर्यटन मंत्र्यांनाच विचारा**

मंत्री उदय सामंत म्हणाले, ‘कोका कोलाचा ३ हजार कोटीचा, २५० कोटींचा परफ्युअमचा आणि १०० कोटींचा आयुर्वेदिक उद्योग कोकणात आला त्याचा ऊहापोह विरोधकांनी केला नाही. मात्र, स्वतःचे पाप दुसऱ्यांच्या माथी मारण्याचे काम विरोधक करत आहेत. पाणबुडीबाबतचा उद्योग नव्हता तो पर्यटनातील प्रकल्प होता. दीपक केसरकर यांनी त्यासाठी २४ कोटींचा निधी मंजूर करून आणला होता.

पण, तत्कालीन पर्यटन मंत्र्यांनी त्याबाबत पुढे काहीच केले नाही. त्यांनी त्याचे टेंडर देखील काढले नाही. भविष्यात पाणबुडीचा प्रकल्प रत्नागिरी, सिंधुदुर्गध्ये होईल.’ नव्या ‘एमआयडीसी’ ची गरज का? कोल्हापूर जिल्हयात सध्या शिरोली, गोकुळशिरगाव, कागल-हातकणंगले पंचतारांकित, गडहिंग्लज, हलकर्णी, आजरा या एमआयडीसी आहेत. या सर्व एमआयडीसींमध्ये गेल्या पाच वर्षात एकूण २४६ भूखंडाचे वाटप औद्योगिक विकास महामंडळाने केले आहे. कोरोनानंतर नवे उद्योग सुरु करणे आणि सध्या कार्यान्वित असलेल्या उद्योगांचा विस्तार करण्यासाठी उद्योजकांचे प्रयत्न सुरु आहेत. त्यांना जागा उपलब्ध करुन देऊन उद्योगवाढीला चालना देण्यासाठी शाहूवाडी, विकासवाडी, आकिवाट-सैनिक टाकळी येथे नव्या एमआयडीसीची गरज आहे.

### प्रस्तावित एमआयडीसींचे क्षेत्र

- **शाहूवाडी :** ६४० हेक्टर
- **अकिवाट-सैनिक टाकळी :** ७४.९४ हेक्टर
- **विकासवाडी :** २५४ हेक्टर



**महाराष्ट्र चेंबरच्या बारामती विभागीय कार्यालयाचे उद्घाटन करताना उद्योग मंत्री उदय सामंत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी बारामती विभागीय कार्यालयाचे प्रमुख शरद सूर्यवंशी व अन्य मान्यवर.**

### बारामती कार्यालय शुभारंभ

# महाराष्ट्र चेंबरच्या बारामती विभागीय कार्यालयामुळे बारामतीच्या व्यापार उद्योगाला चालना मिळेल- उद्योगमंत्री उदय सामंत

बारामतीमध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे विभागीय कार्यालय सुरू झाले या कार्यालयाच्या माध्यमातून स्थानिक व्यापारी उद्योजकांना प्रोत्साहन मिळेल व उद्योगांना चालना मिळेल. इंद्रायणी, पवना नदी प्रदूषण मुक्त करणार, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील उद्योजकांसाठी रेड कार्पेट केले असून गर्जे मराठी या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला असून तो खूप महत्त्वाचा आहे. तसेच बारामतीकरांना एमआयडीसी चे विभागीय कार्यालय मंजूर करण्यात आले आहे व कामगारांच्या ईएसआईसी हॉस्पिटलसाठी आठ एकर जागा मंजूर केली असल्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्र चेंबरच्या बारामती विभागीय कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी सांगितले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रीकल्चरच्या बारामती विभागीय कार्यालयाचे उद्घाटन, उद्योग व व्यापार परिषदेचे उद्घाटन, विभागीय कार्यकारिणी पदग्रहण समारंभ उद्योग मंत्री उदयजी सामंत यांच्या हस्ते व उपस्थित संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. ललित गांधी उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उद्योगमंत्री उदय सामंत, उपाध्यक्ष रवींद्र मानगावे उपाध्यक्ष एस. डी. परब, बारामती विभागाचे विभागीय चेअरमन शरद सूर्यवंशी, व्हाईस चेअरमन शिवाजी निंबाळकर, सुशीलकुमार सोमानी, महावितरण कंपनी बारामती परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनील पावडे एम आयडीसी पुणे झोनचे मुख्य अभियंता नितीन वानखेडे, भारत फोर्स लिमिटेड बारामतीचे वरिष्ठ उपाध्यक्ष संजय अग्रवाल, वालचंदनगर इंडस्ट्रीज लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष धीरज केसरकर सरकार्यवाह सुरेश घोरपडे उपस्थित होते. महाराष्ट्र चेंबरचे बारामती विभागीय अध्यक्ष शरद सूर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

याप्रसंगी उत्कृष्ट उद्योजकता पुरस्कार माणिकराव येळे ,जयंत इंगोले, सुरेश परकाळे अप्पासाहेब शिंदे, आर ए मुलाणी उद्योग मित्र पुरस्कार सुनील पावडे, मुख्य अभियंता महावितरण नितीन वानखेडे मुख्य अभियंता संजय अग्रवाल, Bharth forge धीरज केसरकर, नीलेश मोढवे विजय पेठकर, विलास आडके, हनुमंतराव पाटील यांचा सत्कार उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आला तर महिला दिनाचे औचित्य साधून उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार महिला उद्योजक सौ जयश्री जाधव, सौ संगीता मसवडे, सौ सुप्रिया बोबडे, सौ मेघा भोईटे, सौ आरती खराडे, सुप्रिया बर्गे, राधिका दराडे, यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारणी सदस्य रणजीतसिंग आनंद, संजय आराणके,रमेश आरवडे, सर्जेराव नलावडे, अँड. केशव कोरगावकर, केतन शहा, निलेश घरत, प्रवीण घरत आदिंसह व्यापारी उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रफुल्ल तावरे, किशोर शहा, मनोज तुपे, राहुल शहा यांच्यासह स्थानिक पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले

# Women Entrepreneurs Network Maharashtra- E-Newsletter चा

## उद्योगमंत्री ना. श्री. उदयजी सामंत यांच्या हस्ते शुभारंभ

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर, महिला उद्योजकता समितीच्या अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या Women Entrepreneurs Network Maharashtra- E-Newsletter चा महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना. श्री.उदयजी सामंत यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष श्री. ललितजी गांधी होते.

महिला उद्योजकता समिती ही महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अंतर्गत राज्यभरातील महिलांसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असते. महाराष्ट्र चेंबर, महिला उद्योजकता समितीतील सदस्यांचा व राज्यातील इतर महिलांचा उद्योग व्यवसाय जास्तीत जास्त लोकांपर्यंत E-Newsletter च्या माध्यमातून नेटवर्किंग वाढवून अधिक वृद्धिंगत व्हावा व उद्योग व्यवसायाची सर्वांगीण माहिती पोहोचावी या अनुषंगाने महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील यांच्या संकल्पनेतून Women Entrepreneurs Network Maharashtra- E-Newsletter ची सुरवात करण्यात आली.

सदर कार्यक्रमाला उपाध्यक्ष श्री. रविंद्र मानगावे, श्री.



श्रीकृष्ण परब, बारामती विभागाचे विभागीय चेअरमन श्री.शरद सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होत.

ना.उदयजी सामंत यांनी महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ.संगीता पाटील को– चेअरपर्सन सौ. कविता देशमुख, समिती सदस्या यांच्या कार्याचे कौतुक करून भरभरून शुभेच्छा दिल्या.

E-Newsletter बाबत अधिक माहिती साठी चेतन निंबोळकर – मो. नं.– ७७९८३०६५१६ समन्वयक, यांच्याशी संपर्क साधावा. ई–मेल – wenm.enewslettergmail.com

# ललित गांधी यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास भेट

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ चे कुलगुरू श्री. संजीव सोनवणे यांची नाशिक येथे विद्यापीठाच्या मुख्यालयात भेट घेतली.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या दरम्यान विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षणामध्ये सहकार्य करण्यासाठी सामंजस्य करार करण्यावर विस्तारपूर्वक चर्चा झाली. मंगळवार दिनांक १२ मार्च रोजी विद्यापीठांचे कुलगुरू व उच्च शिक्षण मंत्री यांची मंत्रालयामध्ये बैठक होणार आहे, त्याप्रसंगी हा सामंजस्य करार करावा असे कुलगुरू श्री संजीव सोनवणे यांनी सुचवले. त्यांच्या या प्रस्तावास चेंबरच्या वतीने तत्वतः स्वीकृती दिली आहे.



# कोल्हापूर विमानतळास राजाराम महाराजांच्या नावासाठी केंद्राकडे पाठपुरावा करू : एकनाथ शिंदे

## ललित गांधी यांना दिले आश्वासन



**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना ललित गांधी सोबत संजय मंडलिक, धैर्यशील माने, प्रकाश आवाडे, राजेश पाटील यड्रावकर, विज्ञान मुंडे इत्यादी मान्यवर.**

**कोल्हापूर :** छत्रपती राजाराम महाराज यांनी स्थापन केलेल्या कोल्हापूर विमानतळाचे विस्तारीकरणासह लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते झालेले आहे. या विमानतळाचे संस्थापक छत्रपती राजाराम महाराजांचे नाव विमानतळास देण्यासाठी आपण पंतप्रधानांच्याकडे पाठपुरावा करू अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ललित गांधी यांना दिली.

कोल्हापूर विमानतळाच्या नवीन टर्मिनल च्या उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर ललित गांधी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली राज्याच्या व्यापार, उद्योग क्षेत्राच्या वतीने विमानतळाच्या लोकार्पणानिमित्त त्यांना धन्यवाद देऊन त्यांचा सत्कार केला व या विमानतळास छत्रपती राजाराम महाराजांचे नाव देण्यासाठी गेल्या वीस वर्षापासून केलेल्या प्रयत्नांची माहिती देऊन सर्व स्तरावर हा निर्णय झाला असून त्याची अंमलबजावणी तात्काळ होण्यासाठी आपण पंतप्रधानांच्याकडे शिफारस करावी अशी मागणी ललित गांधी यांनी मुख्यमंत्र्यांच्या कडे केली,

त्याला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन आपण पंतप्रधानांच्याकडे याविषयी पाठपुरावा करू व कोल्हापूर विमानतळास छत्रपती राजाराम महाराजांचे नाव देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करून घेऊ असे आश्वासन दिले.

ललित गांधी यांनी याप्रसंगी राज्यातील विविध विमानतळांच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारकडे दिलेल्या प्रस्तावावर लवकरात लवकर कार्यवाही करावी अशी मागणी ही मुख्यमंत्र्यांच्या कडे केली.

याप्रसंगी खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आवाडे, आमदार राजेश यड्रावकर, विज्ञान मुंडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



# महाराष्ट्र चेंबरचे नवे रचनात्मक पाऊल - बिझनेस फोरममुळे व्यापाराच्या अफाट संधी उपलब्ध - ललित गांधी







**मासिया बिझनेस नेटवर्किंग फोरमचे उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष ललित गांधी वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल कुमार लोढा माजी अध्यक्ष संतोष मंडलेच्या उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी उपाध्यक्ष रवींद्र मानगवे उपाध्यक्ष एचडी परब उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा शाखा चेअरमन संजय सोनवणे बिजनेस फोरमचे चेअरमन दत्ता भालेराव.**

नाशिकच्या पवित्र भूमीत अर्धशतकापूर्वी महाराष्ट्र चेंबरची उत्तर महाराष्ट्र शाखा सुरु झाल्याने विकासनोमुख कार्याचा एक रचनात्मक पाया रचला गेला. गेल्या पाच दशकांमध्ये एकूणच झालेले आर्थिक क्षेत्रालातील स्थित्यांतरे आणि काळाची नवी पाऊले लक्षात घेऊन याच पवित्र भूमीत व्यापार विकासाच्या आणि वाढीच्या वैयक्तिक आणि समूह स्तरावर संधी देणाऱ्या मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमच्या माध्यमातून एक नवे सशक्त पाऊल पुन्हा उचलले गेले आहे. यामुळे महाराष्ट्र चेंबरच्या सभासदांना केवळ महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात आणि परदेशातही व्यापार संपर्क स्थापित करता येणार आहे. नाशिकनंतर महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये असे नेटवर्किंग फोरम सुरु करण्याची योजना असल्याने एकूणच राज्याच्या व्यापार वृद्धीला मोठी चालना मिरळेल व त्यातून मोठा विकासही साधेल असे प्रतिपादन राष्ट्रीय उद्योजक व चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमचे उदघाटन करतांना केले. उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालयाने नेहमीच आपला वर्धापन दिन विशेष अशा कार्यातून साजरा केला आहे. त्यात आजचा वर्धापन दिन हा एका अर्थाने नवा इतिहास घडविणारा आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

सुरवातीला उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालयाचे चेअरमन संजय सोनवणे यांनी स्वागत केल्यावर उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी आपल्या प्रास्ताविकातून चेंबरने दिलेल्या महत्वाच्या कार्याचा आढावा घेतला. व्यापार उद्योगातील समस्या सोडवीत असताना सभासदांचा व्यापार वाढावा यासाठी सुरु करत असलेल्या मासिआ नेटवर्किंग बिझनेस फोरममुळे एक नवा अध्याय लिहिला जात आहे असेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर या फोरम चे चेअरमन दत्ता भालेराव यांनी फोरम संदर्भातील सविस्तर माहिती देऊन फोरममुळे कसा व्यापार वाढतो यासंदर्भांतील विविध उदाहरणे दिली. सततचा

## मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमच्या सदस्यांचा विशेष सत्कार

दत्ता भालेराव, राजाराम सांगळे, संजय सोनवणे, राजेश मालपुरे, रवींद्र झोपे, राजेंद्र कोठावदे, सचिन शहा, रवि जैन, बाळासाहेब आंब्रे, संदिप सोमवंशी, रुपेश कणसे, वर्षा मनोज सोमय्या, भरत येवला, अमित पवार, लोकेश लुणावत, ललित नहार, गौरव सोनार, हेमंत कांकरिया, निलेश दुसाने, विलास शिरोरे, आदि सदस्यांचा अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
एकनाथ अमृतकर, विजय बाविस्कर, मनिष रावल, निवृत्ती कापसे यांचाही सत्कार करण्यात आला

संपर्क ठेऊन फोरमच्या सभासदानी डोळसपणे परस्परांशी विचारातून संधी साधने यासंदर्भातही त्यांनी अनुभव कथन केले. पुढील काही महिन्यात महाराष्ट्रात सर्वत्र असे फोरम कार्यरत केले जाणार आहेत अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांनी फोरमच्या कार्याला शुभेच्छा देत सर्वांनी त्यात मोठा सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

यावेळी महिला समितीतर्फे महिला उद्योजिका इ न्युज लेटर यासंदर्भांत महिला समितीच्या चेअरपर्सन सौ संगीता पाटील यांनी माहिती दिली आणि त्याचे प्रकाशन चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. चेंबरच्या सभासदांनाही या इ बुलेटिन मध्ये आपला सहभाग नोंदवता येईल असेही सौ. पाटील यांनी स्पष्ट केले. कार्यकारिणी सदस्य सचिन शहा यांनी आभार मानले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरच्या व्यवस्थापन समितीची आणि कार्यकारी मंडळाची खास सभाही नाशिकला झाली. या सभांमधून व्यापार उद्योग क्षेत्राला जाणवणाऱ्या सद्य समस्यांवर विचार विनिमय करण्यात आला. यानिमित्ताने पूर्वध्यक्ष संतोष मंडलेचा,उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, उपाध्यक्ष एस. दि. परब, उपाध्यक्ष नितीन बंग, उपाध्यक्ष तनसुख झाबंड, विश्वस्त विलास शिरोरे, सरकार्यवाह सुरेश घोरपडे व नाशिक मुंबई, ठाणे, कोकण, धुळे, जळगाव, सांगली, पुणे आदी भागातील चेंबरचे विविध समित्यांचे अध्यक्ष, कार्यकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिकरोड येथे स्टार्टअप कार्यशाळा





महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चर व श्री जैन स्थानकवासी श्रावक संघ नाशिकरोड यांच्या संयुक्त विद्यमाने व कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अनिसा तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली शासनाच्या कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहकार्याने शनिवार दि. ४ मे २०२४ रोजी जैन भवन, नाशिकरोड येथे नवउद्योजकता कार्यशाळा (स्टार्टअप) झाली.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, कार्यकारिणी सदस्य हेमंत कांकरिया, विकास पगारे, जैन स्थानकवासी श्रावक संघाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र मंडलेचा, सेक्रेटरी योगेशकुमार भंडारी, रणजीतसिंग आनंद उपस्थित होते.

मार्गदर्शक श्री. श्रीकांत पाटील यांनी नवउद्योजकता (स्टार्टअप) हि संकल्पना का, हि नवीन कल्पना आहे का, आणि असेल तर लोकांनी आधी का केली नाही? बाजार किती मोठा आहे? स्टार्टअपच्या बाजारपेठेचा आकार त्यांच्या संधीचे प्रमाण, शासनाचे धोरण, योजना व नवउद्योजकता (स्टार्टअप ) कसे कार्य करतात, नवउद्योजकाला (स्टार्टअप) फंडिंग प्रारंभिक टप्पे, निधी कसा दिला जातो यावर सविस्तर मार्गदर्शन नवउद्योजकता (स्टार्टअप) कार्यशाळेत केले.

सुरवातीला स्वागत कार्यकारी सदस्य हेमंत कांकरिया यांनी केले नंतर शाखा चेअरमन संजय सोनवणे आणि चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी कार्यकारी सदस्य विकास पगारे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सहसचिव अविनाश पाठक यांनी केले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे सल्लागार दिलीप साळवेकर, मनिष कांकरिया, दीपक कुमठ, रमण धाडीवाल, राखी कांकरिया, स्मिता मुंडे, भावना रिपोटे, विनोद बाफना, पुनीत कांकरिया, मते, भरत भोई, प्रीतम संघवी, विजय सबनीस, कौस्तुभ सबनीस, सचिन छाजेड, ललित सुराणा, कर्णावट, जोशी आदिंसह नाशिकरोड परिसरातील व्यापारी, उद्योजक, नवयुवक, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दावोसमध्ये महाराष्ट्राने केले ३ लाख ५३ हजार कोटींचे विक्रमी सामंजस्य करार

**१ लाख कोटींच्या गुंतवणुकीसाठी स्वारस्य; २ लाख रोजगार निर्मिती होणार**
**पोलाद, आयटी, हरित उर्जा, कृषी, लॉजिस्टिक्, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात मोठी गुंतवणूक**

**मुंबई :** स्वित्झर्लंडमधील दावोसमध्ये सुरु असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत दोन दिवसांत महाराष्ट्राने ३ लाख १० हजार ८५० कोटीचे सामंजस्य करार केले असून उद्या ४२ हजार ८२५ कोटींचे करार होत आहेत. अशा रितीने ३ लाख ५३ हजार ६७५ लाख कोटींचे विक्रमी सामंजस्य करार करीत असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. याव्यतिरिक्त १ लाख कोटींच्या गुंतवणुकीत उद्योगांनी स्वारस्य दाखवले असल्याने राज्यावर जागतिक उद्योग आणि गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांचे आभारही मानले. या करारांमुळे राज्यात २ लाख इतक्या मोठ्या संख्येने रोजगार निर्मिती होणार आहे.

**गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा अधिक वाढ**

हे सामंजस्य करार केवळ कागदावर न राहता त्याची प्रत्यक्ष अंलबजावणी जलदगतीने करण्याचा आमचा भर आहे. गेल्या वर्षी दावोस येथे झालेल्या करारांपेक्षा यंदा अधिक गुंतवणुकीचे सामंजस्य करार होत आहेत, असे सांगतानाच उद्योगपूरक, कुशल मनुष्यबळ आणि झटपट निर्णय घेणारे लोकाभिमुख राज्य अशी महाराष्ट्राची प्रतिमा जगभरात असल्याचे याठिकाणी जाणवल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

दावोस परिषदेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १६ तारखेस ६ उद्योगांसमवेत १ लाख २ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे करार करण्यात आले. त्यातून २६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. १७ जानेवारीस ८ उद्योगांशी २ लाख ८ हजार ८५० कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले. त्यातून १ लाख ५१ हजार ९०० रोजगार निर्मिती होईल. उद्या ६ उद्योगांशी ४२ हजार ८२५ कोटींचे करार होत असून त्यातून १३ हजार रोजगार निर्माण होतील असे मुख्यमंत्री म्हणाले.



## गुंतवणूक करार झालेल्या उद्योगांची माहिती व रोजगार पुढीलप्रमाणे

१६ जानेवारी – आयनॉक्स एअर प्रोडक्ट २५ हजार कोटी (५ हजार रोजगार ), बी सी जिंदाल ४१ हजार कोटी (५ हजार रोजगार), जेएसडब्ल्यू स्टील २५ हजार कोटी (१५ हजार रोजगार), एबी इन बेव्ह ६०० कोटी (१५० रोजगार), गोदरेज एग्रोव्हेट १००० कोटी (६५० रोजगार) अमेरिका स्थित डेटा कंपनी १० हजार कोटी (२०० रोजगार), १७ जानेवारी – अदानी ग्रुप ५० हजार कोटी (५०० रोजगार), स्विस इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स११५८ कोटी (५०० रोजगार), इंडियन ज्वेलरी पार्क ५० हजार कोटी (१ लाख रोजगार), वेब वर्क्स ५हजार कोटी (१०० रोजगार), लॉजिस्टिकमधील इंडोस्पेस,इएसआर, केएसएच, प्रगती, यांची मिळून ३५०० कोटी (१५ हजार रोजगार), नसर्गिक संसाधानातील कॉन्गलोमिरेट कंपनी २० हजार कोटी (४ हजार रोजगार)

**महाप्रीत ने हरित उर्जा प्रकल्पांसाठी ५६ हजार कोटींचे करार केले. ते पुढीलप्रमाणे आहेत**

अमेरिकास्थित प्रेडीक्शन्स समवेत ४ हजार कोटी, युरोपधील हिरो फ्युचर एनर्जी मध्ये ८ हजार कोटी, जर्मनीच्या ग्रीन एनर्जी ३००० मध्ये ४० हजार कोटी, व्हीएचएम ओान समवेत ४ हजार कोटी १८ जानेवारीस पुढील सामंजस्य करार होतीलसुरजागड इस्पात १० हजार कोटी (५ हजार रोजगार),

कालिका स्टील ९०० कोटी (८०० रोजगार), मिलियन स्टील २५० कोटी (३०० रोजगार), ह्युंदाई मोटर्स ७ हजार कोटी (४ हजार रोजगार), कतारची एएलयु टेक समवेत २०७५ कोटी (४०० रोजगार), सीटीआरएल एस ( CTRL S) ८६०० कोटी (२५०० रोजगार)

**१ लाख कोटींचे गुंतवणूक स्वारस्य**

याशिवाय विविध उद्योगांनी १ लाख कोटींचे गुंतवणूक स्वारस्य दाखविले असून यात अर्सेलर निप्पॉन मित्तल तसेच सौदी, अरब, ओमान येथील उद्योगांचा समावेश आहे.

विविध उद्योग समूहांशी चर्चा यशस्वी दावोस येथील महाराष्ट्र दालनात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विविध उद्योग समुहांचे प्रमुख भेटले. त्यामध्ये अदानी समूहाचे संस्थापक आणि अध्यक्ष गौतम अदानी यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महाराष्ट्र दालनात भेट घेतली. यावेळी त्यांच्यात महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा क्षेत्र, गुंतवणुकीच्या संधी आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

ज्येष्ठ उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांच्यासोबत बैठक झाली. यावेळी भविष्यातील गुंतवणकीच्या सहकार्याबाबत चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर लिंकस्टाईनचे युवराज यांच्याशी देखील औद्योगिक गुंतवणुकीबाबत संवाद साधण्यात आला. फ्रेंच वाणिज्य कंपनी असलेल्या लुईस ड्रेफसचे मुख्य धोरणकर्ते अधिकारी थॉस कौटॉडियर आणि मुख्य वित्त अधिकारी पॅट्रीक टूअर यांच्या समवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बैठक झाली. महाराष्ट्रामध्ये औद्योगिक विस्ताराबाबत यावेळी चर्चा झाली. दक्षिण कोरीयाच्या ग्योंग्गी प्रांताचे गव्हर्नर किम डाँग यिओन यांची मुख्यमंत्र्यांसमवेत आज भेट झाली. उत्पादन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील दक्षिण कोरियाचे कौशल्य आणि कुशल मनुष्यबळाच्या क्षेत्रातील भारताची ताकद यांच्यात समन्वय करून या क्षेत्रात महाराष्ट्रात मजबूत पायाभरणी करण्यावर यावेळी भर देण्यात आला. चेक प्रजासत्ताक स्थित विटकोविट्झ ॲटोमिका कंपनीचे चेअरमन डेव्हीड क्रोबोक यांनी आज मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यामध्ये छोटे मॉड्युलर अणुभट्टी तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधीबाबत चर्चा झाली. या करारांच्या वेळी उद्योगमंत्री उदय सामंत देखील मुख्यमंत्र्यांसमवेत उपस्थित होते.

## संरक्षण क्षेत्रातील उद्योग विकास वाढीसाठी चेंबर करणार विशेष प्रयत्न हिंदुस्तान एरोनिटिकल लिमिटेडतर्फे इंडस्ट्री मीट २०२३ संपन्न

**नाशिक :** हिंदुस्तान एरोनिटिकल लिमिटेड, नाशिक तर्फे 'आत्मनिर्भर भारत' या विषयावर इंडस्ट्री मीट ५ डिसेंबर रोजी संपन्न झाली. या इंडस्ट्री मीटमध्ये भारत आणि रशियन उत्पादकांचा सहभाग होता.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखेचे शाखा चेअरमन संजय सोनवणे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली व संरक्षण क्षेत्रात उत्तर महाराष्ट्रातील उद्योगांना विविध संधी उपलब्ध होत असून रशियन उद्योगांबरोबर भारतीय उद्योगांनी संयुक्तरित्या काम करून संरक्षण क्षेत्रातील उत्पादन तयार करण्यात भारताला आत्मनिर्भर करावे असे सांगितले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सअशा सर्व उपक्रमासाठी कायम एचएएल आणि सर्व डिफेन्ससंबंधी उद्योग वाढीकरिता पुढाकार घेत राहील. तसेच संरक्षण क्षेत्रात सुट्ट्या भागाचा पुरवठा करण्यासाठी उपलब्ध संधी या विषयी मोठ्या प्रमाणावर सदस्यांना माहिती देण्यासाठी कायम तत्पर राहील. संरक्षण क्षेत्रातील उद्योग विकास वाढीसाठी चेंबर विशेष प्रयत्न करेल, असे त्यांनी आश्वासन दिले.

तसेच हिंदुस्तान एरोनिटिकल लिमिटेडच्या स्थापन करण्यात शेठ वालचंद हिराचंद यांच्या योगदानाविषयी माहिती दिली.




याप्रसंगी संरक्षण क्षेत्रातील विविध संधी संदर्भात सकारात्मक चर्चा झाली. भारतीय व रशियन उद्योजकांनी एकत्रित रित्या काम करून संरक्षण क्षेत्रात प्रगती करण्यासंदर्भात सकारात्मकता दर्शविली. मेक इन इंडिया संकल्पनेला पुढे नेण्यासाठी इंडस्ट्री मीट महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास सहभागी उद्योजकांनी व्यक्त केला. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य मनिष रावल व उद्योजक उपस्थित होते.

# निर्यात समस्यांसाठी टास्कफोर्स नियुक्ती स्वागतार्ह - ललित गांधी



**मुंबई :** देशाच्या अर्थ व्यवस्थेध्ये निर्यातीचे स्थान अत्यंत महत्वाचे असते. आपल्या देशातून जगभरातील अनेक देशांना विविध वस्तूंची तसेच सेवांची निर्यात केली जाते. निर्यातीच्या संदर्भात देशामध्ये महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. देशातील एकूण निर्यातीमध्ये एमएसएमइ क्षेत्राचा वाटा आता ५० टक्क्यांपर्यत पोहचला आहे. ई कॉर्सुळे यामध्ये मोठी वाढ अपेक्षित असून राज्यातील कानाकोपऱ्यातील शेतकरी, व्यापारी, उद्योजक या क्षेत्राकडे वळू लागले आहे, असे असले तरी या क्षेत्रामध्ये आजही अनेक समस्या आणि अडचणी जाणवत आहेत. या अडचणी आणि निर्यात व्यापार विषयक असलेली बंधने जी इतर देशामध्ये असून त्याचा सामना भारतातील निर्यातदारांना करावा लागतो त्याबाबत नेक्या समस्या व बंधने कोणती आहेत आणि ती कशी दूर करता येतील याचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने एक कार्यदल (टास्कफोर्स) स्थापन केले आहे. वाणिज्य मंत्रालयाने उचलेले हे पाऊल विशेष गरजेचे होते. त्यामुळे निर्यातदार व्यापारी व उद्योजकांना आपले अनुभव व निर्यात वाढीच्या दृष्टीने उपयुक्त सूचना करता येणार आहे. यासाठी वाणिज्य उद्योगमंत्री पियुष गोयल हे अभिनंदनास पात्र आहेत.

तांत्रिक बंधने -नियम आयात निर्यात व्यापारामधील लागणारे कर हा एक मोठा विषय आहे. याचप्रमाणे प्रत्येक देशाची यासंदर्भात वेगवेगळी तांत्रिक बंधने, नियमन, वस्तू संदर्भातली परीक्षण व दर्जा, प्रमाणीकरण अशा अनेक बाबींसमवेत कोटा पद्धतीही असू शकते. अशा बंधनांुळे भारतातील निर्यातदारांना विविध वस्तूंच्या संदर्भात आणि विविध देशांमध्ये हे प्रश्न उदभवतात. खासकरून अन्न पदार्थ, कृषी प्रक्रिया वस्तू, रसायने, औषधे, वस्त्रे, औद्योगिक उत्पादने, इलेक्ट्रिकल वस्तू, गृहोपयोगी वस्तू, यंत्रसामग्री यासंदर्भातील या अडचणी विशेष आहेत. यासर्वांबाबत सखोल विचार विनिमय करून या अडचणी कशा दूर होतील आणि त्यामुळे विविध देशातील भारताची निर्यात कशी वाढती राहील, असे कार्य व त्यासंबंधांतील शिफारशी हा कृती दल करणार आहे.

चेंबरचे प्रयत्न महाराष्ट्रातील आणि पर्यायाने देशातील निर्यात व्यापार कसा वाढेल, यासाठी गेली नऊ दशके महाराष्ट्र चेंबर प्रयत्न करीत आहे. निर्यातदारांना या व्यापारात लागणारे सर्व प्रकारचे मार्गदर्शन केले जाते. तसेच' सर्टिफिकेट ऑफ ओरिजन' ही सेवा दिली जाते. चेंबरचे अनेक सदस्य जगभर निर्यातीमध्ये गुंतलेले असून त्यांना चेंबरच्या माध्यमातून नवनवीन बाजापेठ उपलब्ध आहेत, याचेही मार्गदर्शन केले जाते. या सर्व निर्यातदारांच्या नेक्या समस्या व अडचणी यासंदर्भातील एक अभ्यासपूर्ण सविस्तर निवेदन चेंबरच्या वतीने या कृती दलाला सादर केले जाणार आहे.

महाराष्ट्रातील सर्व निर्यातदारांनी त्यांच्या निर्यात विषयक अडचणी व सूचना चेंबरला लेखी स्वरुपात (maccia@maccia.org.in) या ई मेलवर कळवाव्यात, असे आवाहन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले आहे. शिवाय निर्यात विषयक माहिती व प्रशिक्षणा बाबतही नवउद्योजकांनी आणि इच्छुकांनी महाराष्ट्र चेंबरशी जरूर संपर्क करावा. अधिक माहितीसाठी ( दूरध्वनी क्र. ०२५३- २५७७७०४/ ०२५३-२५७५०५३) वर संपर्क साधावा.



**पॉवरलूम क्लॉथ अँण्ड यार्न मर्चट असोसिएशनचे अध्यक्ष रामपालजी भंडारी यांच्या हस्ते महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपस्थितात कमलकिशोर राठी, ओप्रकाश दरक, उपाध्यक्ष रामअवतार सोनी, कोषाध्यक्ष श्रीकांत बंग, कार्यकारिणी सदस्य सीताराम बजाज आदी मान्यवर**

# नवीन वस्त्रोद्योगासाठी वीज उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्नशील : ललित गांधी

## पॉवरलूम क्लॉथ अँण्ड यार्न मर्चंट असोसिएशनतर्फे आयोजित चर्चासत्र संपन्न

**इचलकरंजी :** वीजेचा तुटवडा असल्याने महाराष्ट्र सरकारने नवीन उद्योगांना वीज देणे बंद केले आहे. वीजेचा प्रश्न ही सर्वासमोरची गंभीर समस्या आहे. ती सोडविण्यासाठी महाराष्ट्र चेंबर सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे. त्यासह उद्योजक, व्यापारी बांधवांनी रूफटॉप सोलर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविल्यास वीज कंपनीचा वीजेचा भार कमी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, अॅण्ड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. पॉवरलूम क्लॉथ अँण्ड यार्न मर्चंट असोसिएशनच्या वतीने आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रामपालजी भंडारी होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, अॅण्ड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, व्यापारी, उद्योग क्षेत्रात अनेक संघटना स्थापन झाल्या आहेत. मात्र या सर्व संघटना संघटित

नाहीत. त्यामुळे प्रथम संघटित होणे काळाची गरज आहे. व्यापारी, उद्योजक सरकारला कोट्यावधी रुपयांचा कर देतात.

मात्र त्या तुलनेत सरकारकडून व्यापारी, उद्योजकांना सुविधा मिळत नाहीत. त्यामुळे सर्वांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. केवळ व्यापारी म्हणजे कर ही सरकारची भूमिका दिसते. त्यामुळे ताकदीने संघटित झाल्यास अनेक प्रश्न सुटू शकतात.

वित्त मंत्री सोबत महाराष्ट्र चेंबरची सहा महिन्यातून एकदा बैठक होते. या बैठकीत व्यापारी आणि उद्योजकांच्या विविध मागण्या मांडल्या जातात. त्यामध्ये आपलेही काही प्रश्न मांडता येतील.

त्यातून ठोस मार्ग काढणे शक्य आहे. तसेच केंद्र सरकारने व्यापारी पेन्शन योजनेच्या संकल्पनेला तत्वत: मान्यता दिली आहे. ही योजना अंमलात आल्यास निश्चितच फायदा होईल. या चर्चासत्रात अशोककुमार बाहेती यांनी जीएसटीमध्ये भरण्यात येणारा आयटीसी ४ फॉर्म रद्द करण्यासाठी चेंबरने प्रयत्न करावेत, अशी मागणी करुन इचलकरंजीत वीजेचा प्रश्न गंभीर होत असल्याचेही मांडले. चार्टर्ड अकाउंटट दीपक भराडीया यांनी एमएसएमईच्या नियमांची माहिती सांगितली. सरकारने घेतलेले निर्णय, त्यांची अंलबजावणी आणि व्यापारी बंधूची भूमिका कशी असावी, हे स्पष्ट केले. या वेळी पॉवरलू क्लॉथ अँण्ड यार्न मर्चंट असोसिएशनने महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. त्यासह अडते व्यापारी असोसिएशनचे प्रकाश छाजेड, सुरेशजी जैन यांच्यासह अन्य मान्यवरांनी त्यांचा सत्कार केला. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरचे काऊन्सिल मेंबर नितीन धूत यांचाही सत्कार झाला. चर्चासत्रात उपाध्यक्ष रामअवतार सोनी, कोषाध्यक्ष श्रीकांत बंग, कार्यकारिणी सदस्य सीताराम बजाज, नितीन तोष्णीवाल, रामसुख जाजुदा, माजी अध्यक्ष चंदनमल मंत्री, घनशाम इनानी, कपडा कमिटीचे सदस्य तुलसीराम खंडेलवाल, लालचंद गट्टाणी यांच्यासह अन्य पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे सचिव ओप्रकाश दरक यांनी सूत्रसंचालन केले. कमलकिशोर राठी यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र चेंबरतर्फे शेतकऱ्यांना अनेक योजनांचा फायदा शक्य : ललित गांधी

## शेतकरी उद्योजकता विकास मेळाव्यात प्रतिपादन




**महाराष्ट्र चेंबरतर्फे हंसराजजी अग्रवाल यांच्या स्मरणार्थ शेतकरी उद्योजकता विकास मेळाव्यात बोलताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. उपस्थितात उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, चेंबरच्या महिला समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, अनिल लोढा, गव्हर्निंग कौऊन्सिल मेंबर पवन अग्रवाल, अरुण नावरकर यांच्यासह आदी मान्यवर.**

**धुळे :** देशातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यात महाराष्ट्र चेंबरचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अनेक योजनांचा फायदा मिळू शकतो. सध्या शेती करणे आव्हानात्मक बनले असून शेतीसोबत उद्योग व्यवसाय काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स,इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चर, मुंबई आणि धुळे व्यापारी महासंघाच्या सहकार्याने दिवंगत हंसराजजी अग्रवाल यांच्या स्मरणार्थ शेतकरी उद्योजकता विकास मेळावा शनिवारी उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. धुळे येथील केशरानंद गार्डनमध्येझालेल्या मेळाव्यास हजारो शेतकरी उद्योजक उपस्थित होते.

या वेळी व्यासपीठावर धुळ्याचे माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष नितीन बंग, गव्हर्निंग कौऊन्सिल मेंबर पवन अग्रवाल, अरुण नावरकर, रावल उद्योग समूहाचे सरकारसाहेब रावल, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन संजय सोनवणे, राजेश गिंदोडीया, चेंबरच्या महिला समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील आदी उपस्थित होते. दरम्यान अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते चेंबरची चीफ पेट्रोन मेंबरशीप घेतलेले कैलास अग्रवाल, ज्ञानेश्वर भामरे यांचा सत्कार झाला.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर ही संस्था १९२७ पासून उद्योग आणि कृषी क्षेत्राचा समन्वय साधून शहरी तसेच ग्रामीण भागात उद्योगांचे चित्र बदलण्याचे काम करीत आहे.

महाराष्ट्र चेंबर ही राज्याची शिखर संस्था म्हणून काम करत असून सर्व घटकांचे प्रतिनिधीत्व करते. देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांच्या स्थान अधिक बळकट करण्यासाठी उत्तम नियोजन आणि मार्गदर्शनाची गरज आहे. शेतकऱ्यांसाठी शासकीय योजना वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी केंद्र सरकारच्या नवनवीन योजना शेतकऱ्यांसाठी आहेत. शेतकऱ्यांना अधिक मार्गदर्शन व्हावे म्हणून महाराष्ट्र चेंबरने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. अधिक मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, व्यापारी, उद्योजक, शेतकरी एकाच रथाची चाके आहेत. चेंबर यासाठी प्रामुख्याने कार्य करत आहे. चेंबरच्या माध्यमातून अनेक योजनांचा फायदा शेतकऱ्यांना घेणे शक्य आहे.

या देशातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यात महाराष्ट्र चेंबरचे मोठे योगदान आहे. या वेळी महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाने केलेल्या इंडोनेशिया दौरा आणि




**महाराष्ट्र चेंबर तर्फे हंसराजजी अग्रवाल यांच्या स्मरणार्थ शेतकरी उद्योजकता विकास मेळाव्याचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. उपस्थितात उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, चेंबरच्या महिला समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, महाराष्ट्र चेंबरचे अनिल लोढा, नितीन बंग, सरकार साहेब रावल, धुळेचे माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, ज्ञानेश्वर भामरे, पवन अग्रवाल.**

गुंतवणूकीच्या संधीची माहिती दिली.

रावल उद्योग समूहाचे सरकार रावल म्हणाले, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने शेतकरी उद्योजकता मेळावा घेतल्याने शेतकरी उदयोजकांत चैतन्य निर्माण झाले आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून जवळपास ७०% लोक शेतीवर अवलंबून आहेत.

सध्या शेती करणे आव्हानात्मक बनले असून शेतीसोबत उद्योग व्यवसाय काळाची गरज आहे. शेतकरी यांनी स्वतः चा असा शेतीशी निगडीत प्रक्रिया उद्योग सुरू करावा.

त्यासह शेतकऱ्यांनी श्रमाला उत्तम नियोजनाची जोड द्यावी. या वेळी ज्ञानेश्वर भामरे यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते रावसाहेब पाटील, गणेश चौधरी, विलास गुजर, भाऊसाहेब पाटील, पंडित भावसार, उमेश पाटील या शेतकरी व सरपंच यांचा सत्कार करण्यात आला. तर सरकारच्या विविध विभागाच्या अधिकारी रोहित कड्डू, डॉ. धनंजय रेवाळकर, सुदामसिंग राजपूत, जयेश पाटील, अर्जुन सोनवणे यांचा सत्कार झाला. उपाध्यक्ष नितीन बंग यांनी प्रास्ताविक केले.



# युकेमध्ये निर्यातदारांसाठी विविध संधीबाबत चर्चासत्र संपन्न

**नाशिक :** महाराष्ट्र चेंबरच्या पुढाकाराने उत्तर महाराष्ट्रातील निर्यातदारांना युकेमध्ये मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, लॉजिस्टिकस, अन्नप्रक्रिया क्षेत्रात व्यवसायाच्या विविध संधी उपलब्ध असून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर, निमा, आयमा व थेम्स फ्री पोर्ट,लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने निर्यातदारांसाठी असलेल्या विविध संधीबाबत चर्चासत्र गुरुवार दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता हॉटेल कोर्टयार्ड बायमेरियट,मुंबई आग्रारोड, मुंबई नाका नाशिक येथे संपन्न झाले.

महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन संजय सोनवणे यांनी सर्वांचे स्वागत करुन उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योगांना देश आणि परदेशात संधी मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबरच्या उपक्रमांची माहिती दिली. उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी प्रास्ताविकात महाराष्ट्र चेंबरतर्फे जागतिक स्तरावर महाराष्ट्रातील व्यापार उद्योगाला संधी मिळवून देणे, प्रोत्साहन देणे, यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्र चेंबर कार्य करत आहे. २९ देशांबरोबर सामंजस्य करार असून थेम्स फ्री पोर्ट, लंडन यांच्या सहकार्याने उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योगाला संधी मिळवून देण्यासाठी काम सुरु करण्यात आले आहे. थेम्स फ्रीपोर्ट द्वारे निर्यातीच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असून उत्तर महाराष्ट्रातील व्यापारी उद्योजकांना

सुवर्णसंधी यामाध्यमातून उपलब्ध होणार असून सर्वांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले. नाशिक विभागाचा परिचय निमा अध्यक्ष धनंजय बेळे यांनी करून दिला.

नाशिक उद्योग क्षेत्राची माहिती आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी दिली. एचएएलच्या टीमने नाशिक एअरपोर्ट येथे असलेल्या निर्यातीच्या सुविधा आणि संधी याविषयीची माहिती दिली. थेम्स फ्रीपोर्ट, युके आयबीसीच्या शिष्टमंडळाने चित्रफितीद्वारे निर्यातीच्या विविध संधीची माहिती दिली.

युकेमध्ये मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, लॉजिस्टिकस, अन्नप्रक्रिया क्षेत्रात व्यवसायाच्या विविध संधीची माहिती थेम्स फ्रीपोर्ट, युकेच्या शिष्टमंडळाने दिली. उत्तर महाराष्ट्रातील मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, लॉजिस्टिकस, अन्नप्रक्रिया क्षेत्रात व्यापारवृद्धी मोठ्या प्रमाणात होईल भारत व युकेमधील व्यापार उद्योगातील भागीदारी वाढेल असे शिष्टमंडळाने सांगितले. शिष्टमंडळात थेम्स फ्रीपोर्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्टिन व्हाईटली, व्यापार आणि गुंतवणूक विभागाचे प्रमुख लुसियाना झिम्बार्डी सिऊबोटारिउ, युके पोर्ट आणि टर्मिनलचे संचालक ख्रिस्टोफररॉबर्ट ग्रीन, ओशन फॉरवर्डिंगचे उत्पादन विकास




**पत्रकार परिषदेत संवाद साधताना महाराष्ट्र चेंबरचे उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन संजय सोनवणे, माजी अध्यक्ष हेंत राठी, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, थेम्स फ्रीपोर्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्टिन व्हाईटली, व्यापार आणि गुंतवणूक विभागाचे प्रमुख लुसियाना झिम्बार्डी सिऊबोटारिउ, युके इंडिया बिझनेस कौन्सिलचे संचालक जोनाथन उर्सेल.**

व्यवस्थापक दलजितसिंग ओबेरॉय, युके इंडिया बिझनेस कौन्सिलचे संचालक जोनाथन उर्सेल,आरजेजी ग्लोबल लॉजिस्टिक सोल्युशन्स प्रा. लि.चे संचालक रवींद्र जे. गांधी होते.

कार्गो प्रमुख क्षेत्रातील नाविन्यपूर्ण ऑपरेशन स्थापित करण्याची उत्कृष्ट संधी असून प्रगत लॉजिस्टिक, उत्पादन आणि प्रक्रिया,वर्तुळाकार अर्थव्यवस्था आहे. टेम्स फ्री पोर्ट कंटेनर आणि पारंपरिक अशा दोन्ही प्रकारचा जागतिक व्यापारासाठी धोरणात्मक समन्वयक आहे. लंडन युकेमधील सर्वात मोठे बंदर आहे. दरवर्षी ५२ दशलक्ष टनांपेक्षा जास्त मालाची आवक जावक होते. जागतिक स्तरावर १३० पेक्षा अधिक पोर्टशी जोडलेले टेम्स फ्रीपोर्ट आहे. १,७००–एकरवर टेम्स फ्री पोर्ट आहे युरोप सर्वात मोठी बाजारपेठ असून ग्राहक आहेत. शुल्क निलंबनाचा फायदा, पुन्हा निर्यातीवर शुल्क सूट आणि लवचिकता, शुल्काची गणना कशी केली जाते, तसेच आयात करण्यासाठी सरलीकृत सीमाशुल्क प्रक्रिया, वस्तूंची निर्यात करणे, साठवणे किंवा त्यावर प्रक्रिया करणे आणि माल आणण्यासाठी सुव्यवस्थित प्रक्रिया आणि सीमाशुल्क याची सविस्तर माहिती शिष्टमंडळाने दिली.

महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारिणी सदस्य राजाराम सांगळे यांनी उत्तर महाराष्ट्रातील कृषी उत्पादनासाठी युरोपियन बाजारपेठेत संधी उपलब्ध होण्यासाठी आणि उत्तर विभागातील कृषी उत्पादने युरोप तसेच लंडन येथील सुपर मार्केटमध्ये निर्यातीसाठी शिष्टमंडळाला विस्तृत माहिती देऊन सहकार्य करण्याचे आश्वासित केले. चर्चासत्राच्या शेवटी प्रश्नोत्तरे झाली.

# राज्यात वस्त्रोद्योग विकास महामंडळ, वस्त्रोद्यागाला चालना देण्यासाठी सरकारचा निर्णय





**मुंबई :** महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) धर्तीवर राज्यात महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळाची (एमएसटीडीसी) स्थापना करण्यात येणार आहे. वस्त्रोद्योग विभागाच्या अखत्यारित असलेल्या सर्व महामंडळांचे या शिखर महामंडळात विलीनीकरण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या तीनही महामंडळांच्या सर्व मालमत्तांचे हस्तांतरणही या नवनिर्मित महामंडळात करण्यात येईल.

भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्राच्या उल्लेखनीय विकासगाथेत महाराष्ट्राचा महत्त्वाचा वाटा आहे. महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेतही वस्त्रोद्योगक्षेत्राची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. शेतीखालोखाल वस्त्रोद्योगाच्या माध्यमातून सर्वाधिक रोजगारनिर्मिती होते. महाराष्ट्राचे देशाच्या एकूण वस्त्रोद्योग उत्पादनात १०.४ टक्के आणि एकूण रोजगारांपैकी १०.२ टक्के योगदान आहे. या व्यतिरिक्त, राज्यात दरवर्षी २७२ दशलक्ष किलो सूताचे उत्पादन होते. भारताच्या एकूण सूत उत्पादनाच्या तुलनेत हे प्रमाण १२ टक्के आहे. राज्याच्या वस्त्रोद्योगाच्या वाढीस चालना देण्यासाठी आणि वस्त्रोद्योगाला आवश्यक त्या उपाययोजनांसह हातभार

लावण्यासाठी राज्य सरकारने २०१८ मध्ये वस्त्रोद्योग धोरण २०१८-२०२३ जाहीर केले होते. ते मार्च २०२३ मध्ये संपुष्टात आले. वेगाने बदलणाऱ्या जागतिक व्यावसायिक वातावरणात राज्यातील वस्त्रोद्योगाला विकसित करून नवीन आणि उदयोन्मुख संधी मिळवून देण्याची गरज आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी नुकतेच 'एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८'

जाहीर करण्यात आले. या धोरणात उत्पादित कापसावरील प्रक्रियाक्षमता येत्या पाच वर्षांत ३० टक्क्यांवरून ८० टक्क्यांपर्यंत वाढविणे, राज्यातील पायाभूत सुविधा व तांत्रिक प्रगतीला चालना देणे, पुढील पाच वर्षांत २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे आणि पाच लाखांपर्यंत रोजगारनिर्मितीची करणे, अशी उद्दिष्टे आखण्यात आली आहेत. या धोरणाच्या माध्यमातून वस्त्रोद्योगक्षेत्रात महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याचाही विचार आहे. तसेच, राज्यात सहा तांत्रिक वस्त्रोद्योग पार्कचा विकास करण्याचे सरकारने योजले

आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्यस्तरीय महामंडळाची स्थापना करण्याचा प्रस्तावही या वस्त्रोद्योग धोरणात मांडण्यात आला होता. या प्रस्तावाला राज्य सरकारकडून नुकतीच मंजुरी मिळाली. वस्त्रोद्योग विभागाच्या अखत्यारित असलेले यंत्रमाग महामंडळ (नवी मुंबई), हातमाग महामंडळ (नागपूर) आणि वस्त्रोद्योग महामंडळ (मुंबई) या तीनही महामंडळांचे विलीनीकरण करण्यात येणार आहे. तसेच, महामंडळांच्या सर्व मालमत्तांचे हस्तांतरणही या नवनिर्मित महामंडळात करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळाची स्थापना वैधानिकरित्या करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास अधिनियमाचे प्रारूप तयार करण्याचे निर्देश सरकारतर्फे देण्यात आले आहेत.

### नऊ जणांची समिती

हे प्रारूप तयार करून सरकारला पाठविण्यासाठी वस्त्रोद्योग, नियोजन, वित्त, उद्योग, विधी व न्याय विभाग या विभागातील अधिकाऱ्यांसह इतर अशी नऊ सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीस अधिनियमाचे प्रारूप तयार करण्यासाठी एक महिन्याचा अवधी देण्यात आला आहे.

# आवेष्टित वस्तूंवर युनिट प्राईझ आवश्यक

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांची माहिती




**मुंबई :** अनेक ग्राहकोपयोगी पदार्थ, वस्तू यांची विक्री आवेष्टित स्वरूपात म्हणजे पॅकेज्ड गुड्स म्हणून केली जाते. ग्राहकांच्या माहिती व हितासाठी अशा वस्तूंच्या लेबलवर त्या वस्तू संदर्भातील संपूर्ण माहिती छापावी लागते. जसे कि, वस्तूचे नाव, उत्पादकाचे नाव, निर्मिती किंवा पॅकेजिंग महिना, साल, वस्तूची कमाल विक्री किंमत वगैरे. आता दि. १ जानेवारी २०२४ पासून अशा वस्तूंवर युनिट सेल प्राईझ देखील छापणे बंधनकारक करण्यात आले आहे अशी माहिती महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. त्यानुसार सर्व संबंधित वस्तूंचे उत्पादक, निर्माते, वितरक आदी सर्वांनी याची तातडीने दखल घ्यावी व त्यानुसार नियमाचे योग्य असे पालन करावे असेही त्यांनी आवाहन केले.

राज्याची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स , इंडस्ट्री अँन्ड अँग्रिकल्चर या संस्थेचे अध्यक्ष ललित गांधी यांनी अधिक माहिती देतांना सांगितले कि, मुळात या स्वरूपाचा बदल सन २०२२ मध्ये करण्यात आला होता. त्यावर संबंधित उद्योजक, व्यापाऱ्यांकडून ज्या काही सूचना आल्या त्याचा अभ्यास करून योग्य असे प्रतिनिधित्व शासनाकडे करण्यात आले होते. सर्व संबंधितांना नवीन बदल अंलबजवानीसाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून त्याची अंलबजावणी १ वर्ष पुढे ढकलण्यात आली होते. त्यानंतरही पुन्हा पुढे ढकलण्यात येऊन १ जानेवारी २०२४ करण्यात आली. या मधल्या दिड दोन वर्षाच्या काळात संबंधितांनी वस्तूवर युनिट सेल प्राईझ छापण्याच्या दृष्टीने तयारी केली असेल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे याबाबत सर्वांनी योग्य ती दक्षता घ्यावी असेही त्यांनी सांगितले. पॅकेज्ड कमोडिटी नियमां संदर्भात काही सूचना असल्यास त्या महाराष्ट्र चेंबरला कळवाव्यात, असेही महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सुचविले.

### नेमका बदल

नियम १ जानेवारी २०२४ पासून लागू झाले आहेत. युनिट सेल प्राईझ कशी छापावी, हे देखील देण्यात आले आहे. त्यानुसार १ किलो पेक्षा कमी किंवा १ किलो पर्यंत क्वान्टेटी त्यापेक्षा जास्त क्वान्टेटी असल्यास पर किलोग्रॅ द्यावी लागेल. जर लांबी १ मीटर पेक्षा कमी / १ मीटर असेल तर पर सेंटिमीटर अशी युनिट सेल प्राईझ छापावी लागेल आणि १ मीटर पेक्षा जास्त असल्यास पर मीटर छापावी लागेल. वजन १ लिटर असले तर पर मिलिलिटर आणि त्यापेक्षा जास्त असेल तर पर लिटर छापावी लागेल. नगाप्रमाणे वस्तू विकली जात असेल तर प्रत्येक नगाप्रमाणे छापावी लागेल. जर किरकोळ विक्रीची किंमत हि युनिट सेल प्राईझ एवढीच असेल तर युनिट सेल प्राईझ छापण्याची आवश्यकता नसेल.

# गडहिंग्लजला येणार सहा मोठे उद्योग : पालकमंत्री हसन मुश्रीफ

## एमआयडीसीमध्ये हजार कोटींची गुंतवणूक शक्य

**कोल्हापूर :** 'गडहिंग्लज औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग विभागाने सहा मोठ्या कंपन्यांना जमीन दिली आहे. या उद्योगांकडून एक हजार कोटींची गुंतवणूक होऊन या ठिकाणी अडीच हजाराहून अधिक बेरोजगारांना रोजगार मिळेल', अशी माहिती पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

मुश्रीफ म्हणाले, 'गडहिंग्लज एमआयडीसीमध्ये सहा उद्योगांना १०२ एकर जागा दिली आहे. यामध्ये आर. ए. एस. डेनिम फॅब्रिक १२ एकर, जठार स्पिनिंग्ज १० एकर, माय स्मार्ट इंडूलिंक ॲग्रो कंपनी २५ एकर, घाटगे-पाटील इंडस्ट्रीज फौंड्री ३० एकर, बायोफ्युअल अल्कोहोल १५ एकर आणि वरेर वाईज पीव्हीसी पाईप १० एकर या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांकडून साधारण एक हजारांवर अधिक कोटींची गुंतवणूक होणार असून अडीच हजारहून अधिक बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे.'

दरम्यान, दोन दशकांपूर्वी गडहिंग्लजपासून चार किलोमीटर अंतरावर बड्याचीवाडी, औरनाळ व शेंद्री गावच्या हद्दीतील जमिनीवर औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्यात आली. शेकडो एकर जागा असूनही याठिकाणी एकही उद्योग येण्यास इच्छूक नव्हते. मध्यंतरी ग्रॅक्स कंपनीला शंभर एकर जागेचे वाटप केले होते. मात्र कंपनीने उद्योगच सुरू न केल्याने त्यांच्याकडील जमीन काढून घेण्यात आली. दरम्यान, गोकुळ शिरगाव, शिरोली आणि कागल पंचतारांकीत एमआयडीसी फुल्ल झाल्याने उद्योजकांना गडहिंग्लज एमआयडीसीचे वेध लागले. याठिकाणी जागा मुबलक असल्याचे लक्षात आले. त्यातच संकेश्वर- बांदा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू झाल्याने जागेची मागणी वाढू लागली आहे. परिणामी या सहा कंपन्यांना १०२ एकरची जागा वितरीत केल्याचे सांगण्यात आले.

**एमआयडीसी कनेक्टीव्हीटी रोड हवा...**

गडहिंग्लज एमआयडीसीत उद्योग विभागाने विविध पायाभूत सुविधा सज्ज ठेवल्या आहेत. त्याचा परिणाम उद्योग येण्यावर होत आहे. आता गडहिंग्लज शहरातून हायवे जात असला तरी गडहिंग्लजपासून एमआयडीसीपर्यंतचा कनेक्टीव्हीटी रोड फारच अरूंद आहे. उद्योग येण्याने वाहतूकही वाढेल. यामुळे या कनेक्टीव्हीटी रोडचे रूंदीकरण होणेही गरजेचे असल्याचीउद्योजकांची मागणी आहे.

# हार्दीकअभिनंदन

कोल्हापूर जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी, व्यावसायिकांची शिखर संस्था असलेल्या कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिजच्या कार्यकारिणी मंडळावर महाराष्ट्र चेंबर च्या काही मान्यवर सदस्यांच्या निवड झाली. महाराष्ट्र चेंबरतर्फे सर्वांचे मनपूर्वक अभिनंदन.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉर्सचे स्वीकृत सदस्य **संजय धनपाल शेटे** यांची कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिजच्या अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा फेरनिवड करण्यात आली.





महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्य **धनंजय दुग्गे** यांची कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिजच्या उपाध्यक्षपदी निवड झाली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे स्वीकृत सदस्य **जयेश मोहनलाल ओसवाल** यांची कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिजच्या मानद सचिवपदी निवड झाली.



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्वीकृत सदस्या **सीमा शहा** यांची कोल्हापूर चेंबरच्या स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे स्वीकृत सदस्य **गोरख माळी** यांची कोल्हापूर चेंबरच्या स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली.

# दुर्लक्षित कोकण सागरी किनारी पर्यटन वाढवूया : ललित गांधी

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मालदीव ऐवजी लक्षद्विप अशी साद घातली ती देशातील भुरळ पडणारे नितांत रम्य सागरी किनारे व तेथील पर्यटन विकासासाठी. आपल्या महाराष्ट्रालाही सुंदर, समृद्ध स्वर्गीय सागरी किनारा लाभला आहे या ठिकाणच्या पर्यटन वाढीला प्रोत्साहन द्यावे, यासाठी सर्व पर्यटन कंपन्याने विशेष भर द्यावा, असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले आहे.

आपल्या कोकणात अशी अनेक गावे आणि सागरी किनारे पर्यटकांना आकर्षित करणारे आहेत. केवळ तारकर्ली, गणपती पुळे, मुरुड जंजिरा, दिवे आगार, अलिबागच नव्हे तर भांडार पुळे असो की भोगवे, वेणेश्वर, अंजर्ली, दाभोळी, देवगड, कोंडुरा, कळशी, रेवदांडा असे अविस्मरणीय अनुभव देणारे अनेक सागर किनारे आहेत. महाराष्ट्रातील व देशातील पर्यटकांनी आवर्जून अनुभवण्यासारख्या या सागर किनाऱ्यांना जरूर भेटी द्याव्या आणि कोकणातील व पर्यायाने महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन म हाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले आहे.

कोकण विभाग हायवे रेल्वे विमान वाहतूक व जल वाहतुकीने संपूर्ण देशाशी जोडला गेलेला असल्याने केवळ आपण स्वतः न जाता आपल्या वर्तुळातील सर्व देश परदेशातील प्रतिनिधी आणि मित्रमंडळी या नितांत रम्य सागर किनारी जातील यासाठीही



प्रयत्नशील रहावे, असेही त्यांनी सांगितले.

पर्यटनाला प्रोत्साहन राज्यातील एकूणच पर्यटनाला सतत प्रोत्साहन मिळावे म्हणून महाराष्ट्र चेंबर गेली अनेक वर्षे प्रयत्न करीत आहे. या क्षेत्रातील उद्योजकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठीही चेंबर प्रयत्नशील आहे. राज्यातील पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक, उद्योजकांनी कोकण किनारी जास्तीत जास्त पर्यटक येतील आणि खास करून काहीशा दुर्लक्षित सागर किनाऱ्यावरील पर्यटन वाढेल, यासाठी विशेष प्रयत्न करावेत असेही त्यांनी सांगितले. यादृष्टीने महाराष्ट्र चेंबरने हा विषय प्राधान्याने हाती घेतला असून त्याबाबत संबंधितांनी चेंबरशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले आहे.

# स्वागतार्ह आयकर बदल लघुत्तम व लघु उद्योजकांनी नोंद घ्यावी - ललित गांधी

देशाच्या अर्थव्यस्थेमध्ये लघुत्तम (मायक्रो) आणि लघु उद्योगांचे महत्वाचे स्थान आहे. असे सर्व उद्योजक यांच्याकडून मोठे खरेदीदार, कंपन्या, महामंडळे वरचेवर काही ना काही

खरेदी करत असतात. परंतु त्यांच्याकडून खरेदी केलेल्या मालाचे, सेवेचे पैसे अनेक महिने दिले जात नाहीत व त्यामुळे या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर आजारपण दिसते. यासाठी लघुत्तम व लघु उद्योगांकडून खरेदी करणाऱ्यांनी ४५ अथवा ६० दिवसात पैसे द्यावेत असा एमएसएमइ कायदाही केला. त्यामुळे काहीसा दिलासाहीमिळाला असला तरी हि समस्या पूर्ण अंशानेसुटली नव्हती. यावर सातत्याने महाराष्ट्र चेंबरसारख्या संस्थांनी भारत सरकारकडे लकडा लावला होता कि, याला अनुषंगून करविषयक कायदाकडेबदल केला जावा. त्यानुसार गेल्यावर्षीआयकर कायद्यामध्ये आवश्यक तो बदल करण्यात आला होता. हा बदल आता लागू झाला आहे. त्यानुसार लघुत्तम व लघु उद्योजकांचे पेमेंट जर वेळेत केली गेली नाहीत तर संबंधित खरेदीदाराला आयकर कायद्याखाली अशी सर्व रक्कम धंद्याचा खर्च म्हणून वजावट मिळणार नाही. त्यामुळे सर्व खरेदीदारांचेउत्पन्न व नफा वाढला जाऊन त्यांना त्यावर मोठा आयकरही भरावा लागेल. साहजिकच अशी वेळ येऊ नये म्हणून खरेदीदारांनी वेळेवर लघुत्तम व लघु उद्योजकांचेपैसे व देणी पूर्ण करावीत अशी यामागील स्वच्छ भूमिका आहे. निश्चितच या बदलाचा लघुत्तम व लघु उद्योजकांना फायदा होईल असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

**नोंदणी करून घ्या :** आपण लघुत्तम आणि किंवा लघु उद्योजक आहोत हे सर्वांना समजण्यासाठी प्रत्येक छोट्या उद्योजकाने एमएसएमइ कायद्यानुसार नोंदणी करून घ्यावी. हि नोंदणी अतिशय सुटसुटीत आणि ऑनलाईन पद्धतीने होणारी आहे. या नोंदणीचाजो क्रमांक मिळतो तो त्यांनी आपल्या बिलांवर जरूर छापावा. त्यामुळे ते सदरहू कायद्याखाली येत आणि त्यांचे पेमेंट वेळेत करायलाच पाहिजे असे सर्वांना लक्षात येईल. यासंदर्भात अधिक माहितीसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरशी व्यापारी उद्योजकांनी संपर्क साधावा असे आवाहन महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले आहे.

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या जळगांव शाखेचे उद्घाटन



**बँक ऑफ महाराष्ट्रच्या एमआयडीसी शाखा जळगावचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करताना महाराष्ट्र चेंबरच्या गव्हर्निंग कौन्सिल मेंबर संगीता पाटील. उपस्थितात गव्हर्निंग कौन्सिल मेंबर महेंद्र रायसोनी, पर्यावरण तज्ज्ञ समितीचे को-चेअरपर्सन विनोद बियाणी, सदस्य संदीप भोळे.**

**जळगांव :** जळगावातील आर्थिक क्षेत्राचे बळकटीकरण तसेच लघु आणि मध्यम उद्योगांचा आर्थिक समावेश सुनिश्चित केला जाईल, अशी ग्वाही बँकेचे विभागीय व्यवस्थापक प्रवीणकुमार सिंह यांनी दिली. बँक ऑफ महाराष्ट्रच्या एमआयडीसी शाखेचे मोठ्या थाटात उद्घाटन संपन्न झाले. त्या वेळी ते बोलत होते.

बँक ऑफ महाराष्ट्र एमआयडीसी शाखा जळगावच्या उद्घाटनासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चे पदाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. १६ सप्टेंबर, १९३५ रोजी स्थापन होऊन सार्वजनिक क्षेत्रातील बँक म्हणून नावलौकिक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या एमआयडीसी शाखेचे मोठ्या थाटात उद्घाटन संपन्न झाले. विभागीय व्यवस्थापक प्रवीणकुमार सिंह यांचे भाषण झाले. ते म्हणाले, ग्राहकांची सेवेला बँक सातत्याने प्राधान्य देते. या शाखेच्या माध्यमातून उद्योजक, व्यापारी बंधूना चांगल्या प्रकारची सेवा दिली जाणार आहे. सरकारच्या विविध योजनातंर्गत विविध सुविधांचा लाभही उद्योजक, व्यापारी बंधूना दिला जाणार आहे. या नवीन शाखेतंर्गत जळगावातील आर्थिक क्षेत्राचे बळकटीकरण तसेच लघु आणि मध्यम उद्योगांचा आर्थिक समावेश सुनिश्चित केला जाईल. या वेळी महाराष्ट्र चेंबरच्या गव्हर्निंग कौन्सिल मेंबर आणि महिला समितीच्या चेअरपर्सन संगीता पाटील, गव्हर्निंग कौन्सिल मेंबर महेंद्र रायसोनी, पर्यावरण तज्ज्ञ समितीचे को-चेअरपर्सन विनोद बियाणी, सदस्य संदीप भोळे आदी उपस्थित होते. त्यांनी बँकेच्या नूतन शाखेला शुभेच्छा दिल्या.





### शेठ वालचंद हिराचंद यांच्या १४१ व्या जयंतीनिमित्त

# भारतीय औद्योगिकरणाचे शिल्पकार 'शेठ वालचंद हिराचंद'

शेठ वालचंद हिराचंद यांचा जन्म २३ नोव्हेंबर, १८८२ रोजी सोलापुरात झाला. स्व.वालचंद शेठ यांचे प्राथमिक शिक्षण सोलापुरातील तुळजापूर वेस येथील करंजकर विद्यालय येथे झाले. ही शाळा खोडाची शाळा म्हणून सुद्धा ओळखली जायची.



या शाळेच्या मैदानात एक खांब (खोड) जमिनीत भक्कम गाडला होता. मस्तीखोर विद्यार्थ्यांना या खोडाला बांधुन ठेवले जायचे, म्हणून या शाळेचे नाव खोडाची शाळा म्हणून पडले.

ज्येष्ठ ऊद्योगपती वालचंद हिराचंद आणी सोलापूर वालचंद यांनी भारतात प्रथमच विमान बनवण्याचा कारखाना बेंगलोर येथे सुरु केला. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमि टेड या कंपनीची स्थापना भारतीय (सोलापुर) उद्योगपती वालचंद हिराचंद यांनी कर्नाटकातील बंगळूर येथे इ.स. २२ डिसेंबर१९४० मध्ये केली. हा आता भारत सरकारचा सार्वजनिक उपक्रम आहे

ज्यात प्रामुख्याने लष्करी वैनिक साधनांची निर्मिती करण्यात येते. याचे मुख्यालय बंगळूरू येथे आहे. तसेच नाशिक, कोरबा, कानपुर, कोरापुट, लखनऊ आणि हैदराबाद येथे HL च्या शाखा आहेत. ईथे आज ३३,००० लोक काम करतात. रशियाच्या मदतीने ईथे मिग विमानांची निर्मीती होते. ध्रुव हॅलिकॉप्टर तसेच संपुर्ण भारतीय बनावटिचे लढाऊ विमान तेजस ची निर्मीती ही ईथेच होते.

वालचंद यांनी साखर कारखाना, व शिल्लक राहिलेल्या साखरेचा चांगला विनियोग करावा यासाठी रावळगाव येथे चॉकलेट कंपनी, मुंबई येथे कार (फियाट) बनवण्याचा कारखाना ऊभारला. गुलाम भारतातील अभियांत्रिकीचे अजोड कामगिरीचे उदाहरण म्हणजे शेठ वालचंद यांनी स्थापन केलेल्या हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनी कउउ ने खंडाळा घाटात बांधलेला पुल व बोगदा. (आज २३ नोव्हेंबर २०२३ रोजी उत्तरकाशी येथील एका निर्माणाधीन बोगद्यात गेले १२ दिवस ४१ मजुर अडकले आहेत. त्यांच्या सुटकेसाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत, संपूर्ण देश देवाची प्रार्थना करत आहे, या पार्श्वभूीवर शंभर वर्षांपूर्वी बोगदा व पुल कसा बनवला असेल याची कल्पनाच केलेली बरी.

त्याच बोगद्याची ही कथा १६ डिसेंबर १९२८ रोजी खंडाळा घाटातुन रेल्वे बोगद्यातुन पलिकडे गेली. भारतातील पहिली प्रवासी रेल्वे १८५३ साली बोरीबंदर ते ठाणे दरम्यान धावली. त्या आधी १८५१ साली रुडकी येथे बांधकाम साहित्य वाहुन नेण्यासाठी रेल्वेचा वापर केला होता. १८६५ च्या दरम्यान (साल थोडास पुढे मागे असेल, नक्की आठवत नाही) मुंबई हुन गाडी पुण्यास न्यायची होती. त्या मार्गात खंडाळा घाट हाच मोठा अडसर होता. (इंग्रज अभियंत्यांना मार्ग दाखवणारा धनगर व शिंग्रोबा चे मंदिर अनेकांना आठवत असेल.) मुंबई पासुन पुढे कर्जत व पुढे पळसदरी पर्यंत रेल्वे नेली पुढे मोठी दरी व लगेच मोठा डोंगर होता. त्या ठिकाणी रिव्हर्सींग स्टेशन बनवण्यात आले.

गाडी तिथपर्यंत आली की पुढचे इंजिन मागे लावले जायचे. गाडी ऊलट्या दिशेने वळण घेऊन दुसर्या डोंगरा वरुन पुढे जात असे. नंतर हिंदुस्तान कंस्ट्रक्शन कंपनीने तीथे कमानीचा दगडी पुल व लगेच मोठा बोगदा बनवला. व १६ डिसेंबर १९२८ रोजी प्रथम गाडी सरळ बोगद्यातुन पुण्याकडे रवाना झाली. त्या नंतर रिव्हर्सींग स्टेशन काढुन टाकण्यात आले. जे काम ब्रिटिशांना नाही जमले ते शेठ वालचंद यांनी करून दाखवले. त्यांनी स्थापन केलेल्या वालचंद नगर मधे प्रचंड मोठाल्या मशिनरीज आहेत. या मशिनरीज म्हणजे मेकॅनिकल इंजिनिअर क्षेत्रातील भारताचे भुषण आहेत. वालचंद नगरची उपयुक्तता किती असावी असा प्रश्न विचारला तर एकाच वाक्यात सांगता येईल की चंद्रयान ३ चे अनेक भाग (Parts) वालचंद नगर येथेच तयार झाले आहेत. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे संस्थापक होते.

**योगिन गुर्जर, सदस्य,**
**सोलापूर विकास मंच, सोलापूर.**

# Maharashtra Economic Advisory Council report on "Roadmap for Maharashtra to become a $1Trillion economy" Executive Summary - Maharashtra's Vision

In the Economic Advisory Council of Maharashtra, comprising of 21 eminent leaders from agriculture, industry, services, and the state government, we have worked together cohesively towards evaluating the key opportunities and enablers, needed to achieve the target. Our vision is to achieve the GDP target, while ensuring that we:

- Identify sustainable and inclusive growth opportunities to generate a positive socio-economic impact
- Include all sections of society, such as farmers, women, skilled and unskilled youth
- Cover all regions of Maharashtra
- Focus on all enterprise types, including startups and MSMEs

During the exercise, we had a broad engagement with more than 500 stakeholders across multiple districts in the state, who provided us valuable on-ground insights on critical challenges and opportunities in each region. We also consulted more than 75 sectoral experts and industry associations. These inputs were synthesized and supported with data analysis, post which the council ideated to finalize key recommendations.

India's nominal GDP in FY22 was $3.3 Tn (INR 234 lac Cr). Between FY14-22, India's nominal GDP grew at ~9-10%. India's near-term ambition is to become a $5 Tn economy.

The $5 Tn ambition requires all of India's key states to accelerate their growth. Top 5 states, Maharashtra, Uttar Pradesh, Gujarat, Tamil Nadu, and Karnataka account for ~50% of country's nominal GDP. Of these, Maharashtra is the largest, with a GDP of $444 Bn in FY22, which is ~13% of India's GDP. Hence, to support India's ambition, Maharashtra has decided to take an aspirational target of $1 Tn GDP by FY28.

Maharashtra has had a historic nominal CAGR of ~8-9% during FY14-22, which implies Maharashtra will reach $1Tn GDP by 2031-32 if it sustains historic growth rate. However, to achieve its target by FY28, Maharashtra will have to accelerate and grow at ~14-15% annually.

Also, as the state looks to accelerate growth, it must look to reduce existing imbalances. As an example, of its 36 districts, top 7 districts contribute to ~55% of the state's GDP, whereas the bottom 18 districts contribute to <20%. As Maharashtra takes the $1 Tn GDP target, it must ensure that the growth is inclusive, sustainable, and balanced across all regions.

### Sector-wise GVA mix

In FY22, agriculture, manufacturing and services contributed to 14%, 16% and 59% to Maharashtra's Gross Value Added (GVA) respectively. The remaining 11% is primarily driven by construction & infrastructure (6%), mining, energy & other utilities (5%).

Based on sector-wise analysis, this report estimates that the GVA mix in FY28 will change, key change being manufacturing's share increasing to 21% to keep in-line with India's target of 25% GVA from manufacturing. Agriculture's GVA share will stay at ~12-13%, as it is a critical sector, that employs ~50% of state's working population.

Key opportunities & enablers for Maharashtra

A. Manufacturing: Maharashtra's manufacturing GVA has grown from $46 Bn in FY14 to $64 Bn in FY22. Increasing manufacturing share is critical due to the multiplier effect it has on economy: It helps create jobs across skill levels, will improve value addition in economy and generate growth in real estate and other services.

This report focuses on the 16 out of 27 key industries that contribute to 90% of Maharashtra's manufacturing GVA. However, Maharashtra has

multiple endowments making it an attractive manufacturing destination:

• Maharashtra has a strong industrial base, contributing to ~14-15% of India's manufacturing GVA, and in 6 industries, 15%+ of India's GVA – this has also resulted in a large skilled talent pool across industries

• Maharashtra houses large consumption centres such as Mumbai, Pune

• Maharashtra is top producers of crops such as millets, fruits & vegetables, hence suitable for food-processing

Given its endowments and projected market growth & requirements, the report captures 40+ opportunities across 16 key industries and 6 sunrise industries, categorized broadly into 5 themes: Produce for India, Import substitution, Produce for the world, Value addition, Capitalizing on mega-trends.

Maharashtra's manufacturing growth will come from:

• Growth of existing industries by helping them improve capacity utilization and adding new capacity

• Attracting new OEs leverage existing clusters – Each OE will create a multiplier effect (e.g., by developing new vendor ecosystems)

• Leveraging Maharashtra's natural resources (e.g., minerals, agri-produce) to pursue downstream opportunities across the value chain – For example leverage iron and coal reserves in Vidarbha to develop industry across steel making, fabrication & forging, capital goods, auto & auto components across the state.

To achieve this growth, Maharashtra will need \$200-250 Bn of capital, 1+ lakh acre of land, 2x increase in industrial power supply, competitive power tariffs, significant improvement in ease of doing business and improvement in logistics infrastructure.

• B. Services: Financial services, IT, tourism, healthcare, and trade & retail contribute to ~80% of Maharashtra's services GVA, which has been growing at 10% between FY14-22, in-line with India average.

Financial services contribute to 10% of Maharashtra GVA. Maharashtra can focus on 2 types of opportunities:

• Become a hub for global mid-office or back-office operations, fintech startups

• Increase penetration of financial services, across banking, credit, and insurance, for retail, agriculture and MSME customers across all districts in Maharashtra

IT and ITeS also contributes to ~9% of Maharashtra's GVA. The state should focus on:

• Develop Maharashtra as the Artificial Intelligence (AI) capital of India attracting investments from leading technology startups

• Growing IT services and Business Process Management services in Tier 2 cities which have the requisite supply of skilled talent and adequate air connectivity

• Developing data centres in Tier 2 cities, where access to low-cost land and power can be provided, along with low latency internet cable connection.

• Developing a hub for advanced IT services such as AI, data analytics and cloud along Mumbai – Pune corridor

***Healthcare has 2 sets of opportunities:***

• Opportunities that will improve the state's health outcomes, such as revamping primary care via technology enabled platform, expanding tertiary care and medical college infrastructure, developing ancillary healthcare services such as geriatric care and veterinary care

• Opportunities that enable Maharashtra to tap into demand for healthcare nationally and globally such as boosting medical tourism, developing a hub for skilling nurses, paramedics and doctors.

Tourism: Maharashtra has multiple historic, natural and religious endowments that drive its tourism economy. Maharashtra has 4 UNESCO sites, 350+ forts, 5 Jyotirlingas, 6 national parks, 50 wildlife sanctuaries, ~720 kms of coastline and ~15% of foreign tourists start their journey from Mumbai. The state can target growing direct tourism GVA from \$11Bn to \$35Bn by FY28.

Maharashtra needs to develop circuits with attractive experiences around multiple anchor destinations. One of the key anchor destinations will be Mumbai, which can be developed as a global tourist destination, where mega projects such as marina with boardwalk, Bollywood theme park, or integrated resort on the lines of Sentosa can be developed. Enabling seamless connectivity, cleanliness, ease of developing hospitality and other infrastructure

are key enablers needed to ensure Maharashtra can accelerate tourism.

• C. Agriculture: The sector accounted for 14% of the state's GVA in FY22 and Maharashtra is the 3rd largest agricultural state in India after UP and MP. Agriculture is providing livelihoods to ~51 million people or half the working age population of the state. Half the farmers hold less than 1 hectare of land and earn less than INR 70,000 of annual crop income.

This report identified 28 crops & allied activities to focus on to unlock a 2.4X growth in GVA. It also identifies key challenges and mitigation measures across each crop's value chains. Top intervention themes include:

• Farm cards: New farm level identity which becomes centre point for combining multiple sources of data (like soil health, micro weather information, irrigation, farmer profit and loss) and act as a channel to improve access to credit and direct benefits

• Farm inputs: Varietal introduction, last mile irrigation to utilize already developed potential and farm mechanization

• Farming: Better crop mix & shift to horticulture, better output e.g., high density plantation, natural farming to control cost and improve soil health

• Demand linkage: Strengthen FPOs, crop councils for crop level advisory for governance, export & produce promotion at state level

• Allied activities: kick start aquaculture & sericulture, drive penetration of poultry farming and breed & awareness programs for diary

• Innovation hub: Coordinates with value chain stakeholders to identify key problems to solve for each crop/allied activity and partners with agricultural universities, start-ups and venture capital to identify solutions

• Technology: API framework to enable access to high quality data on the sector

• Crop councils: Composed of representative across the value chain of key crops and responsible for providing policy inputs. The councils also enable identification & oversee implementation of right solutions to key challenges across the crop value chains.

For improving farmer incomes, it was necessary to classify farmers into 11 segments basis agro-climatic zones (soil types, irrigation / drought susceptibility). Within these, 5 segments representing >80% of small and marginal farmers were prioritized and segment specific approach for 2-3x growth in incomes has been chartered including identification of viable allied activity for the segment to take up.

In addition to this, for building resilience in the sector, recommendations across soil health, irrigation, agri-energy and biodiversity have been mapped.

• D. Construction, infrastructure & real estate: Maharashtra's infrastructure is in-line with India average in multiple metrics such as road and rail density. However, logistics linked infrastructure such as cold storage, inland container depot capacity needs to be augmented.

Maharashtra's capital outlay needs to increase, from $29 Bn spent between FY17-FY22 to around $60 Bn till FY28, to support the growth planned in industry and services. The spend needs to be channelled using a state level infrastructure master plan that aligns with growth of planned economic clusters and urban infrastructure plans. To ensure effectiveness of spend and improve efficiency, the report suggests multiple initiatives across land acquisition, project scoping and awarding contracts and project management.

Report also details the key levers to unlocking real estate growth, including how affordability of real estate in Tier 1 cities can be improved, need for integrated urban planning which should include planning for green, open spaces and sports facilities to improve liveability and details incentives needed to develop other asset classes such as warehouses.

• E. Energy, renewables & sustainability: Maharashtra needs to increase its installed capacity to cater to $1Tn GDP aspiration, and address growing industrial electricity consumption. Maharashtra needs to grow its installed capacity from 44 GW in FY23 to 73 GW in FY28, with about 34 GW coming from renewables to help Maharashtra achieve NDC targets. Solar power would need to grow from current ~4 GW to 16 GW. The new installations will require 1+ lakh acres of land.

Accelerating growth in renewables needs multiple initiatives, such as promoting utility scale solar to enabling solar adoption in agriculture at both feeder and farm level, removing additional charges

for renewables, encouraging open access, upgradation of grid infrastructure and developing energy storage solutions.

• F. Key enablers

• Ease of Doing Business: From all district level and expert interactions, improving ease of doing business has emerged as one of top two areas that Maharashtra needs to focus on, along with competitive power tariffs. Complex processes for approvals and subsidy payment with unpredictable timelines and delays needs to be addressed. This report suggests Udyog Seva Kendras, centres akin to Passport Seva Kendra, can be developed, that can help companies, especially MSMEs, manage their approval and subsidy processes. Maharashtra should also look to have a dedicated entity to attracting and executing large projects.

• Cost of power: One of the critical factors that impacts the attractiveness of businesses across manufacturing and select services such as hospitality is cost of power. The state must consider several initiatives to reduce power costs and bring it in line with peer states, including focus on renewables.

• Land: 2 lakh+ acres of land will be needed for growing manufacturing and setting up target renewable energy capacity. Additional land will be needed for other infrastructure development and services. To facilitate land acquisition, Maharashtra can consider several initiatives such as unlocking state government land, restructuring existing land to suit the needs of businesses, simplify land acquisition process (especially conversion of agricultural land).

• Other key enablers: The report captures other key enablers needed such as a need for Common Effluent Treatment Plants (CETPs) and support exporters' participation in marketing activities.

• Skill development: Reaching $1Tn GDP by FY28 will need 15 Mn new jobs. Skill development will need to focus on 2 aspects: improving employability and entrepreneurship building. Report focuses on how industry academia engagement can be improved across content creation and delivery, and how apprenticeship program needs to be improved.

• MSME enablement: MSME contribute to 30% of India's GDP, and the report details key challenges MSME face. One key issue is managing working capital, that the state can help improve via mandating TReDS, and improving MSME's access to credit.

• G. Economic & Social Impact: As Maharashtra capitalizes on opportunities across agriculture, industry and services and accelerates its economy to achieve $1Tn target, multiple economic and social factors will improve such as:

• Creation of 15Mn+ new jobs, with increased avenues to drive up women labour force participation

• Per capita GDP increase from INR 2.5 lakhs in FY22 to INR 5.3 lakhs in FY28, with 2x increase in farmer income

• Sustainable growth, with increased share of renewable energy, 20% reduction in emission intensity

• Improved financial inclusion, with greater penetration of insurance and credit

• Enhanced quality of life, with improved health, education services, quality of living in large cities

• Balanced growth across all regions of Maharashtra





BizCare
ARE YOU LOOKING FOR
MIDC PLOTS / INDUSTRIAL GALAS
IN MAHARASHTRA ?
OUR SERVICES
MIDC Plot Allotment
Resale of Plots / Galas
MIDC Plot Transfer Approvals
Consent to Mortgage ( Loan related approvals )
All permissions under MIDC, MPCB
Government Subsidies & Incentives
Contact Dhananjay Deshmukh
www.bizcareadvisors.com
deshmukh@bizcareadvisors.com
+91 9307975854


Prosperise
BUSINESS CONSULTANCY LLP
START
YOUR BUSINESS
IN DUBAI (UAE)
Options for incorporating companies
Dubai Mainland Company
Free Zone Company
Offshore Company
Contact Rohan Tendulkar
www.prosperise.in
rohan@prosperise.in
+91 7738990548
1, Matruchaya, GV Scheme Road No 1, Mulund East, Mumbai- 400081

# नाशिकला ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स कार्यशाळा






जागतिकीकरणाच्या स्पर्धेत ऑनलाईन व्यापारासाठी स्थानिक व छोट्या व्यापारी, उद्योजकांना ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स च्या माध्यमातून केंद्र सरकारने व्यापार वृध्दी करण्यासाठी मोठ्या नेटवर्कची सुविधा उपलबद्ध करून दिली आहे. व्यापाराच्या वृध्दीसाठी विश्र्वस्त व देशभरात व्यवसाय वृद्धीची संधी उपलबध्द करून देणारे नेटवर्क म्हणजे ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स. या नेटवर्कवर बायर, सेलर, लॉजिस्टिक यांचे ६० नेटवर्क पार्टनर आहेत. त्यामुळे शहर व ग्रामीण भागातील छोटया व्यापारी व उद्योजकांनी ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्सवर आपली नोंदणी करून देशभरात आपला व्यापार व्यवसाय वाढवावा असे आवाहन ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्सचे महाराष्ट्र विभागाचे प्रमुख श्री. धीरज कुमार यांनी केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरतर्फे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष श्री. कांतीलाल चोपडा, उपाध्यक्ष श्री. नितीन बंग, शाखा चेअरमन श्री. संजय सोनवणे, ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्सचे महाराष्ट्र विभागाचे प्रमुख श्री. धीरज कुमार, कार्यकारिणी सदस्य श्री. राजाराम सांगळे, श्री. श्रीकांत पाटील उपस्थित होते. स्वागत कार्यकारिणी सदस्य राजाराम सांगळे यांनी केले. शाखा चेअरमन संजय सोनवणे यांनी प्रास्ताविकात महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली व जागतिकीकरणात व स्पर्धेत टिकून राहण्यासाठी, व्यापार, उद्योगांची वृद्धी करण्यासाठी ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स उपयुक्त असून सर्वांनी त्याचे महत्व समजून घ्यावे व व्यापार, उद्योगांची वृद्धी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा असे सांगितले. महाराष्ट्र चेंबर स्वातंत्र्य पूर्व काळापासून व्यापार-उद्योगांच्या वृद्धीसाठी विविध उपक्रम राबवत असल्याचे ते म्हणाले. ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स कार्यशाळेचे आयोजन उत्तर महाराष्ट्र व टप्प्याटप्प्याने संपूर्ण महाराष्ट्रात केले जाणार असल्याचे सोनवणे यांनी सांगितले. उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी मनोगतात पारंपारिक पद्धतीने व्यापार-व्यवसाय करण्याचे दिवस गेले असून ग्राहकांना दर्जेदार उत्पादन देण्याबरोबरच ते घरपोच व योग्य दरात देणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी छोट्या व स्थानिक व्यापारी-उद्योजकांनी काळाची पावले ओळखून आधुनिक तंत्रज्ञान अवगत करून व्यापार-व्यवसाय वाढविणे गरजेचे झाले आहे. केंद्र सरकारने ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स सुरु केले असून छोट्या व स्थानिक व्यापारी-उद्योजकांनी या नेटवर्कचा वापर करून देशभरात आपला व्यवसायाची वृद्धी करावी असे सांगितले. उपाध्यक्ष नितीन बंग यांनी व्यापार उद्योगांच्या विकासासाठी नवनवीन तंत्रज्ञान व पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स हे व्यापार वृद्धीच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असून सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा असे सांगितले. आभार सल्लागार दिलीप साळवेकर यांनी मानले. कार्यशाळेत कार्यकारिणी सदस्य राजेश मालपुरे, रणजितसिंग आनंद, दत्ता भालेराव, रवी जैन, ललित नहार, मिलिंद राजपूत, नाशिक धान्य किरकोळ किराणा संघटनेचे अध्यक्ष एकनाथ अमृतकर, सिंधुदुर्ग व्यापारी महासंघाचे सरकार्यवाह नितीन वाळके, झाकीर मन्सुरी, विजय गायकवाड, सोमनाथ बधान, कविता नरवडे व व्यापारी, उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आधुनिक डिजिटल व्यवसाय प्रणाली कार्यशाळा



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चर आणि नवी मुंबई स्वयंसेवी समन्वय संस्था यांच्या संयुक्त विदयमाने वाशी, नवी मुंबई येथे दि. ७ मे २०२४ रोजी ३ वाजता आधुनिक डिजिटल व्यवसाय प्रणाली कार्यशाळा ५० उद्योजकांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

प्रथम महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चरच्या उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याविषयी विस्तृत माहिती दिली. नवी मुंबई स्वयंसेवी समन्वय संस्थेच्या अध्यक्षा सौ. वृषाली मगदूम यांनी संस्थेविषयी आणि प्लास्टिक निर्मुलन याविषयी मार्गदर्शन केले. वासंती भगत यांनी कार्यक्रम रूपरेषा आणि सर्व उद्योजकांची व्यावसाय ओळख करून घेतली.

आयटी तंत्रज्ञान तज्ञ सौ. दीपा निकेत राऊत यांनी उद्योजकांना – व्यवसाय वृद्धीसाठी डिजिटल कार्यप्रणालीचा सोप्या पद्धतीने वापर, व्यवसाय ऑटोमेशन, शासन अर्थसहाय्य योजना, ब्रॅण्डिंगचे महत्व या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांवर सोप्या आणि माहितीपूर्णरित्या विस्तृत मार्गदर्शन केले.

उद्योजकांना मार्केटिंगबाबत आणि अडचणी यावर आधुनिक डिजिटल कार्यप्रणाली कशी वापरावी हे सांगीतले. कार्यक्रमास महाराष्ट्र चेंबर कार्यकारी सदस्य श्री. केशव कोरगावकर, श्री. मनीष पाटील, श्री. कोरडे, श्री. शंकर शिंदे, सौ. शिल्पा मोरे, सौ. सुधा बार्शीकर व इतर, यांच्या उपस्थित महाराष्ट्र चेंबरच्या या कार्यक्रमाबाबत सर्व उद्योजकांनी आभार मानले आणि असेच उपक्रम भविष्यात करण्यास विनंती केली व धन्यवाद दिले. उद्योजकांनी चर्चा केल्यानंतर उद्योग कार्यक्रमाची आनंदात सांगता झाली.

## बिझनेस फोरम आपल्यासाठी !

दिनांक २३ मार्च २०२४ मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमचा शुभारंभ चेंबर अध्यक्ष श्री. ललित गांधी यांच्या हस्ते झाला आहे. नाशिक येथे त्याचे प्रथम केंद्र सुरु झाले आहे.

राज्यात सर्व जिल्ह्यात अशी केंद्रे सुरु करायची असून त्या त्या जिल्ह्यातील चेंबर सदस्य त्याचे सभासद होऊ शकतील. या संदर्भात आधिक माहितीसाठी व असे केंद्र आपल्या भागात सुरु करण्याबाबत आपण कृपया जरुर संपर्क साधावा अशी विनंती आहे.

**श्री. दत्ता भालेराव,**
प्रमूख, मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरम समिती,
संपर्क – ९६८९० ३८८८०

# मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची २ री सभा



**मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमचे चेअरमन श्री. दत्ता भालेराव, शाखा चेअरमन श्री. संजय सोनवणे, श्री. राजाराम सांगळे व फोरमचे सदस्य.**

महाराष्ट्र चेंबरच्या मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची २ री सभा फोरमचे चेअरमन  दत्ता भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. चेअरमन दत्ता भालेराव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व फोरमच्या कार्यपध्दतीची माहिती दिली.

फोरमचे सदस्य श्री. राजाराम सांगळे यांनी प्रास्ताविकात फोरमची सविस्तर माहिती देऊन नाशिकसह राज्यात मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरम सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. फोरमच्या नियमाची माहिती दिली. शाखा चेअरमन श्री. संजय सोनवणे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली व मासिआ बिझनेस फोरममुळे होणाऱ्या फायद्याची माहिती दिली. याप्रसंगी उपस्थित सदस्यांनी आपल्या व्यापार - व्यवसायाच्या माहितीची देवाण - घेवाण केली व परिचय करून दिला तसेच काही सदस्यांना व्यवसायाच्या संधीबाबत रेफरन्स दिले.

पुढील बैठक मंगळवार दि. २१ मे २०२४ रोजी होणार असून वर्षभर दर महिन्याला दुसऱ्या व चवथ्या मंगळवारी फोरमच्या बैठका हॉटेल एक्सप्रेस इन येथे होणार असल्याचे श्री. दत्ता भालेराव यांनी सांगितले. तसेच फोरमची सदस्य संख्या ८० झाल्यावर अध्यक्ष श्री. ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योगमंत्री श्री. उदय सामंत यांच्या उपस्थितीत फोरमची बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले. फोरमची धोरण पुस्तिका पुढच्या बैठकीत देण्यात येणार असल्याचे सांगितले. सभेस श्री. सोमनाथ बधान, श्री. स्वप्निल जैन, श्री. अशोक घुले, श्री. रूपेश कणसे, श्री. श्रीकांत पडोळ, श्री. अविनाश कोठावदे, श्री. रवि जैन, श्री. सचिन शहा , श्री. आशुतोष गायकवाड, श्री. किरण नवले, श्री. योगेश देवरे, श्री. प्रशांत खैरनार, श्री. मंगेश टर्ले, श्री. जाकीर मन्सुरी, श्रीमती निशा पठारे, सौ. अनुपमा सिंग, श्री. अशोक रहाणे, श्री. महेंद्र एकबोटे, श्री. संदिप सोमवंशी, श्री. विजय गायकवाड, श्री. शंकर आव्हाड उपस्थित होते.

# जळगाव पुणे विमानसेवा सुरू
# आठवड्यातुन चार दिवस उड्डाण तिकीट बुकिंग सुरू

जळगाव विमानतळावरून मागील महिन्यापासून हैदराबाद व गोव्यासाठी विमान सेवा सुरू झाले.  त्यानंतर दिनांक २७ मे २०४ जळगाव- पुणे विमानसेवा नियमित सुरू केली जाणार आहे. आठवड्यातून चार दिवस ही सेवा राहणार आहे. विमानतळावरून गेल्या महिन्यात गोवा ,जळगाव, हैदराबाद अशी विमानसेवा फ्लाय ९१ या विमान कंपनीने सुरू केली. या विमानसेवेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यानंतर पुण्यासाठी विमानसेवा सुरू करण्याबाबत देखील जळगावकरांची मागणी होती. त्यानुसार विमान कंपनीने दिनांक २४ व २५ मे रोजी प्रायोगिक तत्त्वावर ही सेवा दिली. त्यानुसार गोव्यावरून जळगावला तर जळगाववरून पुण्याला आणि पुण्यावरून जळगाव आणि नंतर गोव्याला शुक्रवारी विमानाने उड्डाण केले. त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पुणे येथे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षात घेता दिनांक २७ मे पासून पुणे येथे विमान सेवा सुरू करण्यात आली. तिकीट बुकिंगला सुरुवात विमान कंपनीने २७ मे ते २६ ऑक्टोबर या काळातील गोवा जळगाव पुणे या विमानसेवेचे शेड्युल तयार केले आहे. त्यानुसार तिकीट बुकिंगला देखील सुरुवात झाली आहे. यात गोवा जळगाव गोवा ही सेवा दररोज, पुणे जळगाव पुणे ही सेवा आठवड्यातील मंगळवार, गुरुवार, शुक्रवार आणि रविवार अशी राहणार आहे.

### महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा पाठपुरावा

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी आपल्या शिष्टमंडळासह दीड वर्षापासून जळगाव ते पुणे, गोवा, हैदराबाद, अहमदाबाद, मुंबई, इंदूर या शहरांसाठी विमान सेवा सुरू करण्यासाठी प्रयत्नशील होते.  गोवा हैदराबाद पाठोपाठ आता जळगाव पुणे सेवा सुरू झाल्याने त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

# मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची बैठक संपन्न



व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक, कृषी व्यवसाय यांच्या व्यवसाय वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे सुरु करण्यात आलेल्या मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची बैठक चेअरमन दत्ता भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. २३ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ७.३० ते १०.३० यावेळेत हॉटेल एक्सप्रेस इन सिंफनी हॉलमध्ये उत्साहात संपन्न झाली.

सुरवातीला अग्रिकल्चर समितीचे को–चेअरमन राजाराम सांगळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची रचना व कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविकात मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमचे चेअरमन दत्ता भालेराव यांनी फोरम सुरु करण्यामागचा उद्देश सांगितला. चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या संकल्पनेतून मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची सुरवात नाशिकला करण्यात आली आहे. व्यापारी, उद्योगांच्या विकासासाठी स्वातंत्र्यापूर्वी स्थापन झालेल्या महाराष्ट्र चेंबरच्या सभासदांचे जाळे राज्यात सर्व जिल्ह्यात असून देश व परदेशातील चेंबरबरोबर व्यापार, उद्योग वाढीच्या दृष्टीने सामंजस्य करार झालेले आहेत. त्याचा फायदा सभासदांना व्हावा, परस्परांत व्यवसाय होऊन व्यापार, उद्योगाची वृद्धी होण्यासाठी मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरम महत्वपूर्ण ठरणार असल्याचे दत्ता भालेराव यांनी सांगितले.

याप्रसंगी उपस्थित सदस्यांनी आपल्या व्यवसायांची ओळख करून दिली. त्यांच्या व्यवसाय, उद्योगांच्या, गरजा, ग्राहक, बाजारपेठ, उत्पादनाचा दर्जा यांची सविस्तर माहिती दिले. नाशिकपासून राज्य, देश व जागतिक स्तरावर व्यवसाय वृध्दीसाठी बाजारपेठ व ग्राहकांच्या माहितीची देवाण घेवाण केली. तसेच प्रत्येकाला व्यवसाय वृद्धीसाठी उपस्थित सदस्यांनी त्यांच्याकडे असलेले रेफरन्स दिले. प्री स्कुल, सोलर, प्रॉडक्ट पॅकिंग, डिझाईन, मार्केटिंग, इलेक्ट्रिकल पार्ट, फायर फायटिंग, टूर्स,मनुष्यबळाची गरज, फूड व केटरिंग यासह विविध क्षेत्रातील बाजारपेठ व ग्राहक यांच्या माहितीवर चर्चा आणि देवाण–घेवाण झाली. आभार संदिप सोमवंशी यांनी मानले. याप्रसंगी मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमचे चेअरमन दत्ता भालेराव, अग्रिकल्चर समितीचे को–चेअरमन राजाराम सांगळे, कार्यकारीणी सदस्य हेमंत कांकरिया, प्रशांत जोशी, रविंद्र झोपे, रुपेश कणसे, विजय गायकवाड, डॉ. अनुपमा डहाळे, श्रीकांत पडोळ, किरण नवले, श्रीकांत पाटील, संदिप सोमवंशी, रतन पडवळ, सल्लागार दिलीप साळवेकर, सहायक सचिव अविनाश पाठक, सचिन जाधव आदिसह फोरमचे सदस्य उपस्थित होते.



# जागतिक स्तरावर निर्यात करताना ग्राहकांचा कल माहिती असणे आवश्यक - शरद नानापुरे




**कृषी निर्यात संधी चर्चासत्रात मार्गदर्शन करतांना तज्ञ शरद नानापुरे समवेत कृषी समितीचे को चेअरमन राजाराम सांगळे, सल्लागार दिलीप साळवेकर**

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड अँग्रीकल्चरच्या उत्तर महाराष्ट्र शाखेच्या वतीने शनिवार दिनांक २० एप्रिल २०२४ रोजी कृषी निर्यात संधी याविषयावर चर्चासत्र संपन्न झाले. याप्रसंगी फोरम फॉर इंटिग्रेटेड अग्रीकल्चर डेव्हलपमेंट कंपनीचे अध्यक्ष व तज्ञ मार्गदर्शक शरद नानापुरे (पुणे) यांनी मार्गदर्शन केले. कृषी क्षेत्रातील उत्पादने निर्यातीसाठी खूप मोठे क्षेत्र असून जागतिकस्तरावर कृषी उत्पादन निर्यातीसाठी संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. युरोप, आफ्रिका, आशिया येथे निर्यात करतांना आवश्यक कागपत्र, तेथील बाजारपेठ, मालाचा दर्जा, ग्राहक यांची माहिती देऊन यशस्वी निर्यातदार होण्यासाठी निर्यातदाराला जागतिक स्तरावर ग्राहकांचा कल काय आहे याची माहिती असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शरद नानापुरे यांनी केले.

जागतिक बाजारपेठेची माहिती देताना प्रत्येक देशाची क्वालिटी पॉलिसी असते, कृषी माल निर्यात करताना क्वालिटी पॉलिसीची माहिती असावी, युरोप, आशिया, आफ्रिका येथे निर्यात करतांना तेथील बाजारपेठ कशी आहे व बाजारपेठेची गरज व ग्राहक समजून घेऊन उच्च दर्जा, मध्यम दर्जा व सामान्य दर्जाच्या मालाची निर्यात करावी. तसेच ट्रेसीबीलीटी एक्झिक्युशन करणे महत्वाचे असल्याचे सांगितले.

सुरवातीला अग्रिकल्चर समितीचे को-चेअरमन राजाराम सांगळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. वक्ते शरद नानापुरे यांचा भगवद गीता देऊन सत्कार केला व परिचय करून दिला. तसेच महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती देऊन अग्रिकल्चर समितीने कृषी क्षेत्रासाठी केलेल्या उपक्रमाची माहिती दिली. चर्चासत्राच्या शेवटी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नानापुरे यांनी दिले. सहायक सचिव अविनाश पाठक यांनी मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरमची माहिती दिली व उपस्थितांचे आभार मानले.

कृषी निर्यात संधी चर्चासत्रात सुभाष जयपूरकर, गोकुळ भागवत, अजित पवार, भूषण कुलकर्णी, योगेश देवरे, दिपक कुमकर, योगेश देशमुख, राजेश देशमुख, अतुल गुंजाळ, नानासाहेब जाधव, सोमनाथ कासट, श्रीकांत पडोळ आदिसह कृषी संबंधित व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक आणि नवउद्योजक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# केंद्रिय वित्तराज्यमंत्री श्री. पंकज चौधरी भेट



**केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांना निवेदन देताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी खा. धैर्यशील माने, संदीप भंडारी व अन्य मान्यवर**

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या आर्थिक बिल २०२३ मध्ये नव्याने केलेल्या सेक्शन ४३ मधील तरतुदीनुसार सूक्ष्म व लघु उद्योगांना ४५ दिवसात उधारी न भागविल्यास त्या रकमेवर आयकर भरावा लागण्याच्या तरतुदीला मुदतवाढ देण्याच्या मागणीवर सकारात्मक विचार करू अशी ग्वाही केंद्रीय अर्थराज्यमंत्री नामदार पंकज चौधरी यांनी दिली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी व खासदार धैर्यशीलराव माने यांनी सदरहून मुदतवाढीच्या मागणीसाठी केंद्रीय अर्थराज्यमंत्री नामदार पंकज चौधरी यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन एक सविस्तर निवेदन त्यांना सादर केले. याप्रसंगी झालेल्या चर्चेमध्ये त्यांनी वरीलप्रमाणे आश्वासन दिले.

**व्यावहारीक अडचणी**

वस्त्रोद्योगांमध्ये आणि इतरही उद्योगांमध्ये तीन ते चार महिने उधारी परंपरा अनेक वर्षापासून आहे. त्यानुसार भांडवलाची आणि पेमेंटची एक साखळी सर्व ठिकाणी झालेली आहे. अचानकपणे आयकर कायद्यामध्ये बदल करून हा नियम अंमलात आल्यास व्यापार उद्योगांमध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. या तरतुदीमुळे छोट्या उद्योगांच्या रद्द होत असलेल्या ऑर्डर्स, व्यापारी वर्गाला उधारी देण्याचे बंधन व आपली स्वतःची उधारी वसुलीसाठी संरक्षण नसणे याकडे नामदार महोदयांचे लक्ष वेधण्यात आले. शिवाय एकूण भांडवल व्यवस्थेमध्ये गोंधळ निर्माण असल्याने या संपूर्ण विषयाचे पुरेसे प्रबोधन होण्याची मोठी गरज आहे आणि म्हणून या तरतुदीच्या अंमलबजावणीस एक वर्ष मुदतवाढ द्यावी अशी आग्रही मागणी करण्यात आली. अर्थराज्यमंत्री नामदार पंकज चौधरी यांनी निर्माण झालेल्या अडचणी लक्षात घेऊन सकरात्मक विचाराने न्याय देण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरच्या युवा उद्योजक समितीचे प्रमुख संदीप भंडारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# महानगरपालिकेच्या परवाना शुल्क धोरणास महाराष्ट्र चेंबर व व्यापारी संघटनांचा विरोध

नाशिक महानगरपालिकेने आवश्यक उत्पन्न वाढ व्हावी म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या आधारे नाशिक शहरामधील दुकाने व वाणिज्य आस्थापनांकडून परवाना शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला नाशिक शहरातील सर्व लहान, मोठे दुकानदार, व्यावसायिक व सर्व व्यापारी संघटनांनी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली विरोध केला आहे.

खरे तर उत्पन्न वाढीसाठी परवाने देणे, शुल्क वाढवणे हा विचारच अयोग्य आहे. शिवाय सरकारी धोरण परवाने कमी करणे आणि व्यापार स्नेही धोरण राबविणे असे आहे. एक देश, एक धोरण, एक बाजार व एकच परवाना हे मुख्य सूत्र आहे. त्यामुळे नवीन परवाना धोरण व ते हि ठोस कारणाशिवाय अंमलात आणणे हे अयोग्य असून असा कोणताही परवाना, वाढीव शुल्क लागू करण्यास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चर व सर्व व्यापारी संघटनांचा विरोध आहे.

नाशिक धान्य किराणा घाऊक व्यापारी संघटना, नाशिक धान्य किराणा किरकोळ व्यापारी संघटना, नवीन नाशिक धान्य व्यापारी संघटना सातपूर परिसर किराणा व्यापारी संघटना जेलरोड किराणा व्यापारी संघटना नाशिक, कंजूमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन, नाशिक रिटेल क्लोथ मर्चंट असोसिएशन, नाशिक होलसेल क्लॉथ अँन्ड होजिअरी मर्चंट असोसिएशन, नाशिक सराफ असोसिएशन, नाशिक मोटर मर्चंट असोसिएशन, नाशिक क्लॉथ मर्चंट असोसिएशन, नाशिक रेडिमेट अँन्ड होजिअरी मर्चंट असोसिएशन, नाशिक बुक सेलर्स अँन्ड स्टेशनरी असोसिएशन, नाशिक इलेक्ट्रिकल मर्चंट सोशल वेल्फेअर असोसिएशन, नाशिक इलेक्ट्रिकल असोसिएशन, नाशिक इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन, मोबाईल असोसिएशन, नाशिक भांडी व्यापारी महासंघ, नाशिक महानगर सिमेंट व्यापारी वेल्फेअर असोसिएशन, नाशिक हार्डवेअर अँण्ड पेंट्स मर्चंट असोसिएशन, कॉम्प्युटर असोसिएशन आदि संघटनांतर्फे या निर्णयाचा विरोध करण्यात आला आहे. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, महाराष्ट्र चेंबरच्या व्यापार समितीचे चेअरमन व नाशिक धान्य किराणा घाऊक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रफुल्ल संचेती, नाशिक धान्य किराणा किरकोळ व्यापारी संघटनेचे अध्यक्ष एकनाथ अमृतकर, नाशिक महानगर सिमेंट व्यापारी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष मदन पारख आदिसह सर्व व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी विरोध केला आहे.

# कस्टम क्लिअरिंग केंद्रांवर अधिकचे कर्मचारी व वेळ वाढविणार

## - अजित दान, अप्पर आयुक्त, कस्टम

### महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाला आश्वासन



**कस्टमचे अप्पर आयुक्त अजित दान यांना निवेदन देतांना उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा,शाखा चेअरमन संजय सोनवणे, ॲग्रिकल्चर समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, सल्लागार दिलीप साळवेकर**

कस्टमचे अप्पर आयुक्त अजित दान व उपायुक्त ओमकार कांचनगिरे यांची महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन निर्यातदार, डीलर्स, शेतकरी यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या मांडल्या. समस्यांचे निराकरण करण्यासाठी कस्टम क्लिअरिंग केंद्रांवर अधिक आणि पुरेसे कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी केली. समस्या जाणून घेऊन सकारात्मक चर्चा करून तात्काळ कस्टम क्लिअरिंग केंद्रांवर कर्मचारी नियुक्ती व वेळ वाढविण्यात येईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

ॲग्रिकल्चर समितीचे चेअरमन राजाराम सांगळे यांनी नाशिकमधून मोठ्या प्रमाणात निर्यात होत असते सध्या द्राक्षाचा हंगाम सुरु आहे द्राक्षांची निर्यात करतांना येणाऱ्या विविध अडचणीची माहिती देऊन वेळेवर कस्टम केंद्रावरून परवानगी न मिळाल्यास उशीर होतो आणि माल खराब होऊन नुकसान होते त्यासाठी केंद्रावर तपासणीची वेळ वाढविणे आवश्यक असल्याचे सांगितले. उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी कस्टम क्लिअरिंग केंद्रांवर ३ शिप मध्ये काम व्हावे व त्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी असे सांगितले. शाखा चेअरमन संजय सोनवणे यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती देऊन निर्यात वाढावी यासाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे विविध उपक्रम राबवित असल्याचे सांगितले. तसेच निवेदनात कस्टम अधिकाऱ्यांची सध्याची वेळ सकाळी १० ते ६.०० अशी आहे जी दोन शिफ्टमध्ये सकाळी ९ ते ६ आणि संध्याकाळी ६ ते १२ अशी बदलणे आवश्यक आहे. रेफ्रिजरेटेड कंटेनर न्हावाशेवा JNPT मधून येतात, कंटेनर बहुतेक ट्रॅफिक समस्यांमुळे दुपारपर्यंत कोल्ड स्टोरेजमध्ये पोहोचतात आणि संध्याकाळी कस्टम क्लिअरन्ससाठी जातात. बऱ्याच वेळा कंटेनर चालकांकडून या व्हॅनचे जनरेटर बंद केले जातात त्यामुळे निर्यात सामग्रीचा दर्जा खराब होतो. पूर्ण हंगाम असल्याने कंटेनरचा भारही जास्त असतो. तपासणीसाठी प्रतीक्षा कालावधी आणि त्यानंतर प्रत्यक्ष माल पाठवण्याचा कालावधी बराच मोठा आहे ज्यामुळे द्राक्षांच्या गुणवत्तेवर तसेच शेल्फ लाइफवर परिणाम होतो. या समस्याचा विचार करून सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली असल्याचे सांगितले.

शिष्टमंडळात उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, ॲग्रिकल्चर समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, सल्लागार दिलीप साळवेकर, सहाय्यक सचिव अविनाश पाठक उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबरतर्फे नवउद्योजकता ( स्टार्टअप ) कार्यशाळा संपन्न






महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर तर्फे गुरुवार दिनांक ७ मार्च २०२४ रोजी दुपारी ३. ३० वाजता महाराष्ट्र चेंबर चे उत्तर महाराष्ट्र शाखा कार्यालय, ४९, ५ वा मजला बिजनेस बे श्रीहरी कुटे मार्ग, मुंबई नाका येथे नवउद्योजकता (स्टार्टअप) कार्यशाळेचे झाली.

या कार्यशाळेत या विषयातील तज्ञ श्री. श्रीकांत पाटील यांनी मार्गदर्शन यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, नवउद्योजकांना शासनाच्या मार्फत जे काही ठोस प्रोत्साहन आणि मदत केली जाते आहे त्याची ओळख होणे आवश्यक आहे.

सुशिक्षित तरुणांना, उद्योग सुरु करू इच्छिणाऱ्यांना नवउद्योजकता (स्टार्टअप ) हि संकल्पना, बाजार किती मोठा आहे, स्टार्टअपच्या बाजारपेठेचा आकार त्यांच्या संधी, शासनाचे धोरण, शासनाच्या योजना कशा मिळतात, नवउद्योजकता (स्टार्टअप ) कसे कार्य करतात, नवउद्योजकाला (स्टार्टअप )फंडिंग प्रारंभिक टप्पे, नवउद्योजकाला (स्टार्टअप ) निधी कसा दिला जातो, नवउद्योजक (स्टार्टअप ) कसे यशस्वी होतात याची माहिती चित्रफितीद्वारे दिली. कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अनिसा तडवी यांनी शासनाच्या कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागातर्फे राबविण्यात असलेल्या विविध योजना व कार्याची माहिती दिली तरुणांनी नोकरीबरोबरच उद्योगांकडेही वळावे त्यासाठी शासन मदत करत असल्याचे सांगितले.

सुरुवातीला उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन संजय सोनवणे यांनी सर्वांचे स्वागत केले. उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली तसेच बेरोजगारी कडून स्वयंरोजगार कडे तरुणांनी, युवा वर्गाने वळावे यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासनतर्फे नवउद्योजकता उपक्रम राबविण्यात आला आहे. त्याचा फायदा सर्वांनी घेतला पाहिजे. स्वयंरोजगार करून आपल्याबरोबरच इतरांनाही रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्र चेंबरने पुढाकार घेऊन नवउद्योजकता कार्यशाळेची सुरुवात केल्याचे सांगितले.

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अनिसा तडवी, तज्ञ मार्गदर्शक श्रीकांत पाटील, कार्यकारिणी सदस्य मिलिंद राजपूत उपस्थित होते.

सूत्रसंचालन कार्यकारणी सदस्य मिलिंद राजपूत यांनी केले तर आभार कार्यकारणी सदस्य सचिन शहा यांनी मानले. कार्यशाळेत महाराष्ट्र चेंबरचे कार्यकारणी सदस्य राजाराम सांगळे, रणजीतसिंग आनंद, एकनाथ अमृतकर, शेखर दशपुते, अरुण जातेगावकर, विजय काकड यांच्यासह मोठ्या प्रमाणात तरुण व नवउद्योजक सहभागी झाले होते.

# बांधकाम क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानची माहिती घ्या : निरंजन साने

## महाराष्ट्र चेंबर व स्कॉन इन्फ्राच्या वतीने चर्चासत्र संपन्न




**महाराष्ट्र चेंबरच्या पदाधिकारी व बांधकाम व्यावसायिक यांचा सन्मान करताना निरंजन साने व सोबत इतर मान्यवर.**

जागतिक स्तरावर बांधकाम क्षेत्रात दररोज नवनवीन बदल होत आहेत,अत्याधुनिक तंत्रज्ञान येत आहे गुणवत्ता व दर्जात्मक व दीर्घकाळ टिकाऊ बांधकामे होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती बांधकाम व्यावसायिक यांनी वेळोवेळी घ्यावी व त्याप्रमाणे बांधकामात त्या तंत्रज्ञानचा वापर करावा असे प्रतिपादन स्कॉन इन्फ्रा प्रेस्ट्रेस एलएलपीचे उपाध्यक्ष निरंजन साने यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर बारामती शाखा व स्कॉन इन्फ्रा यांच्या वतीने बारामती तालुक्यातील बांधकाम व्यावसायिक, व्यापारी , उद्योजक, व बांधकाम क्षेत्राशी संलग्न व्यावसायिक यांच्यासाठी चर्चासत्र व मार्गदर्शन कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी निरंजन साने यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे बारामती शाखा चेअरमन शरद सूर्यवंशी, उपाध्यक्ष शिवाजीराव नींबाळकर, उपाध्यक्ष सुशील सोमाणी, सदस्य मनोज तुपे, परफुल्ल तावरे व क्रेडाईचे अध्यक्ष राहुल खाटमोडे, बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष शामराव राऊत, सार्वजनिक बांधकाम विभागचे उपअभियंता रामसेवक मुखेकर व सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्र चेंबरच्या वतीने विविध कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा, तज्ञांचे मार्गदर्शनच्या माध्यमातून बांधकाम व्यावसायिक व संबंधित व्यावसायिक यांना सहकार्य करण्यास कटिबद्ध असल्याचे चेअरमन शरद सूर्यवंशी यांनी सांगितले.

बांधकाम व्यावसायिक यांनी नवीन बदलाचा अभ्यास करून ग्राहकांना उत्तम बांधकामे द्यावीत असे शिवाजीराव निंबाळकर यांनी सांगितले.

राहुल खाटमोडे, शामराव राऊत व किरण भोईटे यांनी मनोगत व्यक्त केले. पुल बांधणे, अद्यावत व भव्य इमारत बांधणे, दगडाची बांधकामे आदी बांधताना वापरावयाचे साहित्य, दक्षता, वेळ आदीबाबत बांधकाम व्यावसायिक यांच्या प्रश्नांना उत्तरे निरंजन साने यांनी दिली. सूत्रसंचालन श्री. सावळेपाटील यांनी केले तर आभार सुशील सोमाणी यांनी मानले.









# आढावा... विकासाचा...

# 2 वर्षांच्या कार्याचा...

कृषी क्षेत्र

लघु उद्योग

वस्त्रोद्योग

पर्यटन परिषद

# शेठ वालचंद हिराचंद ५० वे स्मृती व्याख्यान व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांचा पदग्रहण सोहळा

## राजभवनातील दरबार हॉल मध्ये साकारला सुवर्णयोग







**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी यांना राजभवनातील दरबार हॉलमध्ये अध्यक्ष पदाचा कार्यभार सोपवताना महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, लोकसभा अध्यक्ष ओमजी बिर्ला, अरविंद दोशी दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स द्वारा आयोजित शेठ वालचंद हिराचंद यांच्या ५० व्या व्याख्यानमालेप्रसंगी मुख्य भाषण करताना लोकसभा अध्यक्ष ओमजी बिर्ला व्यासपीठावर उपस्थित राज्यपाल रमेश बैस, ललित गांधी, अनिलकुमार लोढा.**

**मुंबई :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅण्ड अॅग्रीकल्चरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांचा नुकताच राजभवन येथे पदग्रहण सोहळा संपन्न झाला. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते अध्यक्ष पदाचा कार्यभार सोपविण्यात आला. या सोहळ्यासाठी राज्यभरातून व्यापारी, उद्योजक सहभागी झाले.

महाराष्ट्र चेंबरच्या इतिहासात ललित गांधी हे पहिलेच अध्यक्ष आहेत, ज्यांचा राजभवन मुंबई येथे पदग्रहण सोहळा झाला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'चे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या स्मृती व्याख्यानाचे सुवर्णमहोत्सवी पुष्प शुक्रवारी राजभवनातील दरबार हॉलमध्ये गुंफण्यात आले. त्यावेळी हा पदग्रहण सोहळा झाला. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते अध्यक्षीय ट्रॉफी देऊन पदग्रहण सोहळा झाला. तर वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा यांना सन्मानचिन्ह देऊन पदग्रहण सोहळा झाला. दिमाखदार पदग्रहण सोहळ्यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यपाल रमेश बैस, विविध देशांचे कॉन्सुलेट, उद्योजक, व्यापारी यांनी अध्यक्ष ललित गांधी यांना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यपाल रमेश बैस यांचा चांदीचा कलश, शाल देऊन सन्मापूर्वक सत्कार करण्यात आला.








कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रातील कार्यक्रमांत शेठ वालचंद हिराचंद यांच्या जीवनावर आधारित व्हिडीओ गीत 'भारत गौरव'चे अनावरण करताना शेठ वालचंद हिराचंद परिवारातील मान्यवर.



# शेठ वालचंद हिराचंद तरुणांसाठी दीपस्तंभ

## शेठ वालचंद हिराचंद कुटुंबियांनी उलगडला ऐतिहासिक जीवनप्रवास....

**मुंबई:** शेठ वालचंद हिराचंद नव्या पिढीतील तरुणांसाठी दीपस्तंभ आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील लोकांना उद्योग व व्यापारात येण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिकीकरणाचा पाया रचला. आत्म निर्भर भारताचे स्वप्न वालचंद हिराचंद यांनी पाहिले आणि ते पूर्णही केले. आत्मनिर्भर भारताचा पाया रचण्याचे श्रेय पूर्णपणे त्यांचे आहे. चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांचे भारतीय उद्योग जगतातील अफाट योगदान असल्याचा सूर महाराष्ट्र चेंबरतर्फे आयोजित व्याख्यानमालेच्या दुसऱ्या सत्रात व्यक्त करण्यात आला. वालचंद हिराचंद यांनी कुटुंबियांनी त्यांच्या स्मृती जागविल्या.

दुसऱ्या सत्रात महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी उपस्थित शेठ वालचंद हिराचंद यांच्या परिवारातील महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष आणि प्रिमिअर ऑटो इलेक्ट्रीक लि. चे माजी अध्यक्ष अरविंद दोशी, शिष्यराज जोशी, हिंदुस्तान कन्स्ट्रक्शनचे श्री अजित गुलाबचंद, वालचंद नगर इंडस्ट्रीजचे श्रीराम जोशी, वालचंद पेपर फर्स्टच्या श्रीमती पल्लवी झा, प्रीतम जोशी, श्रीमती प्रतिभा जोशी यांना व्यासपीठावर आमंत्रित करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी शेठ वालचंद हिराचंद यांच्या कार्याचा आढावा घेतला शेठ वालचंद हिराचंद यांचे कार्य एका पुस्तकाच्या माध्यमातून समजू शकत नाही. शेठ वालचंद हिराचंद यांचे कार्य खूप मोठे असून जलभूमी व आकाश सर्व व्यापून त्यांनी देशाच्या व्यापार उद्योगांच्या विकासाचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.



महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. चे कार्यकारी संचालक व सीईओ चिराग दोशी



शेठ वालचंद हिराचंद यांच्या जीवनचरित्रावरील उत्कृष्ठ चित्रफीत निर्मितीबद्दल राहुल खंदारे यांचा सत्कार करताना अरविंद दोशी.

## 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' च्या क्लस्टर प्रस्तावांना प्राधान्याने मंजुरी दिली जाईल - नाम. नारायण राणे



**केंद्रिय उद्योगमंत्री नारायण राणे यांना निवेदन देतांना अध्यक्ष ललित गांधी,वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, रविंद्र माणगावे, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, संदिप भंडारी.**

**नवी दिल्ली** : राज्याच्या व्यापार–उद्योग क्षेत्राची शिखर संस्था म्हणुन कार्यरत 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' च्या वतीने प्रस्तावित केलेल्या विविध उत्पादनांच्या क्लस्टर्स ना आवश्यक प्रक्रियेनंतर प्राधान्याने मंजूरी दिली जाईल अशी ग्वाही केंद्रीय MSME मंत्री नारायण राणे यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली चेंबरच्या मॅनेजिंग कमिटीतील वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, रविंद्र माणगावे, ट्रस्ट बोर्डचे अध्यक्ष आशिष पेडणेकर, जीसी मेंबर संदिप भंडारी यांच्या शिष्टमंडळाने नवी दिल्ली येथे एसएसएमइ मंत्रालयात नाम. नारायण राणे यांच्या समवेत संयुक्त बैठकीत सहभाग घेतला त्याप्रसंगी ते बोलत होते.

## वस्त्रोद्योगावरील प्रस्तावित जीएसटी दरवाढ रद्द करण्यासाठी पुढाकार घेऊ : केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री नामदार पियुष गोयल यांचे ओशासन

**नवी दिल्ली :** वस्त्रोद्योग क्षेत्रातील प्रस्तावित जीएसटी वाढीचे दर कमी करण्यासाठी वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या वतीने जीएसटी कौन्सिलकडे प्रयत्न करून निर्णय मिळवला जाईल, असे ओशासन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री नामदार पियुष गोयल यांनी ललित गांधी यांना दिले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर' च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने शुक्रवारी नवी दिल्ली येथे नामदार पियुष गोयल यांची भेट घेऊन त्यांना वस्त्र उद्योगासमोरील विविध समस्यांचे निवेदन सादर केले. विशेषता: वस्त्रोद्योगातील प्रस्तावित जीएसटी दरवाढीमुळे या उद्योगाला मोठा फटका बसण्याची शक्यता असून ही दरवाढ रद्द करणे आवश्यक असल्याचे आग्रही प्रतिपादन ललित गांधी यांनी केले. केंद्रीय वाणिज्य, उद्योग, ग्राहक संरक्षण, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांनी वस्त्र उद्योगासमोरील अडचणींची सरकारने योग्य दखल घेतली असल्याचे सांगून, दरवाढीचा हा निर्णय जीएसटी कौन्सिलने घेतला असल्याने यासंदर्भात केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयातर्फे जीएसटी कौन्सिलकडे पाठपुरावा करून ही दरवाढ रद्द करून घेण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले.

नामदार पियुष गोयल यांनी वस्त्रोद्योग क्षेत्रात विशेषता: तांत्रिक वस्त्रोद्योग वगैरेसारख्या नवीन क्षेत्रात प्रचंड संधी



**केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री नामदार पियुष गोयाल यांना निवेदन देऊन चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री चे अध्यक्ष ललित गांधी, सोबत पंकज पटेल व अन्य मान्यवर**

उपलब्ध असून आगामी काळात 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने' पुढाकार घेऊन नवीन संधीची माहिती व्यापार– उद्योग क्षेत्रापर्यंत पोहोचवावी व अधिकाधिक लोकांना नव्या संधीचा फायदा करून द्यावा असे आवाहन केले.

## व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी वाहतुकीचा खर्च कमी करा; निर्यात वाढवा - केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी



**केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते अध्यक्षीय ट्रॉफी देऊन नूतन अध्यक्ष ललित गांधी यांना पदभार देण्यात आला सोबत केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड, आमदार प्रकाश आवाडे.**

मुंबई : जगात भारत व देशात महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सर्वात अधिक गतीने वाढत आहे. निर्यात वाढवून आयात कमी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी व व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी वाहतुकीसाठी होणारा खर्च कमी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र चेंबरने राज्याच्या विकासासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. येणारा काळ इलेक्ट्रिक वाहनांचा असेल. इथेनॉलचा वापर मोठ्या प्रमाणात होणार असून शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. महाराष्ट्र चेंबरने राज्याचा जिल्हावार अभ्यास करून महाराष्ट्रच्या विकासाची ब्लु प्रिंट तयार करून द्यावी व महाराष्ट्र चेंबरचे नुतन अध्यक्ष ललित गांधी निश्चितच महाराष्ट्राच्या विकासाची ब्लु प्रिंट तयार करून त्यावर काम करतील याची खात्री असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

चेंबरच्या प्रथेप्रमाणे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अध्यक्षीय ट्रॉफी देऊन नूतन अध्यक्ष ललित गांधी यांचे पदग्रहण करण्यात आले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ व अर्थसंकल्पानंतर महाराष्ट्रातील विकासाची नवी दिशा याविषयावर परिषद व मार्गदर्शन असा संयुक्त कार्यक्रम केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी व केंद्रीय वित्त राज्यमंत्री श्री. भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दिनांक ५ फेब्रुवारी, २०२२ रोजी मुंबई येथे संपन्न झाला. सदर परिषदेचे फेसबुक, युट्युब, ट्विटरच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात आले.

## महाराष्ट्राच्या पोर्टस् विकासाबरोबर ड्राय पोर्टस् विकासासाठी विशेष योजना बनवु - नाम. सर्वानंद सोनोवाल



**केंद्रीय पोर्ट विकास, जलवाहतुक मंत्री नामदार सर्वानंद सोनोवाल यांच्या चर्चा करताना अध्यक्ष ललित गांधी सोबत जे.के. जैन**

महाराष्ट्राच्या विस्तृत समुद्र किनाऱ्याचा व्यापार, उद्योग वाढीसाठी सुनियोजित उपयोग करण्याबरोबरच पोर्ट ट्रस्टच्या मालकीची बंदरे, खाजगी विकासकांनी विकसित केलेली बंदरे यांच्या दिर्घकालीन विकासाच्या नियोजनासह ड्राय पोर्टस्चे सध्याचे जाळे योजनाबध्द रीत्या विकसित करण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही केंद्रीय पोर्ट विकास, जलवाहतुक व आयुष खात्याचे कॅबिनेट मंत्री नाम. सर्वानंद सोनोवाल यांनी दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे नवनिर्वाचित अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्रातील शिपींग इंडस्ट्रीमध्ये विकासाच्या असलेल्या संधींची माहीती देउन चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या या क्षेत्रातील भरीव कामगिरीची माहीती विशद केली. तसेच महाराष्ट्रात नवीन ड्राय पोर्टस (इनलॅन्ड कन्टेनर पोर्ट) ला मंजुरी थांबवलेली आहे, ती पुन्हा सुरू करण्याची मागणी याप्रसंगी केली.

# ‘महाराष्ट्र चेंबर पत्रिके’चे व्यापार-उद्योग विकासात महत्त्वपूर्ण योगदान : दीपक कपूर



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे विविध विमानतळांच्या विकास कामासंबंधी चा प्रस्तावना दीपक कपूर यांना सादर करताना अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबर पत्रिका च्या ५१ व्या वर्षातील पहिल्या अंकाचे प्रकाशन करताना माहिती महासंचालक दीपक कपूर सोबत अध्यक्ष ललित गांधी, सागर नागरे.**

**मुंबई :** ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर’ चा एक ज्वलंत इतिहास असून महाराष्ट्रातील उद्योग वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे मोठे योगदान आहे. मराठी माणसाला उद्योग निर्मितीत प्रोत्साहन देत, उद्योगवाढीसाठी ‘महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स’ यांचे काम अखंडपणे सुरू आहे.

राज्याची शिखर संस्था असलेल्या ‘महाराष्ट्र चेंबर’ तर्फे व्यापार, उद्योग, कृषीपूरक उद्योग यांच्यासाठी अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणारे मासिक सातत्याने पन्नास वर्ष प्रकाशित करून आपली उपयुक्तता सिद्ध करणाऱ्या ‘महाराष्ट्र चेंबर पत्रिके’च्या ५१ व्या वर्षाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक दीपक कपूर यांच्या हस्ते आज मंत्रालयात करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

या पुस्तक प्रकाशन प्रसंगी ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे’ नवनियुक्त अध्यक्ष ललित गांधी, कार्यकारिणी सदस्य समीर दूधगावकर, तसेच प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबरच्या पर्यटन परिषदेत सहभागी होऊ - जी.किशन रेड्डी



**नाम. रेड्डी यांना महाराष्ट्र चेंबर च्या पर्यटन धोरण अहवाल सादर करताना ललित गांधी, संदिप भंडारी, मुकेश चौहाण. दुसऱ्या छायाचित्रात ललित गांधी यांचा सत्कार करताना केंद्रीय मंत्री नाम. जी. किशन रेड्डी.**

महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योग, कृषि व सेवा उद्योगाची शिखर संस्था असलेल्या ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स’ तर्फे आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय पर्यटन परिषदेत भारत सरकारचा पर्यटन विभाग सहभागीता करेल अशी ग्वाही केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक कार्य मंत्री नाम. जी.किशन रेड्डी यांनी केले.

‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स’ चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय पर्यटन यांनी यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांना परिषदेचे आमंत्रण दिले तसेच महाराष्ट्रातील पर्यटन विषयक विविध मागण्यांचे निवेदन सादर केले त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय मंत्री नाम. जी.किशन रेड्डी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ललित गांधी यांचा सत्कार केला.

# राज्यातील विमानसेवांचा कालबद्ध विकास केला जाईल - दिपक कपूर

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर संयुक्त बैठक संपन्न



**महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे व्हाईस चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक दिपक कपूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत बोलताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष करूनाकर शेट्टी, सौ शुभांगी तिरोडकर, रवींद्र माणगवे, सुधाकर देशमुख, चंद्रशेखर पुनाळेकर, सुनीत कोठारी, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे.**

राज्यातील विमानतळांच्या समस्या सोडविणे व विकास करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने निवेदनाद्वारे केलेल्या सुचनाबाबतही सकारात्मक विचार करून अंलबजावणी करण्यात येईल व राज्यातील विमानसेवांचा कालबद्ध विकास केला जाईल अशी ग्वाही महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे व्हाईस चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक दिपक कपूर यांनी दिली. महाराष्ट्र राज्यातील विविध शहरांतील विमानतळांचा विकास व नवीन सेवा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी चे व्हाईस चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक दिपक कपूर यांच्या समवेत वर्ल्ड ट्रेड सेन्टर मधील कार्यलयात झालेल्या संयुक्त बैठकित सहभाग घेतला.

याप्रसंगी प्रास्तविक करताना विमानतळांच्या समस्या सोडविणे व विकास करणे यासाठी महाराष्ट्र चेंबरची सिविल एव्हिएशन समिती संपूर्ण सहयोग असे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

### बैठकीतील महत्त्वपूर्ण घोषणा

- कोल्हापूर विमानतळासाठी लागणारा निधी महाराष्ट्र सरकार कडून मंजूर केला जाणार.
- रत्नागिरी विमानतळासाठी लागणारा निधी महाराष्ट्र सरकार कडून मंजूर केला जाणार आहे
- शिर्डी येथे स्वतंत्र कार्गो टर्मिनल उभारणार.
- अमरावती येथील विमानतळासाठी भारत सरकारकडून ५२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून पहिल्या टप्प्यातल्या ६.५ कोटी रुपये मिळाले आहेत. तसेच अमरावती विमानतळासाठी महाराष्ट्र सरकारकडून अतिरिक्त २३ कोटी मिळणार. असल्याचे दिपक कपूर यांनी सांगितले
- नोव्हेंबर २०२२ पासून अमरावती विमानतळावरून प्रवासी विमानसेवा सुरु करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत जाहीर करण्यात आला
- पुणे शिर्डी नागपूर विमान सेवा १८ फेब्रुवारी २०२२ पासून अलाइन्स एअर सुरु करणार.
- पुणे औरंगाबाद नागपूर सेवा १ मार्च पासून सुरू होणार.

## देश व राज्याची सुवर्ण युगाकडे वाटचाल; महाराष्ट्र चेंबरने महिला उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे - महामहिम राज्यपाल भगतसिंग कोशारी



**महामहिम राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी यांना सन्मानचिन्ह देउन सत्कार करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, सोबत पालकमंत्री छगनराव भुजबळ, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख.**

महाराष्ट्र चेंबरची शतक महोत्सवाकडे वाटचाल, महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्रनाशिक शाखेचे सुवर्ण महोत्सव वर्षात पदार्पण आणि देशाचा अमृत महोत्सव असा सुवर्ण योग जुळून आला आहे. त्यामुळे देशाची वाटचाल सुवर्ण युगाकडे होईल असे सांगितले. देशाच्या व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राच्या विकासात निश्चित महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चरचे योगदान महत्वाचे आहे आणि भविष्यातही महाराष्ट्र राज्य व देशाच्या विकासात महाराष्ट्र चेंबरची भूमिका महत्वाची असेल असे प्रतिपादन महामहिम राज्यपाल श्री. भगतसिंग कोशारी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्रनाशिक शाखेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या पदार्पनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी महाकवी कालिदास कलामंदिर येथे केले.

व्यापार, उद्योग व कृषी क्षेत्राचा विकास करतांना सामाजिक जबाबदारी म्हणून गरीब कुंटूंबाचीही व्यापारी उद्योजकांनी जबाबदारी घेऊन काही कुंटूंब दत्तक घेतल्यास निश्चितच त्याचे समाधानही व्यापारी, उद्योजकांना लाभेल. महिलांनाही प्रोत्साहन देणे आवश्यक असून महाराष्ट्र चेंबरने महिला उद्योजकांसाठी भरीव कार्य करावे असे सांगितले.

महामहिम राज्यपाल भगतसिंग कोशारी व नाशिकचे पालकमंत्री छगनरावजी भुजबळ, अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महामहिम राज्यपाल भगतसिंग कोशारी यांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, शाल देऊन सत्कार केला.

## जीएसटी, प्लास्टीक बंदी रद्द होण्यासाठी प्रयत्न करण्याची देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

दि. २० जुलै रोजी मुंबई येथे महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांची सागर निवासस्थानी भेट घेऊन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चर चे अध्यक्ष श्री ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेऊन अन्न धान्य व खाद्यपदार्थ वरील GST रद्द करून घेण्यासाठी केंद सरकारकडे प्रयत्न करण्याची मागणी केली. श्री. देवेंद्र फडणवीस यांचे समवेत या संबंधी सविस्तर चर्चा झाली. व्यापारी व ग्राहकांना येणार्या अडचणी त्यांनी समजून घेतल्या व यासंबंधी आवश्यक ते प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.

शिष्टमंडळात संदीप भंडारी, आशिष नहार, सागर नागरे



यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले होते.

## सरकारने व्यापार उद्योग क्षेत्राला दुहेरी करामधून दिलासा द्यावा - ललित गांधी, अध्यक्ष



**संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित व संगमनेर व्यापारी असोसिएशनतर्फे आयोजित व्यापारी मेळाव्यास मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांचा जाहीर सत्कार करताना महसुल मंत्री बाळासाहेब थोरात यावेळी व्यासपीठावर भाउसाहेब एरंडे, सुधाकर देशमुख, ओंकारनाथ भंडारी, शशिकांत मंगसुळे व अन्य मान्यवर.**

संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित व संगमनेर व्यापारी असोसिएशनतर्फे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चरचे नूतन अध्यक्ष ललित गांधी यांचा जाहीर सत्कार महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या हॉलमध्ये करण्यात आला.

संगमनेर येथील महाराष्ट्र चेंबरचे नूतन कार्यकारिणी सदस्य निलेश चव्हाण व प्रकाश कलंत्री यांचाही सत्कार करण्यात आला तसेच याप्रसंगी व्यापार उद्योगासमोरील आव्हान आणि नवीन संधी या विषयावर मार्गदर्शन संपन्न झाले. याप्रसंगी व्यासपीठावर महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री ललित गांधी, उपाध्यक्ष श्री सुधाकर देशमुख, संगमनेर व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष ओंकारनाथ भंडारी, संगमनेर औद्योगिक वसाहतीचे चेअरमन भाऊसाहेब एरंडे, प्रांताधिकारी शशिकांत मंगरूळे उपस्थित होते. व्यापार उद्योगासमोरील आव्हाने या विषयावर बोलताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी भविष्यात व्यापारी उद्योजकांनी एकसंघ होऊन काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले व्यापारी उद्योजकांसमोर अनेक मोठी आव्हाने आहेत. बदलत्या काळाप्रमाणे व्यापारी उद्योजकांनी बदलले पाहिजे.

## महाराष्ट्र चेंबरचा तंत्रज्ञानातील पुढाकार राज्यातील व्यापार, उद्योग वृध्दीसाठी उपयुक्त - मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे



**महाराष्ट्र चेंबरच्या सभासदांना देण्यात येणाऱ्या स्मार्ट डिजिटल कार्डचे अनावरण करताना मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, ललित गांधी व सागर नागरे**

**मुंबई** : सभासदांना द्यावयाचे ओळखपत्र डिजिटल स्मार्ट कार्ड स्वरुपात देऊन तंत्रज्ञान वापरात एक पाऊल पुढे टाकले आहे. तंत्रज्ञानाचा हा वापर राज्यातील व्यापार – उद्योग वृध्दीसाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी केले. महाराष्ट्र चेंबर तर्फे सभासदांना देण्यात येणाऱ्या ओळखपत्रा द्वारे सभासदांना आपापसात व्यापार करता येईल, वेगवेगळ्या सवलतींसाठी उपयोग होईल अशा पध्दतीचे आधुनिक क्यु आर कोड आधारीत बनवन्यात आले आहे. सदर स्मार्ट डिजिटल बिझनेस कार्ड चे अनावरण मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे यांचे हस्ते करण्यात आले.

# व्यापार उद्योगाला पूरक धोरण राबवणारे सरकार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## जीएसटी, प्लास्टिक बंदी व एपीएमसी कायदा हे व्यापार उद्योगाचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार




'महाराष्ट्र राज्यस्तरीय व्यापारी परिषदेचे' दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समवेत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे ,आमदार अब्दुल सत्तार, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, उपाध्यक्ष तनसुख झांबड, माजी उपाध्यक्ष सत्यनारायण लाहोटी, औरंगाबाद जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विजय जयस्वाल, प्रफुल्ल मालानी, घनश्याम गोयल आदि.

**छत्रपति संभाजीनगर** : राज्यातील व्यापार उद्योग व कृषी क्षेत्राला पूरक असे आमचे सरकार असून राज्यातील व्यापार उद्योगासाठी पोषक वातावरण तयार करणे आणि त्यांना चालना देण्याचे कार्य हे सरकार करेल तसेच जीएसटी, प्लास्टिक बंदी व एपीएमसी कायदा हे व्यापार उद्योगाचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची घोषणा महाराष्ट्र चेंबरने आयोजित केलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय व्यापारी परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले प्रास्ताविकात महाराष्ट्र चेंबर ची माहिती दिली तसेच जीएसटी तरतुदी संबंधित अडचणी बाजार समिती कायदा प्लास्टिक बंदी यामुळे व्यापार उद्योगात होत असलेल्या अडचणींची माहिती थोडक्यात दिली. अन्नधान्यावरील जीएसटी कर रद्द करावे एपीएमसी कायद्यात बदल करण्यात यावा रद्द करण्यात यावा व प्लास्टिक बंदी स्थगिती द्यावी जोपर्यंत प्लास्टिकला पर्याय उपलब्ध होत नाही तोपर्यंत प्लास्टिक बंदीचा मिळण्याला स्थगिती देण्याची मागणी अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. तसेच महाराष्ट्र चेंबरतर्फे अमेरिकेमध्ये आयोजित 'बिजनेस कॉन्फरन्सला' उपस्थित राहण्याचे आमंत्रण मुख्यमंत्र्यांना दिले.

# अन्नधान्यावरील जीएसटी रद्द करण्यासंदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** नॉन ब्रँडेड अन्नधान्य व खाद्यपदार्थावर नव्याने लावलेल्या पाच टक्के जीएसटी संबंधात केंद्र सरकारकडे हा कर रद्द करण्यासाठी पाठपुरावा करू असे ओशासन राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांनी ललित गांधी यांना दिले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अग्रिकल्चर या राज्याच्या व्यापार, उद्योग कृषी क्षेत्राच्या शिखर संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन नवीन लावण्यात आलेल्या जीएसटी मुळे

राज्यातील सामान्य जनतेबरोबर व्यापाऱ्यांच्या मध्ये असलेल्या तीव्र भावनांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली व हा कर रद्द होण्याची आवश्यकता असल्याचे आग्रही प्रतिपादन केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यापारी व जनतेच्या भावनांशी आम्ही सहमत असून हा कर रद्द करावा यासाठी राज्य सरकार केंद्र शासन स्तरावर पाठपुरावा करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांनी दिली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अन्नधान्यावरील जीएसटी संबंधी निवेदन देऊन चर्चा करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत आशिष नहार, संदीप भंडारी व अन्य मान्यवर.

# 'जीएसटी' कर सुधारणांध्ये 'महाराष्ट्र चेंबरने' दिलेल्या सूचनांचा विचार करू - अर्थत्री निर्मला सीतारामन





GST कर प्रणाली ५ वर्षे पूर्णाहुती निमित्त अर्थ मंत्री निर्मला सीतारमन यांना सन्मानित करताना ललित गांधी सोबत करुणाकर शेट्टी.

जीएसटी करप्रणाली कर दात्यांसाठी आणखी सुलभ करण्याचा प्रयत्न असून महाराष्ट्र चेंबरने दिलेल्या सूचनांचा विचार करू असे आश्वासन केंद्रिय अर्थत्री निर्मला सीतारामन यांनी ललित गांधी यांना आश्वासन दिले. १ जुलै रोजी जीएसटी कर प्रणालीला पाच वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त दिल्ली येथील विज्ञान भवनमध्येविशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय अर्थत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेऊन जीएसटी कर सुधारणासंबंधी विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय अर्थत्री निर्मला सीतारामन यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. याप्रसंगी चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी उपस्थित होते.

# अन्नधान्य खाद्यपदार्थ व गुळावरील जीएसटी संबंधी नवीन नियमात आवश्यक त्या दुरुस्त्या करू - केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी



केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांच्या समवेतच्या बैठकीत अन्नधान्यावरील जीएसटी संबंधी भूमिका मांडताना ललित गांधी, सोबत खासदार हेमंत गोडसे, संदीप भंडारी



केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांना निवेदन देताना ललित गांधी, सोबत खासदार हेमंत गोडसे, संदीप भंडारी, जे.के.जैन

**नवी दिल्ली :** जीएसटी कौन्सिलच्या शिफारसी वरून केंद्र सरकारने नव्याने लागू केलेल्या अन्नधान्य,खाद्यपदार्थ व गुळावरील जीएसटी आकारणी संबंधी या अधिसूचनेध्ये असलेली क्लिष्टता दूर करून सामान्य ग्राहक व छोटे व्यापारी यांना याचा बोजा होणार नाही अशा पद्धतीने आवश्यक त्या दुरुस्त्या केल्या जातील असे स्पष्ट आश्वासन केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी दिले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर' या राज्यातील व्यापार, उद्योग व कृषी उद्योग क्षेत्राच्या शिखर संस्थेचे अध्यक्ष ललित गांधी यांनी खासदार हेंत गोडसे व शिष्टमंडळासह अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांची भेट घेऊन नवीन केलेली कर आकारणी रद्द करण्याची मागणी केली त्याप्रसंगी ते बोलत होते.

# महाराष्ट्रातील लघु उद्योगांना शेअर मार्केटमधून भागभांडवल उभारून देणार - ललित गांधी

## जागतिक लघु उद्योग दिनी बीएसई आणि महाराष्ट्र चेंबरमध्ये सामंजस्य करार




**मुंबई :** लघु व मध्यम उद्योग क्षेत्राचा देशाच्या सकल उत्पादनात २२ टक्क्याहुन अधिक वाटा असुन हे क्षेत्र सक्षम करण्यासाठी लघु व मध्यम उद्योगांची बीएसई–एसएमई च्या माध्यमातुन शेअर बाजारातून भाग भांडवल उभारूण देणार असल्याची माहीती 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री'चे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) च्या एसएमई व स्टार्टअप विभागातर्फे जागतिक लघु उद्योग दिनानिमित्त बीएसई इंटरनॅशनल कन्वेन्शन हॉल, फोर्ट, मुंबई येथे आयोजित विशेष समारंभात भाषण करताना त्यांनी ही माहिती दिली.

बीएसई चे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी आशिषकुमार चौहाण, मुख्य वित्त अधिकारी नयन मेहता, बीएसई–एसएमई चे प्रमुख अजय ठाकुर, सहप्रमुख आनंद चारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या समारंभात लघु व मध्यम उद्योगांना भांडवल उभारणीसाठी बीएसई – एसएमई तर्फे उपलब्ध सुविधा व या संकल्पनेची व्याप्ती वाढविण्यासाठी महाराष्ट्रातील व्यापार–उद्योग व कृषि उद्योग क्षेत्राची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री व बीएसई मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्र चेंबरच्या वतीने अध्यक्ष ललित गांधी व बीएसई तर्फे एसएमई विभागाचे प्रमुख अजय ठाकुर यांनी सामंजस्य करारावर सह्या केल्या कार्यकारी संचालक आशिष चौहाण यांच्या उपस्थितीत सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.

# महाराष्ट्रातील रेल्वेच्या प्रश्नांसंबंधी संयुक्त बैठक आयोजित करू - केंद्रीय मंत्री दर्शना जरदोश



**केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री नाम. दर्शना जरदोश यांना रेल्वेसंबंधी मागण्यांचे निवेदन देताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, आम प्रकाश आवाडे, राहुल आवाडे, सतिश कोष्टी इ. मान्यवर**

कोल्हापूर : महाराष्ट्रातील रेल्वेसंबंधी विविध मागण्या व प्रलंबित प्रश्नांसंबंधी आगामी अधिवेशन काळात दिल्ली येथे संयुक्त बैठक आयोजित करू असे आश्वासन रेल्वे व वस्त्रोद्योग राज्यमंत्री नाम. दर्शना जरदोश यांनी ललित गांधी यांना दिले. रेल्वे व वस्त्रोद्योग राज्यमंत्री नाम. दर्शना जरदोश दोन दिवसाच्या कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर आल्या असता इचलकरंजी येथे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नाम. दर्शना जरदोश यांची भेट घेऊन रेल्वेच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून निवेदन सादर केले त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. ललित गांधी यांनी राज्यातील रेल्वेच्या विविध प्रश्नांची मांडणी करताना विविध मेट्रो प्रकल्पांचे क्रियान्वयन, माल वाहतुकीसंबंधी सेवा विस्तार, कोकण विभागातुन पार्सल सेवा सुरू करणे, कोल्हापूर–वैभववाडी मार्गाच्या कामाची प्रत्यक्ष सुरूवात यांसह कोल्हापूर–अहमदाबाद सेवा दररोज सुरू करणे व गाडीचा मार्ग आबु रोड पर्यंत विस्तारीत करणे. कोल्हापूर – मुंबई सुपरफास्ट रेल्वे सुरू करणे, पुण्याहुन गुजरातकडे जाणाऱ्या गाड्या कोल्हापूरहुन रवाना कराव्यात.

# अन्नधान्यावरील जीएसटी रद्द न केल्यास आंदोलनाची तीव्रता वाढविणार - ललित गांधी

## महाराष्ट्र चेंबरच्या बंदच्या आवाहनाला राज्यभरात उत्स्फूर्त प्रतिसाद




राज्यभरातील GST विरोधी आंदोलनामध्ये ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर येथील छत्रपती शिवाजी चौकात निदर्शने करण्यात आली. यावेळी संजय शेटे, जयेश ओसवाल, संजय पाटील, संदिप अथणे इ. मान्यवर

**कोल्हापूर** : अन्नधान्य, खाद्यान्न व जीवनावश्यक वस्तूवर ५ टक्के जीएसटी कर रद्द करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यात व्यापार बंदचे आवाहनास प्रतिसाद देत सर्व जिल्ह्यांध्ये अन्नधान्य व खाद्याने विक्रेत्यांनी कडकडीत बंद ठेवला. राज्यभरात बंद व देशात बंदला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला असून अन्नधान्यावरील जीएसटी रद्द न केल्यास आंदोलनाची तीव्रता वाढविणार असल्याचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी कोल्हापूरमध्ये झालेल्या निदर्शनामध्ये सहभाग घेतला. राज्यभर १४ जुलै ते १७ जुलै या काळामध्ये लोकप्रतिनिधी खासदार व आमदार यांना महाराष्ट्र चेंबरच्या वतीने निवेदन देण्यात येत आहे.

मुंबई, नाशिक, जळगाव, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, जालना, धुळे औरंगाबाद आदींसह सर्व जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जीएसटी कमिशनर यांना व्यापारी शिष्टमंडळांनी निवेदन देऊन अन्नधान्यावरील जीएसटी कर रद्द करण्याची मागणी केली आहे. लवकरात लवकर हा प्रश्न केंद्र सरकारने निकाली काढावा यासाठीचे प्रयत्न सुरू आहेत या मागणीला सरकारने लवकर दाद न दिल्यास अन्नधान्य व खाद्यपदार्थ व्यतिरिक्त अन्य व्यापारी सुद्धा आंदोलनात उतरतील व आंदोलनाची तीव्रता वाढवली जाईल असे महाराष्ट्र चेंबरचे

# भारतीय मानक ब्युरो च्या महाराष्ट्र राज्य समितिवर ललित गांधी यांची निवड



**मुंबई** : भारतीय मानक ब्युरो (ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्स) भारत सरकारच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत भारतीय उत्पादनांचा दर्जा निश्चित करणाऱ्या भारतीय मानक ब्युरो च्या महाराष्ट्र राज्य समितिवर व्यापार, उद्योग विभागाचे प्रतिनिधि म्हणुन ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर’ चे अध्यक्ष ललित गांधी यांची निवड झाली आहे.

राज्याचे मुख्य सचिव या समितिचे अध्यक्ष असुन गृह विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव, उद्योग विभागाचे प्रधान सचिव, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव, उद्योग संचालनायाचे विकास आयुक्त, तंत्र शिक्षण विभागाचे संचालक, वैधमापन शास्त्र विभाग नियंत्रण, विद्युत मंडळाचे अध्यक्ष हे समितीचे सदस्य असुन अन्न व नागरी पुरवठा विभागचे सचिव समितीचे सदस्य सचिव म्हणुन काम पाहणार आहेत.

# महाराष्ट्र - इंडोनेशिया मधील व्यापार संबंध अधिक दृढ व्हावेत - इंडोनेशियन राजदुत श्रीमती ईना कृष्णमूर्ति



समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबरतर्फे ललित गांधी यांनी राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांना विशेष स्मृतीचिन्ह देऊन सम्मानित केले. याप्रसंगी आशिष नहार, निर्भय कटारीया, सागर नागरे इ.

**मुंबई** : महाराष्ट्र व इंडोनेशियामधील व्यापार, संबंधी दृढ होण्यासाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' ने विशेष सहकार्य करावे असे प्रतिपादन इंडोनेशियाच्या भारतातील राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांनी केले.

राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांच्या भारतात नेणूकीनंतर त्यांच्या प्रथम मुंबई दौऱ्यानिमित्त हॉटेल ताज, कुलाबा मुंबई येथे विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. भारतातील प्रमुख उद्योजक, प्रमुख औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न या समारंभाप्रसंगी महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र-इंडोनेशिया व्यापारात महाराष्ट्रातुन निर्यात वाढीसाठीच्या संधीबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. इंडोनेशिया सरकारतर्फे राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांनी ललित गांधी यांचा विशेष सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. महाराष्ट्र चेंबरतर्फे ललित गांधी यांनी राजदूत श्रीमती ईना कृष्णमूर्ती यांना विशेष स्मृतीचिन्ह देऊन सम्मानित केले.

# व्यापाऱ्यांनी ई-कॉमर्स बाजारालाही प्राधान्य द्यावे ! ललित गांधी : विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सची वार्षिक सभा उत्साहात




**अकोला :** आजच्या तंत्रज्ञान युगात ऑनलाईन ई-व्यवसाय वाढला आहे. त्यामुळे उद्योजक व व्यापाऱ्यांनीही या धकाधकीच्या व्यवस्थेत ऑनलाईन ई कॉमर्स बाजाराला प्राधान्य द्यावे. असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजची ८८ वी वार्षिक आमसभा खंडेलवाल भवनात मोठ्या उत्साहात संपन्न झाली यावेळी ते बोलत होते. मावळते अध्यक्ष नितीन खंडेलवाल यांच्या अध्यक्षतेत संपन्न या सभेत प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी, जेष्ठ उद्योजक सांगली येथील रमाकांत मालु, महाराष्ट चेंबर ऑफ कॉमर्सच्या महिला शाखा संयोजिका संगीता पाटील, माजी अध्यक्ष राजकुमार बिलाला, वरिष्ठ उपाध्यक्ष निकेश गुप्ता,कनिष्ठ उपाध्यक्ष आशिष चंदाराना, मानद सचिव किशोर बाछुका, कोषाध्यक्ष निरव वोरा, सहसचिव राहुल गोयनका, निखिल अग्रवाल आदी उपस्थित होते.

# महिलांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर व रुमादेवी फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्यांच्या कर्तृत्वाने प्रभावित होऊन २०१८ चा राष्ट्रीय नारी शक्ती पुरस्कारासाठी निवड केली, त्या राजस्थानच्या श्रीमती रूमादेवी ज्यांनी अल्पशिक्षित व ग्रामीण भागातील असुनही भारतीय कलाकुसर जोपासताना ३० हजारहुन अधिक महिलांना रोजगार दिला, हार्वर्ड विद्यापिठाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन गौरव केला, अशा असामान्य कर्तृत्वान महिलेच्या ज्ञानाचा व कौशल्याचा फायदा महाराष्ट्रातील सर्वसामान्य महिलांना व्हावा यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर व श्रीमती रूमादेवी यांच्या दरम्यान महत्वपुर्ण सामंजस्य करार चेंबरच्या मुंबई येथील मुख्यालयात संपन्न झाला. महाराष्ट्रातल्या सर्वच महिलांना त्यांच्या उदार निर्वाह साठी नवीन साधन उपलब्ध होईल, त्यांच्याकडे असलेल्या कलाकुसरीला वाव मिळेल आणि त्यांना नवीन प्रकारच्या कलाकृती शिकण्याचे प्रशिक्षण मिळेल व या माध्यमातून त्या स्वावलंबी होऊ शकतील या उद्देशाने महाराष्ट्र चेंबर ने रुमादेवी फाउंडेशन सोबत हा महत्त्वपूर्ण करार केलेला आहे अशी माहिती चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

# व्यापाऱ्यांच्या हितासाठी सरकारबरोबर भांडावे लागणार - ललित गांधी

## कन्झ्युर प्रॉडक्टस फेडरेशनचे ११ वे राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात संपन्न

व्यापाऱ्यांसमोर अनेक आव्हाने आहेत. ऑनलाईनमुळे छोट्या व्यापाऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. त्यात आता अन्नधान्यांवर ५ टक्के जीएसटी कर आकारण्यात येणार आहे. अन्नधान्यांवर ५ टक्के जीएसटी कर रद्द करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने एक दिवसाचे व्यापार बंदचे आंदोलन केले. अन्नधान्यावर ५ टक्के जीएसटी कर लागू करण्याचे सर्कुलर काढले. सर्क्युलरबाबत तज्ञांचे मत मागविले असता प्रत्येक तज्ञाचे मत वेगवेगळे मिळाले असून संभ्राचे वातावरण आहे. यासाठी सरकारबरोबर भांडावे लागणार आहे. महाराष्ट्र चेंबरने केंद्र सरकारकडे ऑनलाईन व्यापारासाठी पॉलीसी तयार करण्याची मागणी केली असून तसे कामही सुरु झाले आहे. ऑनलाईनच्या स्पर्धेत टिकण्यासाठी व व्यापाऱ्यांना व्यापार वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे ॲप उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. महाराष्ट्र चेंबरच्या २५ विविध समित्या असून ट्रेड असोसिएशन समितीच्या चेअरमनपदी धैर्यशील पाटील यांची नियुक्ती केल्याचे जाहीर केले तसेच महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष हेंत राठी यांच्या हस्ते धैर्यशील पाटील यांच्या सत्कार करण्यात आला.



**महाराष्ट्र कंझ्युर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स फेडरेशनचे ११ वे अधिवेशनाप्रसंगी दीपप्रज्वलन करून उद्घाटन करतांना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी समवेत महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष हेंत राठी, प्रफुल जैन, उद्योजक कुमार बेंबू, धैर्यशील पाटील, जीएसटीचे सहाय्यक आयुक्त हरिश्चंद्र गांगुर्डे, अतुल पटेल, संदीप लोया, आयबीएम पुणे मार्केटिंग फॅकल्टी ॲड इंटरफेस प्रमुख अभय पाठक.**

# राज्याच्या व्यापार, उद्योगासह आर्थिक प्रगतीसाठी विधिमंडळाचा प्रभावी उपयोग - ॲड. राहुल नार्वेकर, विधानसभा अध्यक्ष





**महाराष्ट्र राज्याचे नुतन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना महाराष्ट्र चेंबर च्या कार्याची माहीती देऊन चर्चा करताना अध्यक्ष ललित गांधी, संदिप भंडारी आदि.**

महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योगासह एकुणच आर्थिक प्रगतीसाठी विधिमंडळाचा प्रभावी वापर करू यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज या राज्यातील शंभर वर्षाची परंपरा असणाऱ्या शिखर संस्थेला सहभागी करून घेऊ असे प्रतिपादन विधानसभेचे नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला त्याप्रसंगी ते बोलत होते.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी चेंबरच्या कार्याची माहीती नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिली. यावेळी चेंबरचे जीसी मेंबर संदीप भंडारी, विकास अच्छा, नीरव देढीया इ. उपस्थित होते.

# भविष्यात जैव अर्थशास्त्राकडे वळावे - अशोक दलवाई

## जीतो - महाराष्ट्र चेंबर तर्फे राष्ट्रीय व्यापार परिषद संपन्न








**पुणे :** ''औद्योगिक परिवर्तनात आपण मोठ्या प्रमाणात पेट्रोलिय पदार्थ, खनिज वस्तूचा वापर केला आहे. त्यामुळे आता खनिज पदार्थ वापर बंद करून अपारंपरिक ऊर्जे चा वापर केला पाहिजे. जैव इंधनाचा वापर औद्योगिक क्षेत्रात परदेशात मोठ्या प्रमाणात सुरू झाला आहे. भविष्यात जीवाश्म इंधन आधारित अर्थशास्त्राकडून जैव अर्थशास्त्राकडे वळावे लागेल,'' असे मत राष्ट्रीय पर्जन्य क्षेत्र प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक दलवाई (आयएएस) यांनी व्यक्त केले. जीतो कनेक्ट'मध्ये ते 'बिझिनेक्सट– ट्रेडीशन टू इनोव्हेशन' या विषयवार बोलत होते. 'घोडावत ग्रप' चे प्रमुख संजय घोडावत, जीतो –ॲपेक्स'चे उपाध्यक्ष विजय भंडारी, 'महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रिकल्चर'चे ललित गांधी, 'पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष फत्तेचंद रांका, 'पूना मर्चंट्स चेंबर' चे अध्यक्ष राजेंद्र बाठीया, सचिव महेंद्र पितळीया, अजित सेठिया, प्रवीण चोरबोले, रतन किराड, करुणाकर शेट्टी, अजय बोरा, किशोर ओसवाल, मनोज सारडा आदी या वेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र-अमेरीका दरम्यान व्यापाराच्या व गुंतवणुकीच्या विविधसंधी खुल्या होतील - कॉन्सुलेट जनरल रणधीर जायस्वाल

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे अमेरीकेत व्यापार परिषद संपन्न



**अटलांटीक सिटी, न्यु जर्सी येथे आयोजित बिझनेस समीट च्या उद्घाटन मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर व बृन्महाराष्ट्र मंडळ, युएसए तर्फे अटलांटीक सिटी, न्यु जर्सी येथे आयोजित बिझनेस समीट च्या उद्घाटन प्रसंगी न्युयॉर्क चे कॉन्सुलेट जनरल रणधीर जायस्वाल, पर्सिस्टंट चे आनंद देशपांडे, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उमेश दाशरथी, श्रीमती रूमादेवी, आनंद चौथाई इ.**

**मुंबई** : भारत हा वेगाने विकसित होत असलेला देश असुन भारताची अर्थव्यवस्था मजबुत असल्याने जगभरातील देश भारतात येऊ इच्छितात. 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'ने अमेरीकेत व्यापार परिषदेचे आयोजन करून महाराष्ट्राला ज्या पध्दतीने सादर केले आहे ते पाहता महाराष्ट्र व अमेरीके दरम्यान गुंतवणुकीच्या नवीन संधी खुल्या होतील असा विश्वास भारताचे न्युयॉर्क मधील कॉन्सुलेट जनरल रणधीर जायस्वाल यांनी व्यक्त केला.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' व बृहन्महाराष्ट्र मंडळ अमेरीका यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरीकेतील अटलांटीक सिटी, न्यु जर्सी येथे बिझनेस समीट चे आयोजन करण्यात आले होते, सदर समीट च्या उद्घाटनप्रसंगी जायस्वाल बोलत होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या परिषदेत बृहन्महाराष्ट्र मंडळ च्या



**'ग्लोबल महाराष्ट्र फोरम' च्या बोधचिन्हाचे अनावरण करताना कॉन्सुलेट जनरल रणधीर जायस्वाल, चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी**

अध्यक्ष विद्या जोशी, बिझनेस समीट चे निमंत्रक आनंद चौथाई, नारीशक्ती पुरस्कार विजेत्या श्रीमती रूमादेवी, पर्सिस्टंट कंपनीचे प्रमुख आनंद देशपांडे, विकास बावधनकर, नरेन गोडसे, नवीन पाठक, चेंबरचे वरीष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी व्यासपीठावर उपस्थित होते.



# भारत-अमेरीका दरम्यान व्यापार वृध्दिसाठी 'इंडिया-युएसए डेव्हलपमेंट फोरम' महत्वपूर्ण - राजदूत तरणजित सिंह संधु



**अमेरीकेतील भारतीय दुतावास इंडिया हाऊस वॉशिंग्टन डीसी येथे संपन्न स्वातंत्र्यदिन समारोहात विशेष आमंत्रित म्हणुन उपस्थित चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, श्रीमती रूमा देवी यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न समारोहात ध्वजवंदन करताना राजदुत मान. श्री. तरणजित सिंह संधु व मान्यवर.**

**मुंबई** : भारत-अमेरीका दरम्यान द्विपक्षीय व्यापार वृध्दिसाठी 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' चा 'इंडिया-युएसए डेव्हलपमेंट फोरम' महत्वपूर्ण भुमिका बजावेल असे प्रतिपादन अमेरीकेतील भारताचे राजदूत तरणजित सिंह संधु यांनी केले.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर' तर्फे भारत-अमेरीका व्यापार वृध्दिसाठी 'इंडिया-युएसए डेव्हलपमेंट फोरम' स्थापन करण्यात आली असुन या फोरम च्या बोधचिन्हाचे वॉशिंग्टन डीसी येथील इंडिया हाऊस येथे अनावरण करून या फोरम चा औपचारीक शुभारंभ करण्यात आला त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी ललित गांधी, उमेश दाशरथी, भाऊसाहेब, कालवाघे, मयंक गुप्ता, नितिन इंगळे उपस्थित होते.

अमेरीकेतील भारतीय दुतावासातर्फे स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित समारंभास ललित गांधी व महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळात विशेष अतिथि म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. ललित गांधी यांनी महाराष्ट्रात



गुंतवणुकीच्या विविध संधी उपलब्ध आहेत त्याचा अमेरीकेतील गुंतवणुकदार व उद्योजकांनी लाभ घ्यावा असे सांगुन अमेरीकेच्या राजधानीत भारतीय दुतावासात संपन्न होत असलेल्या भव्य स्वातंत्र्य दिन समारंभात सहभागाची संधी मिळणे हा विशेष गौरवपुर्ण सन्मान असल्याचे नमुद केले.

# न्यु जर्सी (अमेरीका) व महाराष्ट्र राज्य विकासात सहयोगी राज्ये म्हणुन कार्य करु - वेस्ली मॅथ्यु






**'चुज न्यु जर्सी' समवेत च्या बैठकीत चर्चा करताना ललित गांधी, वेस्ली मॅथ्यु, विकास बावधनकर, नवीन पाठक, नरेन गोडसे, बील नुनन इ. दुसऱ्या छायाचित्रात मायटेक्स च्या माहीतीपत्रकाचे अमेरीकेसाठी सादरीकरण करताना वेस्ली मॅथ्यु, चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, विकास बावधनकर, नवीन पाठक, नरेन गोडसे, बील नुनन इ.**

अमेरीकेतील न्यु जर्सी राज्य व महाराष्ट्र राज्य विकासासाठी सहयोगी राज्ये म्हणुन कार्य करु व महाराष्ट्रात नवीन गुंतवणूकीसाठी पुढाकार घेऊ अशी ग्वाही 'न्यु जर्सी' या न्यु जर्सी सरकारच्या विकास परिषदेचा अध्यक्ष वेस्ली मॅथ्यु यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री च्या शिष्टमंडलाला दिली.

'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर' चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृव्याखाली शिष्टमडळाने व्यापार – उदयोगातील नवीन सहकार्याचा संधीतही अमेरीका दौऱ्यावर आले असताना 'न्यु जर्सी' च्या आमंत्रनावरुन त्यांच्या मुख्यालयात बैठकीसाठी उपस्थित असताना वेस्ली मॅथ्यु बोलत होते. अमेरीकेत राहणाऱ्या महाराष्ट्रीयन बांधवांनी सर्वाधिक संस्था न्यु जर्सी राज्यात असुन महाराष्ट्रातील ५७ मोठया कंपन्यांनी न्यु जर्सी राज्यात विविध प्रकल्प उभारुन मोठी गुंतवणुक केली आहे. याच पध्दतीने आता अमेरीकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणून करावी अशी अपेक्षा ललित गांधी यांनी व्यक्त केली.

ललित गांधी यांनी यावेळी महाराष्ट्राच्या वैशिष्टयासंह गुंतवणूकीसाठी योग्य अशा क्षेत्रांच्या माहितीचा एक अहवाल वेस्ली मॅथ्यु यांना सादर केला. तसेच २ ते ११ डिसेंबर २०२२ या काळात मुंबई येथे होणाऱ्या अंत्तराष्ट्रीय ट्रेड एक्स्पो मध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण दिले. वेस्ली मॅथ्यु यांनी हे आमत्रण स्विकारुन गुंतवणुकदारांचा व्यापक शिष्टमंडळासह डिसेंबर मध्ये महाराष्ट्राच्या भेटीवर येण्याचे मान्य केले तसेच न्यु जर्सी राज्यातर्फे मुंबई येथे कायम स्वरुपी गुंतवणूक सहाय्य कार्यालय सुरू करण्यासाठी 'महाराष्ट्र चेंबरने' दिलेल्या प्रस्तावावर लवकरच सकारात्मक कार्यवाही करु अशी ग्वाही दिली.

# महाराष्ट्रातील उत्पादनांना अमेरीकेची बाजारपेठ मिळवण्यासाठी न्युयॉर्क वाणिज्य दुतावास विशेष आयोजन करणार - जायस्वाल






**न्युयॉर्क येथील कॉन्सुलेट जनरल कार्यालयाच्या सभागृहात मुंबई येथील आंतरराष्ट्रीय ट्रेड एक्स्पो चे आमंत्रण रणधीर जायस्वाल यांना देताना ललित गांधी, सोबत श्रीमती रुमादेवी, 'राणा' युएसए चे अध्यक्ष प्रेम भंडारी दुसऱ्या छायाचित्रात न्युयॉर्क येथील कॉन्सुलेट जनरल कार्यालयात कॉन्सुल रणधीर जायस्वाल यांच्या समवेतच्या बैठकीत चर्चा करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी.**

# व्यापार उद्योगाच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी - ना. नारायण राणे



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना केंद्रीय एमएसएमई मंत्री नारायणजी राणे.**

महाराष्ट्र राज्य भारतात प्रगत राज्य म्हणून नावारूपाला आलेले आहे. वैद्यकीय उत्पादन क्षेत्रात, जीडीपीमध्ये पुढे आहे. आत्मनिर्भर भारत बनवणे व महासत्तेकडे वाटचाल करताना सूक्ष्म लघु व मध्यम विभागाकडे आशावादी दृष्टिकोनातून बघितले जात आहे. उत्पन्न कसे वाढेल यावर लक्ष देणे गरजेचे आहे. आधुनिकरणामुळे उत्पादन वाढते, उत्पादन वाढले की नफा वाढत जातो. आधुनिकीकरण ही काळाची गरज असून

स्वावलंबी होण्यासाठी अत्यावश्यक आहे. निर्यात वाढवा, आयात कमी करा असे केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे म्हणाले. तसेच महाराष्ट्र चेंबरने राज्यामध्ये उद्योग उभारणीसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करावे, सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना मदत करावी, बंद व आजारी उद्योग व्यवस्थित सुरू होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व शासनाची



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठार केंद्रीय एमएसएमई मंत्री नारायणजी राणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन व उपस्थित मान्यवर**

मदत मिळवून देण्यास सहकार्य करावे. सूक्ष्म लघु व मध्यम विभागाकडून महाराष्ट्र चेंबरला आवश्यक ती सर्व मदत देण्यात येईल असे ओशासन ना. नारायण राणे यांनी दिले.

राज्यातील व्यापार उद्योग कृषी क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र चेंबर प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र चेंबरच्या कार्याचे कौतूक ना. नारायण राणे यांनी याप्रसंगी केले. राज्यस्तरीय उद्योग परिषदेमध्ये मुख्य पाहुणे भारत सरकारचे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग मंत्री नाम.नारायण राणे यांनी भारताच्या सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग क्षेत्राची प्रगती भारतीय अर्थव्यवस्थेचे इंजिन या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

# राज्यातील उद्योग क्षेत्राला गतवैभव पुन्हा प्राप्त करून देणार - ना उदय सामंत

महाराष्ट्र सरकारचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील उद्योगांना गतवैभव पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र चेंबर प्रत्येक जिल्ह्यात जाऊन उद्योजक वाढविण्याचे जे काम करते ते कौतुकास्पद आहे. व्यापार उद्योगाच्या विकासासाठी जे जे आवश्यक असेल ते सर्व सहकार्य व उद्योजकांच्या मागण्या पूर्ण करण्यात येतील. राज्यातील व्यापारी उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र चेंबरच्या पदाधिकाऱ्यांबरोबर संयुक्त बैठक आयोजित करण्याचे ओशासन उद्योग मंत्री सामंत यांनी दिले. महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात भविष्यात गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी नवीन उद्योजकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी माहिती उद्योग मंत्री सामंत यांनी दिली.



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या ९४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना उद्योग मंत्री उदय सामंत व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.**

## महाराष्ट्र चेंबरने राज्यामध्ये तरुण व महिलांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू करावे - मंगलप्रभातजी लोढा



**कौशल्य विकास परिषदेस संबोधन करताना माननीय ना. मंगलप्रभात लोढा.**

मुंबई : कुशल मनुष्यबळ ही काळाची गरज झाली आहे आणि ज्याच्या जवळ कुशल मनुष्यबळ आहे त्यांनी त्यांना सांभाळून ठेवणे गरजेचे आहे. एम्पॉवरमेंट ब्युरो विभागाची तुम्ही मदत घेऊ शकता त्यांच्या साह्याने राज्यांध्ये तुम्ही छोटे कौशल्य विकास सेंटर सुरू करावे, इंक्युबॅशन सेंटर सुरू करावे तरुणांना प्रशिक्षित करून उद्योग व्यापार करण्यासाठी मदत करावी या उद्देशाने काम करावे. महाराष्ट्र शासनाचा कौशल्य विकास विभाग तुम्हाला पूर्ण सहकार्य करेल तुच्या पाठीशी असेल. तसेच महिला बालविकास विभागाचे काम माझ्याकडे असून एक लाख दहा हजार अंगणवाड्या आहेत. या अंगणवाड्यांना आपण मदत करणे आवश्यक आहे. महिला बाल सुधार गृहातील महिला व तरुणी आहेत त्यांच्यासाठी कौशल्य सेंटर सुरू करावे त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्यास सहकार्य करावे असे आवाहन पर्यटन व कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभातजी लोढा यांनी केले. तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे राज्यात व्यापार उद्योगाच्या वाढीसाठी सुरू असलेले उपक्रम विशेषता तरुणांसाठी व महिलांसाठी कौशल्य विकास व महिला उद्योजकता समितीतर्फे सुरू असलेल्या उपक्रमांचे कौतुक केले व राज्यात कौशल्य विकास उपक्रम राबवण्यासाठी महाराष्ट्र चेंबरला सहकार्याचे आश्वासन अध्यक्ष ललित गांधी यांना दिले.

## राज्यात उद्योग वृध्दी यात्रा

### एमएसएमई - भारत सरकार, उद्योग विभाग - महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र चेंबरच्या युवा समिती, एमएसएमइ समितीचा उपक्रम



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या उद्योग वृध्दि यात्रा अभियानाच्या लोगोचे अनावरण करताना MSME केंद्रीय मंत्री माननीय नारायणजी राणे, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, डॉ. पी. अनबलगन, विजय कलंत्री, उमेश दाशरथी, करुणाकर शेट्टी, रविंद्र माणगावे, तनसुख झांबड, सदिप भंडारी, आशिष नहार**

सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार, उद्योग मंत्रालय, महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर यांच्या संयुक्त विद्यमाने, माननीय केंद्रिय मंत्री नारायण राणे, राज्याचे उद्योग मंत्री उदयजी सामंत यांच्या मार्गदर्शनात व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वात राज्यभरातील ३६ जिल्ह्यात महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांच्या जयंती दिनापासून दि. २३ नोव्हेंबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३ दरम्यान उद्योग वृध्दी यात्रेचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा युथ विंगचे चेअरमन व उद्योग वृध्दीचे यात्रेचे मुख्य संयोजक संदिप भंडारी यांनी केली.

वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई येथे महाराष्ट्र चेंबरच्या ९४ व्या वार्षिक सभेत उद्योग वृध्दी यात्रेच्या बोध चिन्हाचे अनावरण माननीय नारायणजी राणे, उद्योगमंत्री उदयजी सामंत व महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. युथ विंगचे चेअरमन संदिप भंडारी यांनी महाराष्ट्र चेंबरचे संस्थापक अध्यक्ष शेठ वालचंद यांच्या जयंती दिनापासून दि. २३ नोव्हेंबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३ प्रजासत्ताक दिनापर्यंत राज्यात उद्योग वृध्दी यात्रेचे आयोजन करण्यात येत असल्याची घोषणा केली.

# महाराष्ट्र व गोवा राज्य उद्योग वाढीसाठी संयुक्त उपक्रम राबवणार : ना. प्रमोद सावंत

## इन्व्हेस्ट गोवा परिषदेत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर सामंजस्य करार




**महाराष्ट्र व गोवा यांच्यातील सामंजस्य कराराचे गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उद्योग मंत्री मावीन गोदीना यांच्या उप-स्थितीत हस्तांतरण करताना ललित गांधी, राल्फ डिसूजा. दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्रातील गुंतवणूक संधीचा अहवाल मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना सादर करताना ललित गांधी सोबत माजी मंत्री सुरेश प्रभू.**

उद्योगात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राच्या व्यापार उद्योग क्षेत्राची शिखर संस्था महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रिकल्चर व गोवा सरकार आणि गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज उद्योग वाढीसाठी संयुक्त उपक्रम राबवतील अशी अपेक्षा गोव्याचे मुख्यमंत्री नामदार प्रमोद सावंत यांनी व्यक्त केली. इन्व्हेस्ट गोवा या गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज च्या वतीने अध्यक्ष ललित गांधी, गोवा चेंबर कॉमर्स इंडस्ट्रीज च्या वतीने अध्यक्ष राल्फ डिसूजा यांनी सामंजस्य करारावर सह्या केल्या व सामंजस्य करारांचे आदान प्रदान केले, त्याप्रसंगी ते बोलत होते. माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, गोव्याचे उद्योग मंत्री मावीन गोदीना, गोव्याचे पर्यटन व आयटी उद्योग मंत्री रोहन खुंटे, इन्व्हेस्ट गोवा परिषदेचे निमंत्रक मांगिरिश रायकर आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा आदी विविध राज्यातून मोठ्या संख्येने उद्योजक व गुंतवणूकदार या परिषदेस उपस्थित होते. महाराष्ट्र चेंबर या शतक महोत्सवी शिखर संस्थेतर्फे चेंबरच्या कार्यक्षेत्रातील गोवा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज तर्फे बरोबर सामंजस्य करार करून दोन्ही राज्यातील उद्योग वाढीसाठी विविध स्तरावर प्रयत्न करणार असल्याची माहिती ललित गांधी दिली



## ललित गांधी यांनी फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ पिंपरी चिंचवड ला भेट

**महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ पिंपरी चिंचवड ला भेट दिली. याप्रसंगी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचा पुष्पगुच्छ देवुन सत्कार करताना असोसिएशन चे अध्यक्ष गोविंद पानसरे. सोबत संदिप भंडारी.**

# महाराष्ट्रातील उद्योग प्रकल्पांचे प्रलंबित अनुदान त्वरित अदा करावे : ललित गांधी



**उद्योगांच्या प्रलंबित अनुदान व अन्य मागण्यासंबंधी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या समवेत च्या बैठकीत चर्चा करताना ललित गांधी, संदीप भंडारी, सागर नागरे व अन्य.**

मुंबई : महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील उद्योगांचे गेल्या दोन वर्षांपासूनचे प्रलंबित अनुदान राज्य सरकारने तत्काळ वितरित करावे अशी आग्रही मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स शिष्टमंडळाने उद्योगधंद्याच्या प्रलंबित अनुदान संबंधी मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेतली.

ललित गांधी यांनी यावेळी राज्यातील उद्योग प्रकल्पांचे प्रलंबित अनुदान सुरे ७००० कोटी इतके आहे. त्यापैकी सरकारने ३००० कोटी रुपये अनुदान मंजूर केले असून ६३० कोटी रुपये प्रत्यक्ष वितरित केले असल्याचे सांगून मंजूर रकमेपैकी उर्वरित २३७० कोटी रुपये एकरकमी अदा करावेत अशी मागणीही ललित गांधी यांनी केली.

उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सरकारने याविषयी अनुदान लवकर वितरित व्हावी अशी भूमिका घेतली असून तात्काळ हे अनुदान वितरित करण्याचा आमचा प्रयत्न राहील. मंजूर रक्कम एक अथवा दोन टप्प्यात ताबडतोब वितरित करण्याचे आदेश निर्गमित केले जातील असे सांगितले.

# महाराष्ट्र राज्य गुंतवणूकीसाठी 'फेव्हरेट डेस्टिनेशन' - मुख्यमंत्री नाम. एकनाथ शिंदे यांचे गौरवोद्गार

**'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो'चे मुख्यमंत्री नाम. एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांच्या हस्ते भव्य उद्घाटन संपन्न**




**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने बीकेसी, मुंबई येथे 'महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो (मायटेक्स)' चे दिपप्रज्वलन करुन उद्घाटन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. शेजारी उपस्थित महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उद्योगमंत्री उदय सामंत, तनसुख झांबड.**

**मुंबई** : केंद्र आणि राज्य सरकार समन्वयाने काम करीत आहे. राज्य सरकार उद्योग वाढीसाठी योग्य आणि सकारात्मक निर्णय घेत आहे. उद्योजकांना विश्वास मिळाल्याने महाराष्ट्र राज्यात गुंतवणूक वाढायला सुरुवात झाली आहे. दावोसमध्ये झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत १ लाख ३७ हजार कोटींची गुंतवणूक झाली. देशात गुंतवणूक करण्यासाठी महाराष्ट्र हे 'फेव्हरेट डेस्टिनेशन' झाले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. राज्यातील व्यापाराला चालना देण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँण्ड अॅग्रीकल्चर, महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने १७ फेब्रुवारीपासून ब्रांदा कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई येथे महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्स्पो (मायटेक्स) झाला. त्याचा भव्य शानदार शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते.

# तीस दिवसात उद्योगांना परवानगी देणार : नाम. उदय सामंत

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित विदर्भ विकास परिषदेत घोषणा




विदर्भ विकास परिषदेस मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री नाम. उदय सामंत व्यासपीठावर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, चेंबरच्या महिला समितीच्या अध्यक्षा संगीता पाटील, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी व मान्यवर

**नागपूर** : विदर्भ यापुढे मागासलेला जिल्हा राहणार नाही. विदर्भासाठी जे–जे काही देता येईल, ते सर्व आमच्या सरकारकडून दिले जाईल. राज्य सरकार उद्योजकांच्या पाठीशी उभे आहे. तीस दिवसात नवीन उद्योगांना परवानगी देणार, अशी ठोस ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांना विदर्भ विकास परिषदेत दिली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँण्ड अँग्रीकल्चर व महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २१ डिसेंबर रोजी विदर्भ विकास परिषद नागपूर येथील वसंतराव देशपांडे सभागृह, आमदार निवास समोर, सिव्हील लाईन्स येथे झाली. विदर्भातील ११ जिल्ह्यातून हजारांहून अधिक व्यापारी, उद्योजक या परिषदेत सहभागी झाले. राज्य सरकारचा उद्योग विभाग, एमएसएमई, एमआयडीसी आणि महाराष्ट्र सरकारचा औद्योगिक संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद झाली.

# ई-कॉमर्सचे आव्हान थोपविण्यासाठी व्यापारी बंधूनो हायटेक टेक्नॉलॉजी वापरा : महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचे आवाहन




**हिंगोली** : देशभरात कोरोनाचे संकट कोसळल्याने अनेक व्यवसायावर संक्रात आली. या परिस्थितीचा फायदा घेत बाजारपेठेत ऑनलाईन खरेदीचा टक्का वाढला. त्यातच ई–कॉमर्सच्या आगमनामुळे देशातील तीस टक्के रिटेलर कायमचे बंद पडले आहेत. भविष्यात हीच स्थिती कायम राहिल्यास सुरे ५० टक्के व्यवसाय बंद पडतील, अशी भीती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केली. ई–कॉमर्सचे वाढते आव्हान थोपविण्यासाठी व्यापारी बांधवांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची गरज आहे, असे आवाहनही त्यांनी केले.

हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघातर्फे भव्य मराठवाडा व्यापारी महापरिषद शहरातील महावीर भवन येथे ८ जानेवारी रोजी झाली. त्यावेळी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मार्गदर्शन केले. हिंगोली येथे झालेल्या पहिल्याच मराठवाडा व्यापारी महापरिषदेसाठी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे माजी अध्यक्ष मानसिंग पवार यांनी त्यांच्या ओघवत्या शैलीत व्यापाऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच महाराष्ट्र चेंबरने मराठवाडा विभागाचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष पुढाकार घ्यावा.



रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० ची वार्षिक परिषद, शेगांव येथे संपन्न झाली. सदर परिषदेचे उद्घाटक व मुख्य मार्गदर्शक म्हणुन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी मार्गदर्शन करताना समोर उपस्थित रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे सदस्य.

## नॉन वोव्हन बॅग्स व पेपर उत्पादनांना बंदी आदेशातून वगळण्याचा महत्वपूर्ण निर्णय

### महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या मागणी व पाठपुराव्याला मोठे यश : ललित गांधी



नॉन वोव्हन बॅग्स व पेपर उत्पादनांना बंदी आदेशातून वगळण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतल्या प्रकरणी चेंबर च्या शिष्टमंडळाने मुंबईत उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन चेंबरचे अध्यक्ष अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सत्कार केला. यावेळी उपस्थितात डावीकडून विपुल मेहता, सूर्यकांत रोकडे, पी. सी. जैन, मधुसुदन बियाणी, सागर नागरे

**नवी दिल्ली :** कागदापासून आणि एकदाच वापर होणाऱ्या केवळ विघटनशील वस्तूंवरील बंदी उठविली आहे. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाने राज्यातील सुमारे सहा लाखांवर युवक, महिला बेरोजगार होण्यापासून दिलासा मिळाला आहे. या संदर्भात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने सरकारकडे सातत्याने केलेली मागणी आणि पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे, ही माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉ र्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

नॉन वोव्हन बॅग्स व पेपर उत्पादनांना बंदी आदेशातून वगळण्याचा महत्वपूर्ण निर्णय सरकारने घेऊन यासंबधीची अधिसूचना काढण्यात आली. यामध्ये पिशव्या, ताटे, स्ट्रॉं, वाटय़ा, ग्लास, काटे, चमचे आदींच्या वापरावरील निर्बंध राज्यात शिथिल केल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स सोबत झालेल्या चर्चेनंतर राज्य सरकारने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

# शेठ वालचंद हिराचंद यांच्या जयंतीनिमित्त... स्फूर्तीदायक अविस्मरणीय भेट





**वालचंद इंडस्ट्रीज चे कार्यकारी संचालक चिराग दोशी यांना महाराष्ट्र चेंबर पत्रिका देताना अध्यक्ष ललित गांधी सोबत स्वप्निल शहा, संतोष दोशी दुसऱ्या छायाचित्रात शेठ वालचंद हिराचंद यांच्या प्रचंड मोठ्या उद्योग समूहाचे त्याकाळी मुख्यालय असलेले कन्स्ट्रक्शन हाऊस येथील त्यांच्या पुतळ्यास १४० व्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करताना महाराष्ट्र चेंबर अध्यक्ष ललित गांधी, संदीप भंडारी,विकास अच्छा, दीपक मेहता, सागर नागरे.**

देशाच्या संरक्षण विभागाची सर्वात महत्त्वाची सर्वाधिक उत्पादने बनविणारा कारखाना वालचंदनगर इंडस्ट्रीज महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांनी १९०८ साली उभारलेल्या वालचंद इंडस्ट्रीज या सध्याच्या वालचंदनगर मधील मुख्य कारखाना कार्यस्थळास १७ नोव्हेंबर रोजी भेट दिली. शंभरहून अधिक वर्षांपूर्वी शेठ वालचंद हिराचंद यांच्या दूरदृष्टीने त्यांनी उभारलेला हा कारखाना परिसर स्तिमित, अचंबित करणारा असा आहे. कारखाना व त्याचा परिसर म्हणजे एक गावच त्या ठिकाणी बसवले गेले.

शेठ वालचंद हिराचंद यांच्या परिवारातील तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी व चेंबरचे माजी अध्यक्ष श्री. लालचंद हिराचंद यांचे नातू व सध्याचे या कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री चिराग दोशी यांनी आमचे अत्यंत उत्साहात व आदरपूर्वक स्वागत केले. त्यांच्याशी विविध विषयावर मनमोकळ्या गप्पा मारता आल्या. या भेटीप्रसंगी त्यांनी शेठ वालचंद हिराचंद यांच्या जीवन चरित्राच्या मराठी व इंग्रजीतील दोन प्रती मला भेट दिल्या. माझ्यासाठी ही भेट अमूल्य अशीच आहे. श्री चिराग दोशी म्हणाले की कारखाना कार्यस्थळावर महाराष्ट्र चेंबर कडून मला भेटायला आलेले आपण पाहिलेच अध्यक्ष आहात. आपल्या भेटीचा आनंद आहे व हे संबंध वृद्धिंगत व्हावेत अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने रेल्वेविषयक केलेल्या मागण्या प्राधान्याने पुर्ण करू - रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव



**दिल्ली :** राज्याच्या उद्योग, व्यापाराला चालना देण्यासाठी भारतात आणि महाराष्ट्र राज्यात रेल्वेचे जाळे अधिक विस्तारित करावेत. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात रेल्वे–सेवा वाढवून नवे रेल्वेर्ग जोडावेत. राज्यातील रेल्वे सेवांच्या प्रश्नी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅग्रीकल्चर सोबत केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने संबधितांना बैठक घेण्याची सूचना करावी, अशी मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय रेल्वेंत्री, संवाद, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली. त्यांनी नवी दिल्ली, रेल्वेभवन येथे त्यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. त्यावेळी त्यांनी महाराष्ट्र चेंबरसोबत लवकरच बैठकीचे नियोजन केले जाईल, अशी ग्वाही दिली.

आर्थिक विकासाच्या वाटेवर महाराष्ट्र राज्यासमोर अनेक आव्हाने आहेत. रेल्वेच्या विकासासाठी सहकार्य करणाऱ्या घटकांसोबत चर्चा आणि बैठक घेतल्यानंतर या आव्हानांवर मात करता येऊ शकते, असे चेंबरचे मत आहे. आपल्या नेतृत्वाखाली देशातील भारतीय रेल्वे विकासाने जलद गतीने वाढ केली आहे. महाराष्ट्र चेंबरने राज्यातील उद्योगाच्या सर्वांगीण वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि मेक इन महाराष्ट्र च्या संयोगाने आत्मनिर्भर भारत योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी, महाराष्ट्रातील उद्योग आणि व्यवसायाची वाढ वाढवण्यासाठी राज्यव्यापी अभ्यासदौरा हाती घेतला आहे. त्यानुसार चेंबरने काही शिफारशी मांडल्या आहेत. त्यांचा विचार करण्याची मागणी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय मंत्री वैष्णव यांच्याकडे केली.

# तरुणांना रोजगारासाठी उद्योग जगताचा सहभाग महत्त्वपूर्ण : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## महाराष्ट्र चेंबरचा उद्योजकता विभागाशी सामंजस्य करार



**कौशल्य विकास , रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र सरकार व महाराष्ट्र चेंबरमध्ये सामंजस्य कराराप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दुसऱ्या फोटोमध्ये महामहिम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, पर्यटन आणि महिला व बाल विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती मनीषा वर्मा, महिला उद्योजकता समितीच्या चेअरपर्सन सौ. संगीता पाटील, प्रभारी सरकार्यवाह सागर नागरे.**

**नवी दिल्ली :** कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग, महाराष्ट्र सरकार व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉ र्स, इंडस्ट्री अँण्ड अँग्रिकल्चरमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून नोकरी मिळण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण देणे, जिल्हास्तरीय रोजगार मेळावे आयोजित करणे, कौशल्य विभागाच्या सहकार्याने गाव पातळीवर एक हजार कौशल्य विकास केंद्र निर्माण करण्याकरिता प्रयत्न करण्यात येणार आहे.

दिल्ली येथील राजभवनात महामहिम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, पर्यटन आणि महिला व बाल विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती मनीषा वर्मा, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला.

# महाराष्ट्रात तीन पीएम मित्र वस्त्रोद्योग क्लस्टर द्यावेत, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची पियुष गोयल यांच्याकडे मागणी

## डिफेन्स व इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टरसाठी ही पाठपुरावा करणार

**मुंबई :** केंद्र सरकारच्या नवीन पीएममित्र टेक्सटाईल पार्क धोरणानुसार होणाऱ्या सात वस्त्रोद्योग क्लस्टरर्स पैकी तीन क्लस्टर्स महाराष्ट्रासाठी द्यावेत अशी मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री पियुष गोयल यांचेकडे केली. महाराष्ट्रात ईचलकरंजी, भिवंडी व मालेगांव ही तीन केंद्रे वस्त्रोद्योगासाठी प्रसिध्द आहेत या ठीकाणी वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे. त्यामुळे वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे. त्यामुळे वस्त्रोद्योगातील सर्व प्रकारांसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ आवश्यक तंत्रज्ञान महाराष्ट्रात सहजपणे उपलब्ध आहे.

पीएम मित्र पार्क वस्त्रोद्योग क्लस्टर मुळे वस्त्रोद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याबरोबर तरूणांना वस्त्रोद्योग करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल व मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील. त्यामुळे महाराष्ट्रात कोल्हापूर, औरंगाबाद, ठाणे, लातुर, नाशिक, नागपुर या सहापैकी जागा उपलब्ध असेल अशा तीन ठीकाणी नवीन वस्त्रोद्योग क्लस्टर्स मंजुर करावीत अशी मागणी राज्याच्या व्यापार–उद्योग क्षेत्राची शिखर संस्था महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉम र्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरच्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांनी केली.

# महाराष्ट्रातील विमानसेवांना गती देण्यात येईल : केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉर्स अँण्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांना आश्वासन जळगाव, नांदेड, गोंदिया, लातूर येथून लवकरच विमानसेवा सुरू करण्याचे विशेष प्रयत्न**



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील विमानसेवांना गती देण्यासाठी नागरी उड्डाण मंत्रालयातर्फे विशेष प्रयत्न केले जातील, अशी ठोस ग्वाही केंद्रीय विमान वाहतूकमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजला दिली. चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाला त्यांनी दिल्ली येथे बैठकीसाठी शुक्रवारी आमंत्रित केले होते.

त्यावेळी त्यांनी हे ठोस आश्वासन दिले. नवी दिल्ली येथील नागरी उडडयन मंत्रालय, राजीव गांधी भवन येथे बैठक झाली. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी ज्योतिरादित्य सिंधीया यांची कोल्हापूर दौर्‍याच्या वेळी भेट घेतली होती. राज्यातील विमातळांचे प्रश्न महत्वाचे असून ते तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी केली होती. त्या पार्श्वभूीवर विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळाला दिल्ली येथे बैठकीसाठी आमंत्रित केले होते. या बैठकीत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्रातील विविध विमानतळांच्या सद्यस्थितीचा व महाराष्ट्राच्या अपेक्षांचा अहवाल त्यांना सादर केला. महाराष्ट्रातील नांदेड, जळगाव, लातूर, गोंदिया या पूर्ण असलेल्या विमानतळावर विमानसेवा तत्काळ सुरु करावी, अशी मागणीअध्यक्ष गांधी यांनी केली. त्यावर विमान कंपन्यासोबत बैठक घेऊन या विमानसेवा लवकरात लवकर सुरु करण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्री सिंधीया यांनी दिले.

# महिला उद्योजकता अभियानासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० यांच्यात सामंजस्य करार चेंबरची महिला समिती व रोटरी ची साक्षरता समिती यांचा सहभाग



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० यांच्यामधील सामंजस्य करारावरप्रसंगी चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० च्या वतीने डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. आनंद झुंझनवाला, चेंबरच्या महिला उद्योजकता समिती चेअरपर्सन सौ. संगीता पाटील.**

**शेगांव** : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर चे महत्वपुर्ण राज्यस्तरीय महिला उद्योजकता अभियान संयुक्तपणे संचलित करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० यांच्यामधील सामंजस्य करारावर रोटरी ३०३० डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स मध्ये शेगांव येथे स्वाक्षरी करण्यात आल्या.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर ची महिला उद्योजकता समिती व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० ची साक्षरता समिती संयुक्तपणे हा उपक्रम संचालित करण्याचा निर्णय या कराराद्वारे घेण्यात आला. महाराष्ट्र चेंबर तर्फे अध्यक्ष ललित गांधी व रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० च्या वतीने डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. आनंद झुंझनवाला यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. तर चेंबरची महिला समिती व रोटरी ची साक्षरता समिती या दोन्ही समित्यांच्या प्रमुख या नात्याने सौ. संगीता पाटील यांनी करारावर स्वाक्षरी केली

## महाराष्ट्र चेंबर व सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन सामंजस्य करारामुळे दोन्ही राज्याच्या व्यापार उद्योगांचा विकास होईल : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी



**मफसिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनफक्र व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चर यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराप्रसंगी मान. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उत्तराखंडचे उद्योग मंत्री चंदन रामदास, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हरिंद्र कुमार गर्ग, महाराष्ट्र चेंबरच्या विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, पर्यटन समितीचे चेअरमन संतोष तावडे, टॅक्सेशन कमिटीचे चेअरमन उदय गोडबोले, इंटरनल ट्रेड कमिटीचे चेअरमन प्रदीप मांजरेकर, ट्रेड असोसिएशन कमिटीचे चेअरमन धैर्यशील पाटील आदी.**

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र चेंबर व सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन सामंजस्य करारामुळे महाराष्ट्र आणि उत्तराखंड या दोन्ही राज्याच्या व्यापार उद्योगांच्या विकास निश्चितच होईल, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रीकल्चर यांच्यात १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी राजभवन येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये हा सामंजस्य करार करण्यात आला. त्या वेळी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी हे प्रतिपादन केले. दोन्ही राज्यांनी केलेल्या या कराराचे त्यांनी कौतुक केले. चेंबरने हे महत्वपूर्ण आणि सकारात्म क पाऊल टाकले आहे, असे सांगून महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची प्रशंसा केली.

उत्तराखंडचे उद्योगमंत्री श्री. चंदन राम दास, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सिडकुल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हरिंद्र कुमार गर्ग यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

## महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग मायटेक्स एक्स्पो नाशिक - २०२३ मध्ये संयुक्त आयोजक म्हणून सहभागी - नाम. उदय सामंत



**मायटेक्स एक्स्पो नाशिक मध्ये महाराष्ट्र शासन उद्योग विभागाचा सहभाग घोषित करताना नाम. उदय सामंत, नाम. दादा भुसे, ललित गांधी, अनिल लोढा, कांती चोपडा, रविंद्र माणगावे, पंढरी किरवे, सागर नागरे**

**मुंबई :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर तर्फे ६ ऑक्टोबर ते ०९ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत नाशिक येथे संपन्न होत असलेल्या 'मायटेक्स एक्स्पो २०२३' मध्ये महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग व एम.आय.डी.सी. संयुक्त आयोजक म्हणून सहभागी असतील अशी घोषणा राज्याचे उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांनी केली. नाशिक चे पालकमंत्री व राज्याचे खनिज, बंदरे व सार्व. बांधकाम मंत्री नाम. दादा भुसे यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल लोढा, उपाध्यक्ष कांती चोपडा, रविंद्र माणगावे, सेक्रेटरी जनरल सागर नागरे, उद्योजक पंढरी किरवे यांची उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांच्या समवेत मंत्रालयात बैठक संपन्न झाली त्याप्रसंगी ते बोलत होते.

## रेल्वेसाठी लागणाऱ्या उत्पादनांत खाजगी उद्योगांचा सहभाग वाढविणार : रावसाहेब दानवे

**नवी दिल्ली** : रेल्वे विभागासाठी लागणाऱ्या विविध उत्पादनांपैकी खाजगी उद्योगांसाठी अधिक उत्पादने खुली करू अशी ग्वाही रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची ललित गांधी यांना दिले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने नुकतीच नवी दिल्ली मधील रेल भवन येथे रेल्वेंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेऊन रेल्वे विभागासाठी लागणारी अधिकाधिक उत्पादने खाजगी उद्योगांसाठी खुली करून देण्याची मागणी केली होती त्याप्रसंगी ते बोलत होते.

रेल्वेसाठी लागणारे विविध सुटे भाग, उपकरणे उत्पादन करण्याची परवानगी खाजगी उद्योगांना दिल्यास मोठ्या प्रमाणावर उद्योग वाढण्यासाठी व रोजगार निर्मितीसाठी उपयोगी ठरेल अशी भुमिका ललित गांधी यांनी मांडली. यावेळी रेल्वे माल वाहतुक प्रवासी वाहतुकीसंबंधी विविध मागण्याही सादर करण्यात करण्यात आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर वैभववाडी या कोकण रेल्वेस जोडणाऱ्या मार्गाचे काम तात्काळ सुरू करणे, कोल्हापूर– मुंबई



**रेल भवन, दिल्ली येथे रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याशी चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत संदिप भंडारी व अन्य**

सुपरफास्ट एक्सप्रेस सुरू करणे, कोल्हापूर – पुणे इंटरसिटी एक्सप्रेस सुरू करणे, कोल्हापूर– अहमदाबाद रेल्वे दररोज सुरू करून ती आबुरोड पर्यंत वाढविणे, कोरोना नंतर सेवा बंद केलेली सह्याद्री एक्सप्रेस पुर्ववत सुरु करणे, कोरोना काळानंतर महालक्ष्मी एक्सप्रेस चे बंद केलेले सर्व थांबे पुर्ववत सुरू करणे या मागण्यांचा प्रामुख्याने समावेश होता.

## उद्योग, व्यापार जगताची राष्ट्रीय शिखर संस्था फिक्की च्या संचालक मंडळ निवडणुकीत सलग तिसऱ्यांदा ललित गांधी विजयी

**नवी दिल्ली** : देशातील उद्योग, व्यापार व आर्थिक जगताची सर्वोच्च शिखर संस्था म्हणून काम करत असलेल्या व फिक्की या नावाने ओळखले जात असलेल्या नवी दिल्लीच्या फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज च्या कार्यकारी समिती संचालकपदाच्या निवडणुकीत ललित गांधी सलग तिसऱ्यांदा विजयी झाले. या निवडणुकीत ललित गांधी विक्रमी मतांनी निवडून आले. निवडीचा कालावधी तीन वर्षासाठीचा आहे. फिक्कीचे महासंचालक अरुण चावला यांनी त्यांना नुकतेच निवडून आल्याचे प्रमाणपत्र दिले. दिल्ली येथे फिक्कीच्या ९५ व्या वार्षिक सभेप्रसंगी ही निवडणूक संपन्न झाली. या निवडणुकीत गांधी यांनी सलग तिसऱ्यांदा निवडून येऊन बाजी मारली.




यावेळी झालेल्या निवडणुकीत या गटात उर्वरित महाराष्ट्रातून निवडून आलेले ते एकमेव प्रतिनिधी आहेत. देशातील विविध उद्योग व व्यापारी घटकांची राष्ट्रीय शिखर संस्था असलेल्या मफिक्कीफ च्या औद्योगिक संस्था गटातून झालेल्या निवडणूकीत ललित गांधी यांनी हा विजय प्राप्त केला. यापूर्वी दोन वेळा संचालक म्हणून काम करताना अचूक माहिती उद्योग जगताला देत सरकार बरोबर योग्य तो समन्वय करण्याचं महत्वाचं काम केले आहे. देशाच्या अर्थविषयक आणि उद्योग विषयक धोरण ठरविण्यात प्रमुख भूमिका बजाविणाऱ्या फिक्की च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विकासासाठी विशेष पुढाकार घेतला जाईल, महाराष्ट्रातील छोट्या व मध्यम उद्योगांना सुद्धा अधिक बळ देण्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून काम करू असेही त्यांनी सांगितले.

# उद्योगांना चालना देण्यासाठी औद्योगिक वसाहतींना आवश्यक सर्व सुविधा देणार : उद्योग मंत्री उदय सामंत

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांची बैठक

## औद्योगिक वसाहतींचे विविध प्रश्न मार्गी लागल्याने उद्योजकांतून समाधान



**महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ व उद्योग विभाग कोल्हापूर जिल्हा आढावा बैठकप्रसंगी नाम. उदय सामंत, चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी राहुल भिंगारे, अधीक्षक अभियंता राजेंद्र गावडे, कार्यकारी अभियंता अतुल ढोरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, सत्यजित चंद्रकांत जाधव.**

**कोल्हापूर :** राज्यात उद्योगांना चालना देण्यासाठी औद्योगिक वसाहतींना आवश्यक त्या सर्व सुविधा गतीने उपलब्ध करुन देण्यात येतील, असे प्रतिपादन करुन कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींचे अनेक प्रश्न उद्योगमंत्री श्री. सामंत यांनी बैठकी दरम्यान मार्गी लावले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज, ॲण्ड ॲग्रीकल्चर च्या वतीने आयोजित महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ व उद्योग विभागाची कोल्हापूर जिल्हा आढावा बैठक तसेच उद्योग क्षेत्राच्या समस्यांबाबत कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींसोबत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज, ग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

या बैठकीत अनेक प्रश्न मार्गी लागल्याने उद्योजकांनी समाधान व्यक्त करुन चेंबरचे आभार मानले. हॉटेल सयाजी येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीला राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी राहुल भिंगारे, अधीक्षक अभियंता राजेंद्र गावडे, कार्यकारी अभियंता अतुल ढोरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, सत्यजित चंद्रकांत जाधव तसेच औद्योगिक संघटनांचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

# उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते महाराष्ट्र चेंबर पत्रिका अंकाचे प्रकाशन



**उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते माहे जानेवारी-फेब्रुवारी महाराष्ट्र चेंबर पत्रिका अंकाचे प्रकाशन करण्यात आले उपस्थितात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, रवी माने, उद्योजक, स्मॅकचे सुरेंद्र जैन आदी मान्यवर.**

# रोजगार निर्मितीसाठी सकारात्मकता नसल्यास बँकांवर गुन्हे दाखल करणार

## समिती स्थापनेसाठी महाराष्ट्र चेंबरचे सहकार्य घ्या : उद्योगमंत्री उदय सामंत





**कोल्हापूर विमानतळ परिसरात झालेल्या 'रोजगार निर्मिती आढावा' बैठकीत बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत. उपस्थितात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी. सोबत जिल्हाधिकारी राहुल रेखावार, बँकांचे पदाधिकारी.**

**कोल्हापूर** : उद्योजकांना कर्ज मंजूरीची प्रक्रिया सोपी सुटसुटीत करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमा. त्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे सहकार्य घ्या. रोजगार निर्मितीसाठी बँकांनी सकारात्मकता दर्शविली नसल्यास बँकावर संबधित युवकच एफआयआर दाखल करतील. त्यामुळे प्रसंगी बँकावर गुन्हे दाखल करण्याची वेळ आणू नका, असा इशारा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या वतीने कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यातील उद्योजकांसाठी २८ जानेवारी रोजी बैठक आयोजित केली होते. त्या बैठकीसाठी उद्योगमंत्री सामंत कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर कोल्हापूर विमानतळ परिसरातील एका फार्म हाऊसमध्ये जिल्हाधिकारी राहुल रेखावार, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत रोजगार निर्मितीसाठी झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, केंद्र आणि राज्य सरकारची कर्जाला शंभर टक्के हमी असताना तुम्ही कर्ज प्रकरणे नामंजूर कशी करु शकता? युवकांना रोजगार मिळाला पाहिजे. यासाठी बँकांनी सकारात्मकता बाळगणे गरजेचे आहे. कर्ज प्रकरणे वाढवा, अन्यथा तुमच्या विरोधात प्रसंगी एफआयआर दाखल करण्यास भाग पाडू नका, असा दम बँक अधिकाऱ्यांना दिला. कोल्हापूरच्या पुढील दौऱ्याच्या वेळी या सर्व प्रकरणाचा आढावा घेतला जाईल त्या वेळी कामकाजात हयगयपणा केल्याचे निदर्शनास आल्यास संबधित युवकाकडूनच दिरंगाई करणाऱ्या बँकेवर एफआयआर दाखल केले जाईल.

या बैठकीत जिल्ह्यातून कर्जासाठी आलेल्या अर्जांची संख्या आणि एकूण मंजूर झालेल्या अर्जांची संख्या याची माहिती जिल्हाधिकारी रेखावार व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सतीश शेळके यांनी दिली.

# MIDC ने मागणी केलेला मागील काळाचा GST पूर्णपणे रद्द करावा, अन्यथा आंदोलन उभारु : ललित गांधी

**कोल्हापूर** : जीएसटीची वसुली एम आयडीसीतर्फे झाली नसल्यामुळे हा चुकीचा भुर्दंड भरणार नाही, अशी भूमिका उद्योजकांनी घेतली आहे. हा विषय सोडविण्यासाठी राज्य सरकारने समिती स्थापन केली असून त्याचा अहवाल येईपर्यंत धीर धरा, तोपर्यंत MIDC चा मागील जीएसटीसाठी तात्पुरती स्थगिती दिली असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कोल्हापुरात सांगितले.



कोल्हापुरातील उद्योजकांनी त्यांच्या विविध समस्या संदर्भात उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. त्या वेळी महापालिका क्षेत्रातील गाळेधारकांचे भाडे, उद्योगांसाठी गायरान जमिनीची समस्या, गडहिंग्लज येथील औद्योगिक वसाहतीपर्यंतच्या रस्त्याची मागणी तसेच लघु उद्योजकांच्या निर्यातीला चालना देण्यासाठी प्रोत्साहन आणि औद्योगिक क्षेत्रातील जमिनीच्या विषयासंदर्भात चर्चा करण्यात आली.

# जळगांवच्या उद्योजकांची लवकरच बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेणार; उद्योगमंत्री उदय सामंत यांची घोषणा

## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाठी दिशा ठरविणारी 'जळगांव जिल्हा विकास परिषद' संपन्न



**जळगांव जिल्हा विकास परिषदेचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना उद्योगमंत्री नाम. उदय सामंत सोबत, चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, आम. सुरेश भोळे, आम. संजय सावकारे, सौ. संगिता पाटील, सुधाकर देशमुख आदी मान्यवर.**

**जळगाव :** विदेशी गुंतवणूकदार भारतात व महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास सकारात्मक आहेत. त्यांना महाराष्ट्रातच गुंतवणूक करावयाची आहे. भुसावळ येथे ५५० कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून फळावर प्रक्रिया करून कपडे तयार करण्याचा व्यवसाय या उद्योगातून होणार आहे. आमचे सरकार सातत्याने काम करणारे सरकार असून आजच्या जळगाव जिल्हा विकास परिषदेत महाराष्ट्र चेंबर व स्थानिक संघटनांनी मांडलेले मुद्दे व अडचणी तत्काळ सोडविल्या जातील. त्या संदर्भात मंत्रालयात महाराष्ट्र चेंबरचे पदाधिकारी आणि जळगाव जिल्ह्यातील व्यापारी औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक लवकरच घेण्याची घोषणा उद्योगमंत्री सामंत यांनी केली. प्रलंबित प्रश्नक तत्काळ सकारात्मक निर्णय घेऊन सोडविण्याचा विश्वासही त्यांनी उद्योजक, व्यापारी बंधूना दिला.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज नाट्यसंकुलात 'जळगाव जिल्हा विकास परिषद' मोठ्या उत्साहात संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र सरकारचा उद्योग विभाग, एमएसएमई, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग संचलनायालयाच्या वतीने ही भव्य विकास परिषद संपन्न झाली. महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे, भुसावळचे आमदार संजय सावकारे प्रमुख पाहुणे होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रास्ताविकात जळगाव जिल्हा विकास परिषद सविस्तर माहिती दिली. जळगाव जिल्ह्यातील प्रमुख समस्या वीज दरवाढ, कामगार उपकर, इएसआयसी हॉस्पिटल, एक्सप्रेस फिडर वीज मिळण्यात अडचण, गाळेधारकांचे भाडे, पायाभूत सुविधा, विमानसेवा, बाजार समिती कायदा रद्द करणे, व्यावसायिक कर रद्द करणे, 'उद्योग मित्र' ची सभा होणे 'उद्योग मित्र' प्रमाणेच 'व्यापार मित्र समिती' स्थापन करण्याची मागणी केली. त्याचबरोबर नवीन एमआयडीसी मागणीसह अन्य समस्या मांडल्या.

# महाराष्ट्र चेंबरच्या जिल्हा कार्यालयाच्या माध्यमातून जळगावचा सर्वांगीण विकास होईल : उद्योगमंत्री उदय सामंत



**जळगाव जिल्हा कार्यालयाचे फीत कापून उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन झाले यावेळी उपस्थितात महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, आमदार राजुमामा भोळे, जळगाव विकास परिषदेच्या प्रकल्प प्रमुख सौ. संगिता पाटील, विनोद बियाणी.**

## महाराष्ट्र चेंबरच्या जळगाव जिल्हा कार्यालयाचे थाटामाटात उद्घाटन संपन्न

**जळगांव :** 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरच्या' जळगाव जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते थाटामाटात झाले. याप्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्र चेंबरच्या जळगाव जिल्हा कार्यालयाच्या माध्यमातून जळगावचा व्यापारी औद्योगिक दृष्ट्या विकास तर होईलच त्यासह जळगाव जिल्ह्याचा सर्वांगीण विकास महाराष्ट्र चेंबरच्या विविध उपक्रम ंच्या माध्यमातून होण्यास मदत होईल. यामध्ये राज्य सरकार सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे ठोस आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले.

# नवीन ७५० एकर च्या औद्योगिक वसाहतीची जागा निश्चिती लवकरच

**MIDC चे विभागीय कार्यालय, हॉस्पिटलसाठी जागा लवकरच**
**व्यापार मित्र समितीची संपूर्ण राज्यात स्थापना होणार**



उद्योग विभागात संपन्न बैठकीमध्ये व्यापार-उद्योगाच्या प्रमुख मागण्याविषयी चर्चा करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी चर्चेत सहभागी आमदार सुरेश भोळे, एमआयडीसीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, सहसचिव उद्योग संजय देगांवकर, अवर सचिव उद्योग किरण जाधव, MIDC उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सोनाली मुळे, MIDC मुख्य अभियंता एस.आर.तुपे, प्रादेशिक अधिकारी अनिल गावित, जळगांव जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक चेतन पाटील, सौ. संगिता पाटील, महेंद्र रायसोनी, नितिन इंगळे, किरण बच्छाव, अरविंद दहाड, दिलीप गांधी, किरण राणे, सचिन चोरडीया, सुयोग जैन, रूपेश शिंदे, राजेंद्र चौधरी, महेंद्र सोनार, रमेश शिंदे, संजय जैन

**मुंबई** : जळगांव जिल्ह्यातील नवीन उद्योगांची गरज पुर्ण करण्यासाठी कुसुंबा जवळ ७५० एकर जागेत नवीन औद्योगिक वसाहत उभारण्यासाठी सह मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी येत्या आठवड्यात जागा पाहणी करून अहवाल सादर करतील, तसेच एम आयडीसी चे स्वतंत्र विभागीय कार्यालय जळगांव येथे सुरू करण्यात येणार असून, कामगार विमा योजनेच्या हॉस्पिटलसाठी आवश्यक ५ एकर जागा एक महिन्या निश्चित केली जाईल, असे निर्णय गुरूवार दि. ९ रोजी मुंबई येथे उद्योग विभागात संपन्न बैठकीत झाल्याची माहिती ललित गांधी यांनी दिली.

उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या एक्सप्रेस टॉवर येथील कार्यालयात संपन्न बैठकीत उद्योगमंत्री ऑनलाईन सहभागी झाले. आमदार सुरेश भोळे यांनी उद्योजकांचे प्रश्न तातडीने निकाली निघावेत व यात कुचराई करण्याऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी अशी आग्रही मागणी केली.

# व्यापाराबाबत सरकारची ध्येय धोरणे सुसंगत हवीत : ललित गांधी

## सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी महासंघाचा वेंगुर्ले येथे उत्साहात एकता मेळावा संपन्न



वेंगुर्ले येथे ३५ व्या व्यापारी एकता मेळाव्याचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना उद्योजक भाई मंत्री. उपस्थितात महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष उमेश दाशरथी, प्रसाद पारकर, विवेक खानोलकर, नंदन वेंगुर्लेकर यांच्यासह अन्य पदाधिकारी.

**वेंगुर्ले** : अर्थव्यवस्थेचे व्यापार आणि उद्योजक हे महत्वाचे घटक आहेत. देशाची अर्थव्यवस्था व्यापाऱ्यावर चालते, यासाठी सरकारने सुसंगत ध्येयधोरणे ठेऊन व्यापार उद्योगाला प्रतिष्ठा दिल्यास खर्या अर्थाने विकास होईल. आज व्यापाऱ्यासमोर अनेक प्रश्न उभे असून महाराष्ट्र चेंबर्स गेली अनेक वर्षे हे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. भविष्यातही विविध योजना तसेच व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र चेंबर भक्कम पाठीशी उभे राहील, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

सिंधुदुर्ग जिल्हा व्यापारी महासंघाचा ३५ वा व्यापारी एकता मेळावा मंगळवारी सिद्धीविनायक मंगल कार्यालय वेंगुर्ले येथे झाला. या मेळाव्याचे उद्घाटन उद्योजक रघुवीर तथा भाई मंत्री यांच्या हस्ते झाले.

# महाराष्ट्राच्या औद्योगिक - व्यापार विकासातील महाराष्ट्र चेंबरचे योगदान गौरवास्पद : उपराष्ट्रपती जगदीश धनकड

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिल्ली येथे घेतली उपराष्ट्रपतींची भेट



**उपराष्ट्रपती महामहीम जगदीश धनकड यांची चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नवी दिल्ली येथे भेट घेतली. यावेळी उपस्थितात खासदार धैर्यशील माने, संदीप भंडारी.**

**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपती महामहीम जगदीशजी धनकड यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अँण्ड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नवी दिल्ली येथे संसदेतील त्यांच्या कार्यालयात भेट घेतली.

महाराष्ट्राच्या औद्योगिक व्यापार विकासातील महाराष्ट्र चेंबरचे योगदान गौरवास्पद असल्याचे गौरवोद्गार उपराष्ट्रपदी जगदीश धनकड यांनी काढले. त्यासह महाराष्ट्र चेंबरच्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय– नाशिकच्या सुवर्णमहोत्सव सांगता समारंभासाठी त्यांना दिलेले आमंत्रण त्यांनी स्वीकारले. या वेळी हातकणंगले मतदारसंघाचे खासदार धैर्यशील माने, महाराष्ट्र चेंबरचे युवा उद्योजक समितीचे चेअरमन संदीप भंडारी उपस्थित होते.

चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी महाराष्ट्र चेंबरतर्फे राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, चेंबरचे संस्थापक शेठ वालचंद हिराचंद यांचे भारतीय उद्योग जगतातील अफाट योगदान आहे. देशाच्या जडणघडणीत उद्योजकांचा मोठा वाटा आहे. उद्योजक, व्यापारी आणि सरकारमधील महत्वाचा दुवा म्हणून महाराष्ट्र चेंबर कार्यरत आहे. महाराष्ट्राच्या उद्योग, व्यापाराच्या जडणघडणीत चेंबरचा मोठा वाटा आहे. उद्योजक, व्यापारी यांचे हक्कांचे व्यासपीठ चेंबर असून त्या माध्यमातून राज्यातील अनेक प्रश्नक मार्गी लागले आहेत.

# आष्टा एमआयडीसीसाठी आठ दिवसांत अहवाल सादर करा : खासदार धैर्यशील माने

## नवीन एमआयडीसी साठी 'महाराष्ट्र चेंबर' संपूर्ण सहकार्य करेल : ललित गांधी



**सांगली जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या सोयी सुविधांसाठी आयोजित बैठकीप्रसंगी खास. धैर्यशील माने, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत उपस्थित प्रशासकीय अधिकारी व उद्योजक**

**सांगली :** आष्टा एमआयडीसीसाठी झालेल्या बैठकीत कारंदवाडी येथील जमीनीचे गट तपासून आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश खासदार धैर्यशील माने आणि सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले. यामुळे आष्टा एमआयडीसीच्या कामास गती मिळाली आहे.

सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या दालनात खासदार धैर्यशील माने यांच्या पुढाकाराने आष्टा, कारंदवाडी औद्योगिक क्षेत्रासाठी तसेच सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर शिराळासह सर्व औद्योगिक क्षेत्राच्या सोयी सुविधा तसेच समस्या बाबत महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीसाठी महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, आष्टा परिसरात एमआयडीसीची उभारणी झाल्यास उदयोग व्यवसायाला चालना मिळणार आहे. खासदार धैर्यशील माने यांच्याकडून सुरु असलेल्या प्रयत्न निश्चितच साकार होतील. पुढे गांधी म्हणाले, नवीन एमआयडीसी क्षेत्र डी प्लस प्लस झोन मध्ये घोषित करून अधिक सवलत द्यावी तसेच या ठिकाणी भूखंडाचे दर नेहमीपेक्षा कमी ठेवावेत म्हणजे उद्योग येण्यास प्रोत्साहन मिळेल अशा मागण्या मांडून मोठे उद्योग जिल्ह्यात येण्यासाठी प्रयत्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे प्रयत्न केले जातील अशी ग्वाही दिली.

# 'महाराष्ट्र ट्रेडर्स वेलफेअर बोर्ड'ची स्थापना करावी

## राज्यातील व्यापारी, उद्योजकांच्या विविध प्रश्नांसाठी महाराष्ट्र चेंबरतर्फे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट




**राज्यातील व्यापारी उद्योजकांचे विविध प्रश्नी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नाशिक येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. उपस्थितात महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिल लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा व अन्य पदाधिकारी.**

**नाशिक :** राज्यातील व्यापारी उद्योजकांचे विविध प्रश्न,विशेषता राज्यातील एक कोटीहून अधिक व्यापाऱ्यांच्या विकासासाठी ''महाराष्ट्र ट्रेडर्स वेल्फेअर बोर्ड'' च्या स्थापनेची मागणी तसेच बाजार समिती कडून सेस व अन्य चार्जेस आकारणी समस्या संदर्भात उपाययोजना, एमआयडीसीतील दुहेरी कराची आकारणी तसेच एमआयडीसी कडून मागील कालावधीतील जीएसटीची केली गेलेली मागणी आदी प्रमुख विषयावर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरतर्फे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने नाशिक येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेतली.

यावेळी विविध विषयावर सविस्तर चर्चा होऊन चेंबरतर्फे मागणी अहवाल सादर करण्यात आले. व्यापारी, उद्योजकांच्या या विविध प्रश्नांसंबंधी अधिवेशन काळात संयुक्त बैठक आयोजित केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तसेच एमआयडीसीतील दुहेरी कर आकारणी थांबवण्यात येईल.

यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

# पणन मंत्रालयाच्या राज्यातील बाजार समिती अभ्यास गट सदस्यपदी ललित गांधी यांची निवड



**मुंबई :** राज्यातील खाजगी बाजार आवार संदर्भात विविध बाबींची तपासणी करण्यासाठी सरकारने नियुक्त केलेल्या अभ्यास गटाच्या सदस्यपदी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री चे अध्यक्ष ललित गांधी यांची निवड झाली आहे. माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यीय अभ्यास गटात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष या नात्याने ललित गांधी यांचा 'व्यापारी प्रतिनिधी' म्हणून समावेश केला आहे.

राज्याच्या सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाने ही निवड केली असून त्याबाबतचे परिपत्रक जारी केले आहे. ही समिती थेट पणन, शेतकरी ग्राहक बाजार, कंत्राटी शेती करार आणि इलेक्ट्रॉनिक व्यासपीठाद्वारे पणन या बाबींचा अभ्यास करणार आहे. राज्यातील खासगी बाजार आवार व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी सरकारने स्थापन केलेल्या अभ्यास गटाला अहवाल सादर करण्यासाठी ७५ दिवसांचा कालावधी दिला आहे.

# महाराष्ट्र चेंबरतर्फे 'मायटेक्स एक्स्पो' प्रदर्शनाचे भव्य आयोजन

## राज्यपाल रमेश बैस, लोकसभा अध्यक्ष ओमजी बिर्ला यांच्या हस्ते 'मायटेक्स एक्स्पो' प्रदर्शनाच्या लोगोचे अनावरण




**मायटेक्सपो प्रदर्शनाच्या लोगोचे अनावरण करतांना महामहिम राज्यपाल रमेश बैस व लोकसभा अध्यक्ष ओमजी बिर्ला, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी समवेत वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष तनसुख झांबड, माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन संजय सोनवणे, नितिन धुत, कार्यकारिणी सदस्य व्हिनस वाणी, उमेश वानखेडे, जयेश ओसवाल आदी.**

**मुंबई :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरतर्फे येत्या ऑक्टोबर २०२३ महिन्यात होणाऱ्या मायटेक्स एक्स्पो २०२३ प्रदर्शनाच्या लोगोचे अनावरण राज्यपाल रमेश बैस लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरतर्फे उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योगाला चालना देण्यासाठी 'मायटेक्स एक्स्पो – २०२३' या व्यापारी प्रदर्शनाचे आयोजन दिनांक ६ ते ९ ऑक्टोबर २०२३ दरम्यान नाशिक येथील डोंगरे वसतिगृह येथे करण्यात येणार आहे. मायटेक्सपो या प्रदर्शनाच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योगाला राज्य व देश पातळीवर प्रोत्साहन देण्याचे काम होणार असून या माध्यमातून नवीन व्यापार उद्योग संधी प्राप्त होणार आहे.

या एक्स्पोमध्ये व्यापार, कृषी, उद्योग, बांधकाम, आयटी, शिक्षण, गृह प्रकल्प यासह विविध १५ हून अधिक क्षेत्रातील २५० स्टॉल या प्रदर्शनात असणार आहेत. या चार दिवसात विविध विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे. प्रदर्शन यशस्वीतेसाठी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उत्तर महाराष्ट्र शाखा चेअरमन कांतीलाल चोपडा, उत्तर महाराष्ट्र शाखा को–चेअरमन संजय सोनवणे, कार्यकारीणी सदस्य संदीप भंडारी, व्हीनस वाणी, सुधाकर देशमुख, संजय राठी, आदींसह उत्तर महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य परिश्रम घेत आहेत. या प्रदर्शनात उत्तर महाराष्ट्रातील व्यापार उद्योग शिक्षण यासह विविध क्षेत्रातील व्यापारी उद्योजकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र चेंबरतर्फे करण्यात आले आहे.

# जाकार्ता-इंडोनेशिया येथील भारतीय दुतावासात विशेष बैठक संपन्न





महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी कराड येथे भेट घेवून त्यांना महाराष्ट्र चेंबरच्या विविध मागण्यांचे निवेदन देवून चर्चा केली.



केंद्रीय नागरी उड्डयनमंत्री ज्योतीरादित्य शिंदे यांनी कोल्हापूर विमानतळ विस्तारीकरण कामाची पाहणी केली. यावेळी खास. धनंजय महाडीक, जिल्हाधिकारी राहूल रेखावार, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी उपस्थित होते.

# कोल्हापूरच्या औद्योगिक विकासाचे सर्व प्रश्न मार्गी लावू : उदय सामंत

## ललित गांधी यांच्या पाठपुराव्याने बरेच प्रश्न निकाली लागल्याचे उद्योगमंत्र्यांचे गौरवोद्गार

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासंबंधी सर्व प्रश्न प्राधान्याने मार्गी लावले जातील अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या सततच्या पाठपुराव्याने यापूर्वीचे जवळपास सर्वच प्रश्न मार्गी लावल्याचे सांगुन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कोल्हापूरच्या औद्योगिक वसाहतीसाठी १०० कोटी रूपये, नवीन तीन औद्योगिक वसाहती हे प्रश्न सोडवल्याचे आवर्जून सांगितले.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी त्यांच्या कोल्हापूर दौऱ्यात ललित गांधी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली त्यावेळी त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित विविध मान्यवरांशी चर्चा करताना ते बोलत होते. याप्रसंगी खासदार धैर्यशील माने ही उपस्थित होते.

ललित गांधी यांनी उद्योगमंत्र्यांचे स्वागत करून कोल्हापूर मधील नवीन एमआयडीसी, कोल्हापूरच्या उद्योगांच्या विकासाठी मेगा प्रोजेक्ट उभारणी, सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये पायाभूत सुविधा आदी प्रश्न मांडले. यावेळी महाराष्ट्र चेंबरचे रमाकांत मालू, नितिन धूत, प्रकाश शहा कोल्हापूर चेंबरचे संजय शेटे, प्रदीप कापडीया, जयेश ओसवाल, इंजिनिअरींग असोसिएशनचे दिनेश बुधले, गोशिमाचे दिपक चोरगे, कागल फाईव्ह स्टारचे हरिशचंद' धोत्रे, सीआयआयचे सोहन शिरगांवकर, क्रिडाईचे राजीव पारीख, के.पी.खोत, संदीप मिरजकर, गुजरी जैन संघाचे राजेश ओसवाल, भक्तीपूजानगर जैन संघाचे राजू सुखराज, महेंद्र जैन, प्रदीप जैन, रमेश राठोड, प्रवीण प्रतापचंद, संजय वोरा, विनोद नेनमल, मनोज राठोड, चेतक हिराचंद, मेट्रोलाईफचे भरत गांधी, दर्शन गांधी, विजय यादव, प्रशांत शिंदे, रमेश जैन, जितोचे अमृत पारख, महावीर एज्युकेशनचे महेश सामंत आदी उपस्थित होते. गांधी परिवारातर्फे साकलचंद गांधी, सौ. टिपूबाई गांधी, सौ. जया गांधी, सौ. अनिता गांधी, हर्षिता भंडारी, मुक्ती गांधी यांनी त्यांचे स्वागत केले.



**महाराष्ट्राचे उद्योगमंत्री नाम. उदय सामंत यांना पुष्पगुच्छ देवुन स्वागत करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत खास. धैर्यशील माने, भरत गांधी, दर्शन गांधी, जयेश ओसवाल.**

### उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडून चार महत्वाच्या घोषणा

'शासन आपल्या दारी' या तपोवन मैदानावर झालेल्या कार्यक्रमात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी चार महत्वाच्या घोषणा केल्या. कोल्हापूर जिल्ह्यात एमआयडीसी विस्तारीकरणाची महत्वाची घोषणा त्यांनी केली. कोल्हापूरमधील लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार एमआयडीसी विस्तारीकरण करण्यात येणार असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले.

# कोल्हापूर वैभववाडी रेल्वे मार्गातील सर्व तांत्रिक अडचणी दूर

## मध्य रेल्वे प्रकल्प पूर्ण करणार

## लवकरच संयुक्त बैठक घेण्याचा निर्णय




**कोकण रेल्वे समितीच्या बैठकीत डावीकडून खा. धनंजय महाडीक, खास.उमेश जाधव, खा. फ्रान्सिस सारडीन्हा, खा. एन.के. प्रेमाचंद्रन, खा. ईराप्पा काडादी, आमदार गणेश गांवकर, चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, माजी अध्यक्ष आशिष पेडणेकर.**

**गोवा :** कोल्हापूर वैभववाडी रेल्वे मार्गाचे प्रत्यक्ष काम सुरु करण्यासाठी मधील साठीच्या सर्व तांत्रिक अडचणी दूर झाले असून लवकरच या प्रकल्पाच्या कामास सुरुवात होण्याचा विश्वास कोकण रेल्वेच्या आज संपन्न झालेल्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. या मार्गाच्या उभारणीची जबाबदारी मध्य रेल्वेवर सोपवण्यात आली असून या संदर्भात मध्ये रेल्वे कोकण रेल्वे यांची संयुक्त बैठक लवकरच आयोजित करण्यात येणार असून यासाठी खासदार धनंजय महाडिक यांनी पुढाकार घेण्याचे आजच्या बैठकीत मान्य केले.

कोकण रेल्वेच्या मुख्य सल्लागार समितीच्या गोवा येथे पार पडलेल्या बैठकीत कोकण रेल्वेच्या ८०० किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गावरील एकूण ७२ स्टेशन्स व या संपूर्ण मार्गावरील सुविधांची सुधारणा प्रवाशासाठीच्या सुविधा नवीन मार्गावरील रेल्वे वाहतूक व मालवाहतुकीच्या सुविधा वाढवणे अशा विविध ४१ विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. खासदार धनंजय महाडिक व महाराष्ट्र चेंबूर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी कोल्हापूर वैभववाडी रेल्वे मार्गासंबंधी प्रश्न उपस्थित केले व या मार्गाचे काम लवकरात लवकर सुरू होण्यासाठीचा आग्रह धरला खासदार धनंजय महाडिक यांनी यासंदर्भात राज्य सरकारकडून द्यावयाच्या खर्चाचा वाटा लवकर उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. या  बैठकीत ललित गांधी यांनी कोकण विभागातून आंबा व अन्य फळांच्या वाहतुकीसाठी रो रो सेवा सुरू करण्याची मागणी केली ती मान्य करण्यात आली. व येत्या हंगामापासून रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नांदगाव स्टेशन वरून रो रो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोकण रेल्वेचे अध्यक्ष संजय गुप्ता यांनी कोल्हापूर वैभववाडी रेल्वे मार्ग हा प्रवासी व मालवाहतुकीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून या मार्गामुळे कोकण रेल्वेच्या उत्पन्नात भर पडणार असल्याचे सांगितले, तसेच या मार्गामुळे कोल्हापूर दक्षिण भारताशी थेट जोडले जाईल व त्याचा व्यापार उद्योग व पर्यटनाच्या विकासासाठी उपयोग होईल असेही सांगितले. खासदार धनंजय महाडिक यांनी रेल्वे सुधारणा संदर्भातल्या विविध सूचना दिल्या.

## मराठवाडा व्यापारी परिषदेचे महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, माजी अध्यक्ष मानसिंग पवार, मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपाल सिंग छाबडा यांच्या हस्ते उद्घाटन



**मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या २६ या वर्धापन दिनानिमित्त जालना जिल्हा व्यापारी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मराठवाडा व्यापारी परिषदेत मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी. उपस्थितात मराठवाडा विभागातील व्यापारी, औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी.**

# राज्य सरकारकडून 'मायटेक्स एक्स्पो २०२३' सर्वोतोपरी सहकार्य : पालकमंत्री दादाजी भुसे




**'मायटेक्स एक्स्पो २०२३' ट्रेड फेअरच्या माहितीपत्रकाचे अनावरण प्रसंगी मार्गदर्शन करताना नाशिकचे पालकमंत्री व राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे व्यासपीठावर उपस्थित अध्यक्ष महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, शाखा चेअरमन संजय सोनवणे, प्रदर्शनाचे कन्व्हेनर सचिन शहा, को-कन्व्हेनर व्हिनस वाणी, मिलिंद राजपूत, निमा अध्यक्ष धनंजय बेळे.**

**नाशिक :** उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअर महत्वपूर्ण ठरणार असून यामध्ये विविध १५ हून अधिक क्षेत्रातील ३०० स्टॉलचा सहभाग असेल. यामध्ये व्यापारी उद्योजकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअरच्या माहिती पत्रकाच्या अनावरण प्रसंगी ५० स्टॉल बुक झाले असून प्रतिसाद चांगला मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान राज्य सरकारकडून 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअरसाठी सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी या कार्यक्रमाप्रसंगी दिले.

उत्तर महाराष्ट्र विभागाच्या व्यापार, उद्योगाला प्रोत्साहन व चालना देण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरतर्फे येत्या ६ ते ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय 'मायटेक्स एक्स्पो २०२३' या ट्रेड फेअरचे आयोजन नाशिकमध्ये डोंगरे वस्तीगृह मैदान येथे करण्यात येत आहे.

# लघु व मध्यम उद्योगांना ४० टक्के स्वस्त वीज मिळणे शक्य : ललित गांधी



**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरमध्ये आणि महाप्रीत या दोन्ही संस्थात बुधवारी सामंजस्य करार झाला. या वेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी. 'महाप्रीत'चे व्यवस्थापकीय संचालक बिपिन श्रीमाळी , महाप्रीतचे संचालक पुरुषोत्तम जाधव, चीफ जनरल मॅनेजर दीपक कोकाटे, महाराष्ट्र चेंबरचे वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी , रवींद्र माणगावे शुभांगी तिरोडकर, कांतीलाल चोपडा, श्रीकृष्ण परब, सेक्रेटरी जनरल सागर नागरे, नितीन भट्ट.**

**मुंबई :** सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना ४० टक्के स्वस्त वीज मिळणे शक्य आहे. महाराष्ट्रातील लघु व मध्यम उद्योगांना सोलर एनर्जीच्या माध्यमातून स्वस्त वीज मिळणार आहे. त्यामुळे राज्यामधील औदयोगिक क्षेत्रात नवीन क्रांती होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरमध्ये आणि महाराष्ट्र सरकारचा उपक्रम असलेल्या महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित ( महाप्रीत ) यांच्यात बुधवारी सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. त्या वेळी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी प्रतिपादन केले.

# गतीमान व त्वरित निर्णयासाठी प्रसिद्ध उद्योमंत्र्यांनी कोल्हापूरच्या उद्योजकांना दिलेले आश्वासन पूर्ण केले : ललित गांधी

## औदयोगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांसाठी १२० कोटींचा निधी

**कोल्हापूर** : कोल्हापूरच्या उद्योगाला गती देण्यासाठी आणि रोजगारनिर्मिती वाढण्याच्या दृष्टीने या ठिकाणी मोठा उद्योग येणे अपेक्षित आहे, यासाठी लोकप्रतिनिधी, उद्योजकांच्या सामूहिक प्रयत्नानेच मोठा उद्योग येऊ शकतो. तसेच कोल्हापूर– सांगली जिल्ह्याच्या सीमेवर जागा सुचवा, आपण त्या ठिकाणी सुमारे १ हजार एकरावर एमआयडीसी उभी करु, असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, कोल्हापूरच्या औद्योगिक वसाहतीतील पायाभूत सुविधांसाठी १२० कोटींचा निधी दिला आहे. कोल्हापूरला मोठे उद्योग आणण्यासाठी येथील पायाभूत सुविधा, विमानसेवा, रेल्वे सुविधा भक्कम असल्याने गरजेचे आहे. म्हणूनच एम आयडीसीमधील पायाभूत सुविधा भक्कम केल्या जात आहेत. खासदार धनंजय महाडिक म्हणाले, राज्यातील यापूर्वी अडीच वर्षात स्थगितीचे सरकार होते. मात्र, आताच्या वेगवान महायुती सरकारकडून गतिम ान काम होत आहे. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्याच्या मध्यभागी एक हजार एकरावर मोठी एमआयडीसी उभारावी. या वेळी खासदार धैर्यशील माने, आमदार ऋतुराज पाटील यांची भाषणे झाली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले, गतीमान आणि त्वरित निर्णयासाठी प्रसिद्ध उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कोल्हापूरच्या उद्योजकांना दिलेले आश्वासन पूर्ण केले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र चेंबरच्या पुढाकाराने एम आयडीसी व उद्योग विभागात वतीने १८ जानेवारी, २०२३ रोजी हॉटेल सयाजी येथे कोल्हापूर जिल्हा आढावा बैठक घेतली होती. त्यामध्ये उद्योजकांनी विविध प्रश्न मांडले होते. त्याची पूर्तता उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली आहे.



# व्हिएतनाम-महाराष्ट्र व्यापार वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबरचा पुढाकार अभिनंदनीय - विन्ह लाँग प्रांताच्या उपमुख्यमंत्री नुयेन थी कुएन थान

## महाराष्ट्र चेंबर आणि व्हिएतनाम यांच्यात सामंजस्य करार स्वाक्षरीत




**व्हिएतनाम आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यात व्यापार वृद्धीसाठी सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी आणि यंग एंटरप्रायझेस असोसिएशन ऑफ विन्ह लॉग प्रोव्हीन्सचे उपाध्यक्ष ट्रॅन व्हॅन होआंग यांच्या हस्ते करारावर स्वाक्षरी झाल्या. या वेळी विन्ह लाँग प्रांताच्या उपमुख्यमंत्री नुयेन थी कुएन थान, राज्यपाल बुई व्हॅन न्हिएम, कॉन्सुलेट जनरल ली क्कांग बिएन, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब.**

**मुंबई** : व्हिएतनाम–महाराष्ट्र व्यापार वृद्धीसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचा पुढाकार महत्वपूर्ण असून अभिनंदनीय असल्याचे प्रतिपादन विन्ह लाँग प्रांताच्या उपमुख्यमंत्री नुयेन थी कुएन थान यांनी केले. व्हिएतनाम–भारत व्यापार परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. व्हिएतनाम मधील विन्ह लाँग प्रातांचे राज्यपाल बुई व्हॅन न्हिएम यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न व्हिएतनाम–भारत व्यापार परिषदेच्या उद्घाटन समारंभास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी सन्मानीय अतिथी म्हणून उपस्थित होते. १६ नोव्हेंबर रोजी व्हिएतनाम–भारत व्यापार परिषद संपन्न झाली. व्हिएतनामचे मुंबईतील कॉन्सुलेट जनरल ली क्कांग बिएन, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, श्रीकृष्ण परब, काऊन्सिल सदस्य निलेश घरत, प्रमोद शहा, गौरी खेर, बिंदा कन्यालकर यांच्यासह चेंबरचे विविध सदस्य, व्यापार उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवर परिषदेला उपस्थित होते.

# इंडोनेशिया सरकार व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व्यापार, पर्यटन वृद्धीसाठी संयुक्त उपक्रम राबविणार : ललित गांधी

## इंडोनेशिया सरकारतर्फे ललित गांधी यांचा विशेष सन्मान



जकार्ता-इंडोनेशिया दौऱ्याप्रसंगी इंडोनेशिया सरकार चे उद्योग मंत्रालयातील सर्वोच्च अधिकारी व महाराष्ट्र चेंबर च्या शिष्टमंडळाची बैठक यशस्वीपणे पार पडली.

**मुंबई :** 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चर' ही व्यापार, उद्योगातील सर्वात मोठी शिखर संस्था आहे. संस्थेच्या वतीने उद्योजक, व्यापारी बंधूना नवनवीन संधीची माहिती अवगत व्हावी. व्यवसाय, उद्योगवृद्धीसाठी नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमांतून मार्गदर्शन केले जाते. महाराष्ट्र चेंबरच्या सदस्यांसाठी दरवर्षी परदेशातील उद्योग, व्यापाराच्या नवीन संधी पाहण्यासाठी विशेष उपक्रम आयोजित केला जात आहे. १५ ते १९ ऑक्टोबरला महाराष्ट्र चेंबरचे २१ उद्योजकांच्या शिष्टमंडळाने नुकताच इंडोनेशियाचा अभ्यास दौरा केला. त्यातून भारत-इंडोनेशिया व्यापार, उद्योगवाढीसाठी महत्वपूर्ण पाऊल टाकण्यात महाराष्ट्र चेंबरला दैदिप्यमान यश मिळाले.

इंडोनेशिया सरकार आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व्यापार, पर्यटन वृद्धीसाठी संयुक्त उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच महाराष्ट्र चेंबरला महाराष्ट्रातील उत्पादन विक्रीसाठी इंडोनेशिया सरकारने जागा दिली असून १३ लोकांना व्यापार करण्याची ऑर्डर तत्काळ मिळाली आहे. महाराष्ट्र चेंबरचे लवकरच जकार्ता येथे कार्यालय स्थापन होत असल्याची माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. इंडोनेशिया सरकारच्या आमंत्रणावरुन आणि भारत सरकारच्या सहकार्याने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, ॲण्ड ॲग्रीकल्चरचे २१ उद्योजकांचे शिष्टमंडळाने जकार्ता-इंडोनेशिया हा दौरा १५ ते १९ ऑक्टोबरच्या या दरम्यान यशस्वीपणे पार पडला. हा दौरा निश्चितच उद्योजकांसाठी फलदायी झाल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले.

# उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी महसूल विभागनिहाय बैठका घेऊ : विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे



**'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर' तर्फे आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपोचे (मायटेक्स) फीत कापून उद्घाटन करताना महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे. उपस्थितात महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, तनसुख झांबड, चेंबरचे विश्वस्त आशिष पेडणेकर, आनंद मित्तल, डॉ. गोविंद पानसरे, डॉ. विजयकुमार मालपुरे, सेक्रेटरी जनरल सागर नागरे आदी मान्यवर.**

**पुणे :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर ही संस्था उद्योग आणि कृषी क्षेत्रात उत्तम नेतृत्व करत असून उद्योजक, व्यापारी यांच्या विकासात संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी महसूल विभागनिहाय बैठकीचे आयोजन करून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरतर्फे आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड एक्सपो (मायटेक्स) च्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. दरम्यान आयात-निर्यातीचा टक्का वाढविण्यासाठी लवकरच महाराष्ट्र चेंबरचे जकार्ता येथे कार्यालय स्थापन होत असल्याची घोषणा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी या वेळी केली.

# व्यापाऱ्यांच्या वाटेतले काटे दूर करू

## मुंबईत संयुक्त बैठक घेणार - पणन मंत्री अब्दुल सत्तार यांची ग्वाही





**महाराष्ट्र राज्य व्यापारी परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी दीपप्रज्वलन करताना राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार,सुनील सिंघी ,ललित गांधी, राजेंद्र बाठिया, जितेंद्र शहा व अन्य मान्यवर दुसऱ्या छायाचित्रात पणनमंत्री अब्दुल सत्तार यांचा पुणेरी पगडी देऊन सत्कार करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, दि पूना मर्चेंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया.**

**पुणे :** जगात भारत देशाचा जो नावलौकिक आहे तो व्यापाऱ्यांमुळे आहे. देशाच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. व्यापाऱ्यांची शक्ती किती आहे याची मला जाणीव आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे हितरक्षण करण्यासाठी, त्यांच्या विविध मागण्यांबाबत येत्या १५ दिवसात मुंबईत व्यापक बैठक घेतली जाईल. व्यापारी बांधव ज्या मार्गावरून चालत आहेत, त्यांच्या वाटेतले काटे नक्की दूर करु, असे ठोस आश्वासन राज्याचे पणन आणि अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स च्या पुढाकाराने फाम, ग्रोमा, कॅमिट, पूणे चेंबर आणि महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय राज्यव्यापी व्यापारी परिषदेचे आयोजन पुण्यातील श्री गणेश कला क्रीडा मंच येथे करण्यात आले होते. त्यावेळी पणन मंत्री अब्दुल सत्तार बोलत होते. या परिषदेसाठी सुमारे २५०० पेक्षा अधिक व्यापारी, संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.




**मायटेक्स एक्स्पो, पूणे मध्ये थेट उद्योगमंत्र्याशी संवाद कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत व्यासपीठावर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांच्या हस्ते सत्कार झाला.**

# महाराष्ट्र सरकार उद्योजक आणि व्यापाऱ्यांसोबत असून बैठकीतून सर्व प्रश्न मार्गी लागतील : उद्योगमंत्री उदय सामंत

**पुणे :** शासन शंभर टक्के उद्योजक आणि व्यापाऱ्यांसोबत आहे. विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी लवकरच मुंबईत संबंधित सर्व विभागांचे अधिकारी, सचिवांसोबत बैठक घेतली जाईल. या बैठकीतून उद्योग, व्यापाराचे बहुतांशी प्रश्न मार्गी लागतील, अशी ग्वाही राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी दिली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, महाराष्ट्र शासन उद्योग विभाग आणि एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रेड 'मायटेक्स एक्स्पो' या भव्य प्रदर्शनाला विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी भेट देऊन उद्योजकांसोबत संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते.

## ‘सुविधा आणि कौशल्य केंद्र’ स्थापन होणार : ललित गांधी

### महाराष्ट्र चेंबरचा उत्तराखंड राज्यासोबत सामंजस्य करार



**हॉटेल ताज येथे उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी समवेत महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, वरिष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, उपाध्यक्षा सौ. शुभांगी तिरोडकर, उपाध्यक्ष तनसुख झांबड, उपाध्यक्ष श्रीकृष्ण परब सिडकूल मॅन्यु. असो. उत्तराखंडचे हरेंद्र गर्ग आदी मान्यवर.**

**मुंबई :** उत्तराखंडमधील डेहराडूनमध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरने सुविधा आणि कौशल्य केंद्र (Facilities and Skills Centre) स्थापन करावे. त्यासाठी आवश्यक ती जागा उपलब्ध करुन दिली जाईल, अशी ठोस ग्वाही उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरच्या शिष्टमंडळाला दिली.

उत्तराखंडच्या सरकारने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सला हॉटेल ताज येथील कार्यक्रमासाठी निमंत्रित केले होते. त्या वेळी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी उत्तराखंड येथे येण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या शिष्टमंडळाने आमंत्रण दिले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी या आमंत्रणाचा स्वीकार करुन लवकरच उत्तराखंड येथे शिष्टमंडळ येईल, असे सांगितले. या वेळी महाराष्ट्र चेंबर आणि उत्तराखंड राज्यात Facilities and Skills Centre साठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आल्या.

## डायमंडचे देशातील सर्वात मोठे क्लस्टर नवी मुंबईत - नाम. उदय सामंत

**पुणे :** डायमंडचे देशातील सर्वात मोठे क्लस्टर नवी मुंबईतील महापे येथे स्थापित होणार असून यामुळे २० हजार कोटींची गुंतवणूक आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे एक लाख लोकांना रोजगार मिळेल. येथे स्थापित होणा–या उद्योगांना महाराष्ट्र शासनाने काही सवलती व प्रोत्साहने सुद्धा जाहीर केली आहेत, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी पुणे येथे पत्रकारांशी बोलताना दिली.

उद्योगमंत्री उदय सामंत सामंत म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र आजही थेट परकीय गुंतवणुकीत देशात क्रमांक एकवर आहे. रत्ने व आभूषणे क्षेत्रातील केंद्र शासनाची शिखर संस्था म्हणजेच जेम्स अँड ज्वेलरी एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलद्वारे इंडिया जेम्स अँड ज्वेलरी पार्क नवी मुंबई येथे स्थापित करण्यात येत आहे. या पार्कमध्ये सुमारे २ हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक स्थापित होणार आहेत. तसेच येथे मोठ्या नामांकित कंपन्या



सुद्धा गुंतवणूक करतील. अशा प्रकारचा देशातील हा एकमेव प्रकल्प आहे, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

# फर्निचर उद्योगाला सर्वोतोपरी सहकार्य करु : केंद्रीय मंत्री नारायण राणे

## देशाला आत्मनिर्भर बनविण्यात एमएसएमईचे मोठे योगदान : ललित गांधी




**'आत्मनिर्भर भारत कॉन्फरन्स २०२३' मध्ये मार्गदर्शन करताना केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नाम. नारायण राणे व्यासपीठावर उपस्थित चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष करूणाकर शेट्टी, मैत्री कक्षाचे अध्यक्ष दीपेंद्रसिंह कुशवाह, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे विजय कळंत्री एएफएमटी अध्यक्ष हुजेफा सॅम्पलवाला आदी मान्यवर.**

**मुंबई :** फर्निचर उद्योगाला सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल असे प्रतिपादन केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नाम. नारायण राणे यांनी केले. 'आत्मनिर्भर भारत कॉन्फरन्स २०२३' मध्ये ते बोलत होते. 'अवेरनेस अँण्ड बेनिफिटस् ऑफ एमएसएमई स्कीम इन फर्निचर' असा कॉन्फरन्सचा विषय होता. केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नाम. नारायण राणे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी फर्निचर उद्योगाला सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असे ठोस आश्वासन दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणादायी आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवण्यासाठी आणि सर्व बाबतीत आत्मनिर्भर बनवण्यासाठी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे मोठे योगदान आहे आणि भविष्यातही राहणार आहे, असे गौरवोद्गागार महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी काढले. तसेच असोसिएशन ऑफ फर्निचर मॅन्युफॅक्चरर्स अँड ट्रेडर्सला महाराष्ट्र चेंबरतर्फे सर्वोतोपरी मदत केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीज तर्फे एक ऑक्टोबरला स्वच्छता मोहिम



**सुप्रसिद्ध सिने अभिनेते पंकज त्रिपाठी यांचा सत्कार करताना ललित गांधी दुसऱ्या छायाचित्रात स्वच्छता सेवा अभियानात सहभाग महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, चीफ कमिशनर इन्कम टॅक्स-श्रीमती रुपिंदर ब्रार, सुप्रसिद्ध सिने अभिनेते पंकज त्रिपाठी, आम दार प्रसाद लाड, उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, आदि.**



**मुंबई :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीज तर्फे एक ऑक्टोबरला रोजी स्वच्छता सेवा अभियानात सहभाग घेण्यात आला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, चीफ कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स मुंबई, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सायन तलावाजवळ आयोजित कार्यक्रमात चीफ कमिशनर इन्कम टॅक्स-श्रीमती रुपिंदर ब्रार,सुप्रसिद्ध सिने अभिनेते पंकज त्रिपाठी, आमदार प्रसाद लाड, चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य केशव कोरगावकर, ॲडीशनल कमिशनर ऑफ पोलिस अनिल पानस्कर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

सर्व मान्यवरांनी व उपस्थित विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी याप्रसंगी सायन तलाव, तलावाशेजारील उद्यान व मुख्य रस्त्याची स्वच्छता केली.

## महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लागतील : मा आमदार पृथ्वीराज देशमुख

### महाराष्ट्र चेंबरचे पलूस संपर्क कार्यालय आणि केदार क्रेडिट सोसायटी कार्यालयाचे थाटामाटात उद्घाटन



**पलूस (जि. सांगली) येथे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅण्ड अॅग्रीकल्चरच्या पलूस शाखेच्या नूतन कार्यालयाचे आणि केदार क्रेडिट सोसायटीच्या कार्यालयाचे संयुक्तपणे उद्घाटन करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, सर्जेराव नलवडे व अन्य मान्यवर.**

पलूस : संघटितपणे काम केल्यास कोणत्याही संस्था, संघटनेचे काम शंभर टक्के यशस्वी होते. नव्याने स्थापन झालेली महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची पलूस शाखा आणि केदार क्रेडिट सोसायटी आपल्या कार्याचा निश्चितच ठसा उमटवेल. महाराष्ट्र चेंबरच्या माध्यमातून उद्योजक, व्यापारी बंधूचे अनेक प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांनी व्यक्त केला. पलूस (जि. सांगली) येथे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅण्ड अॅग्रीकल्चरच्या पलूस शाखेच्या नूतन कार्यालयाचे आणि केदार क्रेडिट सोसायटीच्या कार्यालयाचे सयुंक्तपणे उद्घाटन माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री, अॅण्ड अॅग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटनाचा हा सोहळा झाला. पलूस-तासगाव रोडवर निकम टॉवर्स, पलूस येथे नूतन शाखा स्थापन झाली आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉर्सचे उपाध्यक्ष रवींद्र माणगावे म्हणाले, महाराष्ट्र चेंबरचे पलूस येथे कार्यालय स्थापन झाल्याने निश्चितच उद्योजक आणि व्यापारी वर्गात चैतन्य आहे. उद्योग आणि व्यापाराच्या वाढीसाठी हे कार्यालय महत्वपूर्ण ठरणार आहे. व्यापारी, उद्योजकांचे अनेक स्थानिक आणि राज्यस्तरीय प्रश्न मार्गी लागणार आहेत.

## महाराष्ट्र चेंबरच्या ९६ वर्षांच्या इतिहासातील सर्वाधिक विक्रमी नफा १ कोटी ३२ लाख रुपये : अध्यक्ष ललित गांधी

मुंबई : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अॅण्ड अॅग्रीकल्चरची ९६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २२ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी ३ वाजता बाबासाहेब डहाणूकर सभागृह, मुंबई येथे उत्साहात संपन्न झाली.

यावेळी वार्षिक सभेचे सूचना वाचन करण्यात आले. ९५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त एकमताने मंजूर करण्यात आले. चेंबरच्या ९६ व्या वर्षाचा अहवाल वाचून एकमताने मंजूर करण्यात आला. लेखापरीक्षकानी तपासलेला २०२२-२३ या वर्षाचा ताळेबंद व जमाखर्च यातील प्रमुख मुद्दे अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी सभेला सांगितले. अध्यक्ष श्री. ललित गांधी यांनी २०२२-२३ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र चेंबरच्या ९६ वर्षांच्या इतिहासातील सर्वाधिक विक्रमी नफा १ कोटी ३२ लाख रुपये चेंबरला मिळाला असल्याचे सांगितले. यावर्षी आपण मायटेक्स एक्स्पोची सुरुवात केली असून एक्सपोच्या माध्यमातून ५० लाख रुपये नफा झाल्याचे सांगितले. घटनेतील तरतुदीनुसार महाराष्ट्र चेंबरच्या ट्रस्टला पेट्रॉन सभासदत्वाची व आजीवन सभासदत्वाची रक्कम, प्रवेश फी असे २५.६६ लाख रुपये वर्ग करण्यात आल्याची माहिती सभेला दिली. तसेच सोसायटीच्या नूतनीकरणाचे काम सुरू असून चेंबरला अंदाजे दोन कोटी रुपये इतका खर्च येणार असून सोसायटीला देण्यासाठी ४३ लाख, ५० हजार रुपये चेंबरच्या माध्यमातून ट्रस्टला वर्ग/कर्ज म्हणून दिले असल्याचे सांगितले. यावर्षी महाराष्ट्राचे चेंबरने पूर्वीच्या मुदत ठेवी व्यतिरिक्त १ कोटी, २० लाख रुपये मुदत ठेव (एफडी) मध्ये गुंतवले असून सभासदत्वाच्या माध्यमातून वार्षिक सभासदत्वातून २२.६८ लाख, टर्म सभासदत्वातून ३.७४, शताब्दी सभासदातून ४४. ६२ लाख, सर्टिफिकेट ऑफ ओरिजीनचे ८४. ७० लाख उत्पन्न मिळाले असून मागच्या वर्षीच्या तुलनेत सर्टिफिकेट ऑफ ओरिजीनचे ५ टक्के उत्पन्न वाढले असल्याची माहिती अध्यक्ष ललित गांधी यांनी सभेला दिली.

Proposed Hightech City in 35 Acres...

METRO LIFE CITY

*Happening Life Everyday...*

बावन्नकशी सोन्यासारखी

# गुंतवणूक

स्वप्नांची, कष्टाच्या पैशाची...



घर...

जिथं गुंतवणूक असते स्वप्नांची, कष्टाच्या पैशांची म्हणूनच अशा घराचं लोकेशनही तितकंच महत्वाचं. यामुळेच आम्ही आपल्यासाठी असं लोकेशन सिलेक्ट केलंय की जिथं पुराचा धोका नाही की शहरातील धकाधकीच्या जीवनाचा... अधुनिक सोई-सुविधांबरोबरच एक संपूर्णपणे वेगळेपण जपणारी मॉडर्न कम्युनिटी. म्हणूनच अशा ठिकाणी आपल्या स्वत:ची जागा असणं नक्कीच फायद्याचं...

**15 लाख चौरस फुटाच्या या प्रकल्पापैकी**

**8 लाख चौरस फुट जागा ओपन स्पेस गार्डन्स, रस्ते व सुविधांसाठी...**

**निसर्गरम्य 35 एकर जागेतील कोल्हापूरातील पहिलं मेट्रो शहर**

- 1500 ते 4000 चौ. फुटांचे बंगलो प्लॉटस्
- 500 बंगलो प्लॉटस्चे आधुनिक शहर
- 50 पेक्षा अधिक आधुनिक सुविधा
- बिनव्याजी कर्ज सुविधा उपलब्ध



**NA प्लॉट्स उपलब्ध**

**सोई-सुविधा**

इंटरनॅशनल स्कुल | जिम | क्लब हाऊस | प्रकल्पांतर्गत स्ट्रिट लाईट | प्रकल्पांतर्गत 50 फूटी रस्ते | वेल डेव्हलप्ड गार्डन | 24 तास पाणी

PROJECT BY


ADESHWAR FARMS & AGRO LLP

ऑफिस : 1677 ई वॉर्ड, बिझनेस हाऊस, राजारामपूरी 10 वी गल्ली, मेनरोड, कोल्हापूर.

साईट : पाचगांव-गिरगाव रोड, कोल्हापूर

फोन : 9766499991, 7028173131

**Date of Publish : 31st May 2024** **Page No. 1 to 92**
Registered with Regr. of News Paper for India, Delhi under Regd. No. 20803/71, Postal Registration No. KLR-357/2024-2026
Posted on 31st May 2024 at RMS Kolhapur




'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अॅग्रीकल्चर'च्या उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालयाच्या प्रस्तावित 'चेंबर भवन'चे संकल्पचित्र...

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक ललित गांधी यांनी मालक महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर यांचेकरीता शिवम ऑफसेट, प्लॉट नं. डी-१११, फाइव स्टार एमआयडीसी, कागल-हातकणंगले, कोल्हापूर येथे छापुन बिझनेस हाऊस, १६७७, ई मेन रोड, राजारामपुरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८ येथे प्रसिध्द केले.

If undelivered please return to:
Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture
'Business House', 1677, E Main Road, Rajarampuri 10th Lane, Kolhapur - 416008